
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ५ मे २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १५६ | पाने १२ | किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघाच्या सामर्थ्याचे मूल्यांकन कधीही राजकीय मापदंडावरून केले जाऊ नये. हिंदूंमध्ये परस्पर आत्मीयता, स्वावलंबन आणि समरसतेने राहण्याची भावना वाढवणे, असे भावात्मक सामाजिक परिवर्तन घडविणे, हेच संघकार्याचे ध्येय आहे. या संकल्पनेत राजकीय क्षेत्रावर प्रभाव हा एक छोटासा अंश आहे.

**- स्व. यादवराव कृष्ण जोशी**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

# वंगभूमीत फुलले कमळ

| भाजपा | २०८ | तृणमूल | ८० | काँग्रेस | २ |
|---|---|---|---|---|---|




**◆ कोलकाता, ४ मे**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आतापर्यंतच्या राजकीय वाटचालीतील अपवाद ठरलेल्या वंगभूमीत अखेर कमळ फुलले आहे. भारतीय जनता पार्टीने पश्चिम बंगालमध्ये अभूतपूर्व कामगिरी करताना तृणमूल काँग्रेसची १५ वर्षांची सत्ता उलथून लावली. भाजपाने जागांचे दुहेरी शतक गाठले. तसेच मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना भवानीपूर मतदारसंघात मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. तृणमूल काँग्रेसच्या खात्यात अवघ्या ७९ जागा गेल्या.**

भाजपाने भारताच्या हिंदी भाषिक हृदयभागात एकहाती विजय मिळवला होता, पश्चिम आणि ईशान्येकडे विस्तार केला होता. एकेकाळच्या बलाढ्य प्रादेशिक प्रतिस्पर्धकांना नमवले होते. तरीही प्रत्येक गोष्टीत सातत्याने आव्हान देणारा आणि सांस्कृतिक श्रेष्ठत्वाच्या आत्मप्रतिमेत मग्न असलेला बंगाल मात्र हट्टीपणाने प्रतिकार करीत राहिला.

यामुळे ही राज्य निवडणूक असाधारणरीत्या महत्त्वाची ठरली. १० कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या असलेला पश्चिम बंगालचा मतदारवर्ग जर्मनीच्या एकूण लोकसंख्येपेक्षाही मोठा आहे. परिणामी, येथील निवडणूक ही भारतातील एखाद्या राज्याची नेहमीची निवडणूक न राहता, एखाद्या देशाने आपले सरकार निवडण्यासारख्या प्रक्रियेच्या अधिक जवळची बनली आहे.

बंगालमध्ये भाजपाने मिळवलेला विजय हा मोदींच्या १२ वर्षांच्या कार्यकाळातील सर्वांत महत्त्वपूर्ण यशापैकी एक मानला जाईल. हा केवळ सलग तीन वेळा सत्तेवर असलेल्या विद्यमान नेत्याचा पराभव नाही, तर पूर्व भारतात पक्षाने केलेल्या प्रदीर्घ वाटचालीची ही परिपूर्ती आहे. तृणमूल काँग्रेसबरोबरच काँग्रेस आणि डाव्या पक्षांचीही पार वाताहत झाली. माक्सवादी कम्युनिस्ट पक्षाला केवळ एक जागा मिळाली तर काँग्रेसला कशाबशा दोन जागा मिळाल्या. बाबरी मशीद बांधण्याची घोषणा करणारा कबीर यांच्या आम जनता उन्नयन पार्टीला दोन जागा मिळाल्या. ◀(वृत्तसंस्था)

## ममता बॅनर्जी यांची सत्ता उलथवली



## मतदारांची 'ममता' आटली

पश्चिम बंगालमध्ये मतदारांची बॅनर्जींवरील 'ममता' आटल्याचे स्पष्ट झाले असून, भाजपाचे उमेदवार शुभेंदू अधिकारी यांनी भवानीपूर मतदारसंघातून त्यांचा १५,१०५ मतांनी धक्कादायक पराभ केला. शुभेंदू अधिकारी यांना ७३,९१७ मते मिळाली, तर ममता बॅनर्जी यांना ५८,८१२ मतांवर समाधान मानावे लागले. भवानीपूर मतदारसंघात २० फेऱ्यांमध्ये मतमोजणी झाली. सुरुवातीपासून या मतदारसंघात अत्यंत चुरशीची लढत झाली. सुरुवातीच्या काही फेऱ्यांमध्ये शुभेंदू अधिकारी मागे पडले होते. नंतर ममता बॅनर्जी यांनी आघाडी घेतली. शेवटच्या काही फेऱ्यांपर्यंत त्यांची आघाडी सात हजार मतांच्या वर गेली होती. मात्र, १६ व्या फेरीत शुभेंदू अधिकारी यांनी ममता बॅनर्जी यांच्यावर आघाडी घेतली.

## पूर्वांचलमध्ये भगव्याचा सूर्योदय

**पहिल्या टप्प्यातील १५२ मतदारसंघातील मतदान २३ एप्रिलला आटोपल्यावर लगेच अमित शाह यांनी या टप्प्यात भाजपा ११० जागा जिंकणार असल्याचा विश्वास व्यक्त केला होता, तो किती अचूक होता, हे या निकालाने स्पष्ट झाले. पश्चिम बंगालमध्ये १९७७ पासून २०११ पर्यंत डाव्या पक्षांची सत्ता होती, त्यानंतर राज्यात २०११ पासून २०२६ पर्यंत म्हणजे सलग १५ वर्ष तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांचे सरकार होते. डावे पक्ष आणि तृणमूल काँग्रेस यांच्या ४९ वर्षांच्या राजवटीनंतर पश्चिम बंगालमध्ये भगव्याची सत्ता आली आहे.**

## महत्त्वाचे

### बंगालच्या निकालाचा शेअर बाजाराला बूस्टर

**मुंबई :** भारतीय शेअर बाजाराने आठवड्याची सुरुवात सकारात्मक केली. सोमवारी दोन्ही प्रमुख निर्देशांकांनी चांगली वाढ नोंदवली. ५ राज्यांच्या निकालाचा शेअर बाजारावर सकारात्मक परिणाम दिसला. सत्राच्या सुरुवातीला निफ्टीने २४,३०० अंकांच्या पातळीपर्यंत मजल मारली होती. मात्र, मध्यान्हानंतर गुंतवणूकदारांनी नफावसुलीला प्राधान्य दिल्यामुळे निर्देशांकातील सकाळची वाढ काही प्रमाणात कमी झाली. तरीही, बाजार बंद होताना निफ्टी २४,१०० च्या वर स्वतःला टिकवून ठेवण्यात यशस्वी ठरला.

**पश्चिम बंगाल (एकूण जागा २९४)**

| पक्ष | आघाडी | विजय |
|---|---|---|
| भाजपा | १९ | १८८ |
| तृणमूल काँग्रेस | १६ | ६४ |
| काँग्रेस | ० | २ |
| एजेयूपी | ० | २ |
| सीपीआय (एम) | ० | १ |

**आसाम (एकूण जागा १२६)**

| पक्ष | आघाडी | विजय |
|---|---|---|
| भाजपा | १ | ८१ |
| काँग्रेस | १ | १८ |
| बीओपीएफ | ० | १० |
| एजीपी | ० | १० |
| एआययूडीएफ | ० | २ |

**तामिळनाडू (एकूण जागा २३४)**

| पक्ष | आघाडी | विजय |
|---|---|---|
| टीव्हीके | ११ | ९६ |
| द्रमुक | ६ | ५४ |
| अण्णाद्रमुक | ३ | ४४ |
| काँग्रेस | ० | ५ |
| पीएमके | २ | २ |

**पुडुचेरी (एकूण जागा ३०)**

| पक्ष | आघाडी | विजय |
|---|---|---|
| एआयएनआरसी | १ | ११ |
| द्रमुक | ० | ५ |
| भाजपा | ० | ४ |
| आयएनडी | ० | ३ |
| टीव्हीके | ० | २ |

**केरळ (एकूण जागा १४०)**

| | |
|---|---|
| काँग्रेस | ६३ |
| सीपीआय-एम | २६ |
| इंडियन मुस्लिम लीग | २२ |
| सीपीआय | ८ |
| केरला काँग्रेस | ७ |
| भाजपा | ३ |
| अन्य | ११ |

## भाजपा मुख्यालयात जल्लोष

**नवी दिल्ली :** आसाम, पुडुचेरी आणि पश्चिम बंगालमधील विजयाचा भाजपा मुख्यालयात सोमवारी आनंदोत्सव साजरा करण्यात आला. पंडित दीनदयाल उपाध्याय मार्गावरील भाजपा मुख्यालयात भाजपा कार्यकर्ते सकाळपासुनच ढोलताशांच्या गजरात नाचत होते. फटाके फोडले जात होते. मिठाई वाटली जात होती.

## पुडुचेरीत रंगास्वामींना पुन्हा कौल

**नवी दिल्ली :** पुडुचेरी विधानसभा निवडणुकीत भाजपाप्रणित रालोदने पुन्हा एकदा दणदणीत विजय मिळवला आहे. या निवडणुकीत इथे पुन्हा सत्ता मिळवणे हा केवळ राजकीय योगायोग नसून विविध घटकांच्या एकत्रीकरणातून आलेले परिणाम आहेत.



भाजपाची एआयएनआरसी सोबत युती पुन्हा एकदा मजबुतीने पुढे आली आहे. विद्यमान मुख्यमंत्री एन. रंगास्वामी यांच्यावर मतदारांनी पुन्हा विश्वास दाखवला आहे. मुख्यमंत्री रंगास्वामी यांची स्थानिक पातळीवरील विश्वासार्ह प्रतिमा, साधी शैली आणि जनसंपर्क यामुळे मतदारांमध्ये त्यांच्याबद्दल सकारात्मक भावना होती. तसेच भाजपाने संघटनात्मक पातळीवर प्रभावी प्रचार यंत्रणा उभी केली. पुडुचेरी केंद्रशासित प्रदेश असल्यामुळे केंद्रातील सत्ताधारी पक्षाशी सुसंगत सरकार असेल तर अधिक निधी, विकास प्रकल्प आणि पायाभूत सुविधा मिळतील, असा विचार मतदारांमध्ये पेरण्यात रालोदला यश आले. परिणामी मतदारांनी रालोदला पुन्हा सत्ता सोपवली.

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या किंवा** ९८८१०११६६२ व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपर्क साधा.

सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

# शतकासह भाजपाची हॅटट्रिक

### आसाम



**◆ गुवाहाटी, ४ मे**

आसाममध्ये भाजपा १०० जागांवर जिंकेल, असा दिलेला शब्द मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांनी खरा केला असून, या राज्यात भाजपाने १०१ जागांसह पुन्हा सत्ता मिळवली आहे. केवळ इतकेच नव्हे, तर या राज्यात भाजपाने हॅटट्रिक साधत सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवली.

विधानसभा निवडणुकीत रालोआने केलेल्या अभूतपूर्व कामगिरीबद्दल हिमंता बिस्व सरमा यांनी नागरिकांचे आभार मानले. ही कामगिरी म्हणजे सरकारच्या चांगल्या कामाचे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ईशान्येकडील राज्याच्या विकासावर भर दिल्याचे प्रतिबिंब असल्याचे त्यांनी नमूद केले.

सत्ताधारी आघाडीसाठी हा एक अभूतपूर्व विजय आहे. राज्यात भाजपाने बहुमत मिळवण्याची ही पहिलीच वेळ आहे, असे सरमा यांनी येथील भाजपाच्या प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेला संबोधित करताना सांगितले.

आसाममध्ये काँग्रेसची कामगिरी अतिशय निराशाजनक झाली असून, त्यांना केवळ २० जागांवर समाधान मानावे लागले. ◀(वृत्तसंस्था)

# विजयच 'जननायक'

### तामिळनाडू



**◆ नवी दिल्ली, ४ मे**

सोमवारी पार पडलेल्या २०२६ च्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीत अभिनेता विजय थलपती यांच्या तमिझगा वेत्री कझगम पक्षाने (टीव्हीके) ऐतिहासिक विजय मिळवला. तामिळनाडूत विजयच जननायक असल्याचे स्पष्ट झाले. या विजयाने जवळपास सहा दशकांपासून दृढ असलेल्या 'द्रविड' राजकारणाच्या द्विपक्षीय वर्चस्वाची साखळी तोडली. तामिळमध्ये थलपतीचा अर्थ सेनापती होतो. या थलपतीने इतर पक्षांची अक्षरशः शिट्टी वाजवली.

विजय तामिळनाडूत १०६ जागांवर पुढे होता. अभिनेत्याचा दणदणीत विजय निश्चित आहे. या जागांपैकी एक विरुगम्पाक्कम ही आर. सबरिनाथन्कडे गेली. आर. सबरिनाथान् विजयच्या चालकाचा मुलगा आहे. तामिळनाडूच्या राजकारणात इतिहास घडवण्याच्या बाबतीत त्यांनी या अभिनेत्याच्या पावलावर पाऊल टाकले. पहिल्याच निवडणुकीत विजय मिळवून नव्याने निवडून आलेल्या टीव्हीके आमदारांच्या यादीत त्यांनी आपले नाव नोंदवले. ◀(वृत्तसंस्था)

# डाव्यांचा तंबू उखडला

### केरळ



**◆ तिरुवनंतपुरम्, ४ मे**

केरळात डाव्यांच्या सत्ताधारी एलडीएफला मोठा झटका बसला असून, त्यांचा तंबू उखडला आणि काँग्रेसच्या नेतृत्वातील यूडीएफची सत्ता आली. या निवडणुकीत मुख्यमंत्री पी. विजयन् यांच्या नेतृत्वातील २१ मंत्र्यांच्या चमूपैकी १३ मंत्र्यांना पराभवाची चव चाखावी लागली.

मुख्यमंत्र्यांसह काही जण विजयी झाले. यात के. राजन, जी. आर. अनिल, के. एन. बालगोपाल, पी. प्रसाद आणि साजी चेरियन यांचा समावेश आहे. उर्वरित दिग्गज पराभूत झाले. आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज यांच्या पराभवाची राज्यात सर्वांत मोठी चर्चा आहे. काँग्रेसचे उमेदवार एबिन वार्की यांनी त्यांचा जवळपास १९ हजार मतांनी पराभव केला.

एलडीएफचे शिक्षण मंत्री व्ही. शिवकुट्टी यांना तिरुवनंतपुरम् येथील नेमोम मतदारसंघात भाजापाच्या राजीव चंद्रशेखर यांच्याकडून ३५०० मतांनी पराभव पत्करावा लागला. परिवहन मंत्री के. बी. गणेशकुमार २००१ पासून विजय मिळवित होते. पण, यावेळी त्यांनाही पराभवाची चव चाखावी लागली. ◀(वृत्तसंस्था)

# सुनेत्रा पवार यांचा विक्रमी विजय

## रचला नवा इतिहास



**◆ पुणे, ४ मे**

संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीत राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सर्वाधिक दोन लाख १४ हजार ९३ मतांनी विजय मिळवला. बारामतीच्या राजकारणातील दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी २०१९ मध्ये केलेल्या मताधिक्याचा विक्रम त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी मोडीत काढत नवा इतिहास रचला आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान दुर्घटनेतील निधनानंतर बारामतीत पोटनिवडणूक घेण्यात आली. सोमवारी सकाळी दहा वाजता बारामतीतील एमआयडीसी येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे गोदाम येथे मतमोजणीला सुरुवात झाली. टपाली आणि पहिल्या फेरीपासून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या आघाडीवर होत्या. २४ व्या फेरीअखेर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या विक्रमी मतांनी विजयी झाल्याचे घोषित करण्यात आले. सुनेत्रा पवार यांना २ लाख १८ हजार ९३० मते मिळाली, तर त्यांच्या विरोधात उर्वरित २२ उमेदवार आणि 'नोटा' यांना मिळून अवघे चार हजार ८३७ मते पडली आहेत. ◀(तभा वृत्तसेवा)

# भाजपाचे ७६ टक्के लोकसंख्येवर राज्य

## ७२ टक्के भूभाग आता भगव्या पक्षाकडे


**◆ नवी दिल्ली, ४ मे**

पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू, केरळ आणि पुडुचेरी विधानसभा निवडणुकांचे निकाल सोमवारी लागले. या निकालात भाजपाला पश्चिम बंगाल, आसाम आणि पुडुचेरीमध्ये बहुमत मिळाले असून या राज्यांमध्ये त्यांची सत्ता स्थापन होणार आहे. या निकालांमुळे देशाच्या राजकीय नकाशाचा रंगही बदलणार आहे. या तीन राज्यांसह आता भाजपा २१ राज्यांमध्ये सत्तेत असणार आहे. मतमोजणीपूर्वी भाजपा २० राज्यांमध्ये सत्तेत होती. यापैकी १२ राज्यांमध्ये भाजपा थेट सत्तेत तर ८ राज्यांमध्ये भाजपा मित्रपक्षांसोबत सत्तेत आहे.

भाजपा आणि मित्रपक्ष आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, आसाम, बिहार, छत्तीसगड, दिल्ली, गोवा, गुजरात, हरियाणा, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, नागालँड, पुडुचेरी, ओडिशा, राजस्थान, त्रिपुरा, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये सत्तेत आहे. सोमवारी जाहीर झालेल्या चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशाच्या निकालानुसार सध्या भाजपाशासित २१ राज्यांचे एकूण क्षेत्रफळ देशाच्या अंदाजे ७२ टक्के आहे. लोकसंख्येच्या बाबतीत भाजपा सध्या भारताच्या ७६ टक्के लोकसंख्येवर राज्य करते.

**काँग्रेस किती राज्यांमध्ये सत्तेत**

काँग्रेस आणि मित्रपक्ष हिमाचल प्रदेश, झारखंड, कर्नाटक, तेलंगणा, जम्मू-काश्मीर, पंजाब, सिक्कीम, मिझोराममध्ये सत्तेत असून आता केरळमध्ये सत्तेत येणार आहे. या निवडणुकीपूर्वी काँग्रेस डीएमकेसोबत तामिळनाडूमध्येही सत्तेत होती. परंतु, सोमवारी लागलेल्या निकालानंतर आता तामिळनाडूत डीएमकेला पराभूत करून अभिनेता विजय यांचा पक्ष टीव्हीके सत्तेत आला आहे. टीव्हीकेला काँग्रेस समर्थन देण्याची शक्यता आहे. टीव्हीकेने काँग्रेसचा प्रस्ताव स्वीकारल्यास ते तामिळनाडूत सत्तेत सहभागी होतील.




**२०१४ मध्ये भाजपा सात राज्यांमध्ये होती सत्तेत**

२०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांनी भारताच्या पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारली. ते सत्तेवर आले त्यावेळी भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षांची सात राज्यांमध्ये सरकारे होती. यापैकी छत्तीसगड, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थान या पाच राज्यांमध्ये भाजपाचे मुख्यमंत्री होते, तर आंध्र प्रदेश आणि पंजाबमध्ये त्यांचे मित्रपक्ष सत्तेत होते. या राज्यांमध्ये देशाच्या लोकसंख्येच्या १९ टक्क्यांहून अधिक लोक राहतात. म्हणजेच, जेव्हा नरेंद्र मोदी सत्तेवर आले, तेव्हा भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षांचे देशाच्या लोकसंख्येच्या अंदाजे २६ टक्के भागावर राज्य होते. त्यावेळी काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांचे १४ राज्यांवर राज्य होते. ◀(वृत्तसंस्था)

## २०१८ मध्ये भाजपाने उच्चांक गाठला

**२०१४ मध्ये भाजपा आणि त्यांचे मित्रपक्ष सात राज्यांमध्ये सत्तेवर होते. चार वर्षांनंतर मार्च २०१८ मध्ये भाजपा आणि त्यांचे मित्रपक्ष २१ राज्यांमध्ये सत्तेवर आले. या राज्यांमध्ये देशाच्या लोकसंख्येच्या अंदाजे ७१ टक्के लोक राहतात. हा तो काळ होता जेव्हा लोकसंख्येच्या बाबतीत भाजपाचे राज्य सर्वोच्च शिखरावर होते. दरम्यान, देशाच्या ७ टक्के लोकसंख्या असलेल्या चार राज्यांमध्ये काँग्रेसचे सरकार सत्तेवर होते.**

## अंतरंग

२ मोदींची जादू, शाहांची रणनीती, योगींचे हिंदुत्व
४ परिवर्तन-पर्वाचा उत्तररंग! (अग्रलेख)
६ भाजपाचा विस्तार बिहार ते बंगाल
८ ...अशा घाणेरड्या वृत्ती ठेचून काढण्याचा अधिकार जनतेला द्या

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# मोदींची जादू, शाहांची रणनीती, योगींचे हिंदुत्व

## बंगालमध्ये परिवर्तनाची लाट







◆ **कोलकाता, ४ मे**

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीत यावेळी मोठा बदल झाला आहे. तब्बल १५ वर्षे सत्तेत राहिलेल्या ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसचा भाजपाने मोठा पराभव केला. २०११ मध्ये 'माँ, माटी, मानुष' या घोषणेवर सत्ता मिळवणाऱ्या ममतांच्या कारकीर्दीनंतर आता पुन्हा 'परिवर्तना'ची लाट बंगालमध्ये दिसू लागली आहे.

ममता बॅनर्जी यांनी ३४ वर्षांच्या डाव्या सत्तेला भ्रष्टाचार, बेरोजगारी, कायदा-सुव्यवस्था आणि हिंसाचाराच्या मुद्द्यांवर पराभूत केले होते. मात्र १५ वर्षांनंतर हेच मुद्दे त्यांच्या विरोधात गेले. राज्यात उद्योग, गुंतवणूक आणि रोजगाराच्या संधी कमी झाल्याचा आरोप करत भाजपाने विकासाचा मुद्दा आक्रमकपणे पुढे केला. 'बंगाल पुन्हा उभा करू' या घोषणेला मतदारांनी प्रतिसाद दिला.

शिक्षक भरती घोटाळा, आरजी कर प्रकरणासारख्या घटनांनी सरकारवरील विश्वास डळमळीत झाला. भ्रष्टाचार, कुटुंबवाद आणि 'सिंडिकेट राज' हे मुद्दे भाजपाने प्रभावीपणे मांडले. राजकीय विश्लेषक पार्थ मुखोपाध्याय यांच्या मते, राज्यातील लोकशाही कमकुवत झाली होती, विरोधी पक्षांना वाव नव्हता, ही भावना मतदारांमध्ये निर्माण झाली होती.

ममतांची मुख्य ताकद मानले जाणारे मुस्लिम मतदार यावेळी विभागले गेले. मालदा, मुर्शिदाबाद, उत्तर व दक्षिण २४ परगणा या मुस्लिमबहुल जिल्ह्यांमध्ये भाजपाची ताकद वाढली. काही ठिकाणी स्थानिक नेत्यांच्या प्रभावामुळे मुस्लिम मतांमध्ये फूट पडली, ज्याचा थेट फायदा भाजपाला झाला.

अनुसूचित जाती-जमाती, मतुआ समाज आणि उत्तर बंगालमधील चहा कामगारांनी भाजपाला मोठ्या प्रमाणात साथ दिली. जंगलमहल आणि दक्षिण बंगालमध्येही भाजपाने आपली पकड मजबूत केली.

### महिलांचा बदललेला कल

ममता सरकारने लक्ष्मी भंडार, स्वास्थ्य साथी, युवा साथी यासारख्या योजना राबवल्या होत्या. तरीही महिलांचा कल यावेळी भाजपाकडे वळल्याचे दिसले. भाजपाने महिलांना ३००० रुपयांची मदत आणि मोफत बस प्रवासाचे आश्वासन दिले, ज्याचा प्रभाव मतांवर पडला.

### बाहेरच्या पक्षाची प्रतिमा मोडली

तृणमूल काँग्रेसने भाजपाला 'बाहेरचा पक्ष' म्हणून दाखवण्याचा प्रयत्न केला होता. याला उत्तर देताना भाजपाने बंगाली संस्कृतीशी जवळीक दाखवली. नेत्यांनी सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये मासे खाण्याचे प्रदर्शन करत आम्ही बंगालच्या संस्कृतीत हस्तक्षेप करणार नाही असा संदेश दिला. (वृत्तसंस्था)



### उभे केले मजबूत जाळे

- २०२१ मध्ये बूथ पातळीवर भाजपा कमकुवत होता. यावेळी पक्षाने यावर भर दिला.
- केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांच्या नेतृत्वाखाली बुथ वर्कर्सचे नेटवर्क मजबूत करण्यात आले.
- पोलिंग एजंट निवडण्यासाठी लेखी आणि तोंडी परीक्षा घेण्यात आल्या.
- ग्रामीण भागात मतदारांना मतदान केंद्रांपर्यंत आणण्यासाठी विशेष मोहीम राबवली.

### भाजपची रणनीती : संघटन आणि प्रतिमा बदल

- भाजपने या निवडणुकीपूर्वी संघटनात्मक पातळीवर मोठे बदल केले.
- शामिक भट्टाचार्य यांची राज्याध्यक्षपदी नियुक्ती करून 'भद्रलोक' मतदारांशी संपर्क साधला.
- ग्रामीण भागात शुभेंदू अधिकारी हे चेहरा म्हणून पुढे आले.
- दिलीप घोष आणि राहुल सिन्हा यांसारख्या जुन्या नेत्यांना पुन्हा सक्रिय करून पक्षाने एकजूट दाखवली.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभांमध्ये सर्व वरिष्ठ नेत्यांना पुढे करून मजबूत संघटनेचा संदेश दिला.

# राहुलने साधला ममता, स्टॅलिनसह विजयशी संवाद



◆ **नवी दिल्ली, ४ मे**

सोमवारी निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी टीएमसी प्रमुख ममता बॅनर्जी, डीएमके सर्वेसर्वा एम. के. स्टॅलिन आणि विजयी टीव्हीके अध्यक्ष विजय यांच्याशी संवाद साधला, असे काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी सांगितले.

गांधी यांनी विजय यांच्या पक्षाच्या कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन केले. सोमवारी संध्याकाळी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ममता बॅनर्जीजी आणि थिरू एम. के. स्टॅलिन यांच्याशी निवडणुकीच्या निकालांसंदर्भात संवाद साधला. त्यांनी टीव्हीकेचे अध्यक्ष थिरू विजय यांचेही पक्षाच्या कामगिरीबद्दल अभिनंदन केले, असे रमेश यांनी एक्स वाहिनीवर सांगितले. पश्चिम बंगालमध्ये बॅनर्जी यांना भाजपाकडून दारुण पराभव पत्करावा लागला तर तामिळनाडूमध्ये नवोदित विजय यांच्या टीव्हीकेकडून स्टॅलिन यांच्या पक्षाचा पराभव झाला.

काँग्रेसने पश्चिम बंगालची निवडणूक टीएमसी आणि भाजपाला आव्हान देत स्वबळावर लढवली तर तामिळनाडूची निवडणूक त्यांनी डीएमकेसोबत युती करून लढवली. (वृत्तसंस्था)

# राहुरीत अक्षय कर्डिलेंचा मोठा विजय

## शरद पवार गटाचे गोविंद मोकाटे पराभूत



◆ **राहुरी, ४ मे**

राहुरीत झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपाच्या अक्षय कर्डिले यांनी मोठा विजय मिळवला आहे. त्यांनी शरद पवार गटाचे उमेदवार गोविंद मोकाटे यांचा पराभव केला.

राज्यातील बारामती विधानसभा आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान घेण्यात आले. येथील मतदारसंघाच्या आमदारांचे निधन झाल्याने येथे पोटनिवडणूक लागली होती. बारामतीमध्ये अजित पवार आणि राहुरीत अक्षय कर्डिले यांचे अकाली निधन झाल्यामुळे येथील मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत दोन्ही उमेदवारांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला आहे. राहुरीत २६ व्या फेरी अखेर भाजपाचे अक्षय कर्डीले १,०७, ४८५ मतांनी आघाडीवर होते. येथे शरद पवार गटाचे गोविंद मोकाटे यांना २६,९६१ मते मिळाली तर वंचित बहुजन आघाडीच्या संतोष चोळकेंना ५,५१८ मते पडली आहेत. याशिवाय, अपक्ष उमेदवार रावसाहेब खेवरे यांना ७,२०७ मते मिळाली असून, लाखांच्या फरकाने अक्षय कर्डिले आमदार बनले आहेत. (वृत्तसंस्था)

# गंगोत्रीपासून गंगासागरपर्यंत कमळ फुलले

## प. बंगालच्या विजयानंतर पंतप्रधान मोदींची प्रतिक्रिया ● भाजपा मुख्यालयात कार्यकर्त्यांना केले संबोधित



◆ **नवी दिल्ली, ४ मे**

मागच्या वर्षी १४ नोव्हेंबर रोजी बिहार विधानसभा निवडणुकीचे निकाल आले होते. तेव्हा मी भाजपा मुख्यालयातून म्हटले होते गंगा बिहारमधून वाहत पुढे गंगासागरपर्यंत जाते. आज बंगालच्या विजयासह गंगोत्रीपासून गंगासागरपर्यंत कमळ फुलले आहे, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी यांनी पश्चिम बंगालच्या विजयावर व्यक्त केली. ते येथील भाजपाच्या मुख्यालयात कार्यकर्त्यांना संबोधित करीत होते.

उत्तराखंड, उत्तरप्रदेश, बिहार आणि आता पश्चिम बंगाल गंगेच्या काठावर वसलेल्या या राज्यांमध्ये भाजपा रालोआचे सरकार आहे. गंगा मातेचा आशीर्वाद निरंतरपणे माझ्यासोबत आणि आमच्यासोबत आहेत. कामाख्या देवीचा आशीर्वाद राहिलेला आहे. आसामच्या जनतेने सलग तिसऱ्यांदा भाजपा-रालोआ आघाडीवर विश्वास ठेवला. आसामच्या इतिहासातील ही खूप मोठी घटना आहे. पुडुचेरीच्या जनतेने पुन्हा एकदा आमच्यावर विश्वास ठेवला, असे नरेंद्र मोदी म्हणाले. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या नेतृत्वातील पहिल्याच विधानसभा निवडणुकांमध्ये मोठी यश मिळाल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. पश्चिम बंगालमधील निकालाचे भाजपाचा ऐतिहासिक आणि अभूतपूर्व विजय असे वर्णन त्यांनी केले.

पश्चिम बंगाल सरकारच्या पहिल्या कॅबिनेटमध्ये आयुष्यमान भारत योजनेला हिरवा झेंडा दाखवणार. तसेच घुसखोरांविरोधात कठोर कारवाई करणार असल्याची घोषणा यावेळी त्यांनी केली. पश्चिम बंगालला भाजप भयमुक्त करत राजकीय हिंसाचाराचे चक्र थांबवेल, ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

### डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या आत्म्याला शांती मिळाली

पंतप्रधान मोदी म्हणाले की, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या आत्म्याला आज किती शांती मिळाली असेल ही गोष्ट भाजप कार्यकर्ता म्हणून माझ्या पुन्हा पुन्हा मनात येत आहे. त्यांनी १९५१ मध्ये जनसंघाची स्थापना करून प्रत्येक कार्यकर्त्याला संदेश दिला होता, देशासाठी जगायचे आणि देशासाठी मरायचे. पश्चिम बंगाल भारताचा भाग म्हणून कायम ठेवण्यासाठी मुखर्जी यांनी मोठी लढाई लढली. त्यांनी समृद्ध बंगालचे स्वप्न बघितले होते.

# राहुल गांधींचे सहकारी गौरव गोगोईंचा दारुण पराभव



◆ **भुवनेश्वर, ४ मे**

काँग्रेसचे आसाममधील प्रमुख नेते आणि राहुल गांधी यांचे निकटवर्तीय गौरव गोगोई यांनाही पराभवाचा धक्का बसला आहे. गौरव गोगोई यांना जोरहाट विधानसभा मतदारसंघात तब्बल २३ हजारांहून अधिक मतांनी पराभवाचा सामना करावा लागला.

आसाममधील विधानसभा निवडणुकीदरम्यान, राज्य काँग्रेसचे नेतृत्व करीत असलेल्या गौरव गोगई यांनी भाजपाचे नेते आणि राज्याचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांना जोरदार आव्हान दिले होते. दोन्ही नेत्यांमध्ये अनेकदा वाकयुद्धही रंगले

# पराभवाच्या अफवांनंतर विजयच्या समर्थकाने चिरला स्वतःचा गळा

◆ **कृष्णगिरी, ४ मे**

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीची मतमोजणी सुरू असताना अभिनेते-राजकारणी विजय यांच्या पक्षाने, तामिळनाडू वेत्री कळघम (टीव्हीके) मोठा उलटफेर केला. टीव्हीकेने सत्ताधारी डीएमकेला सत्तेतून बेदखल केले. दरम्यान, टीव्हीके प्रमुख निवडणूक हरणार असल्याच्या अफवा पसरल्यानंतर विजयच्या एका कट्टर समर्थकाने स्वतःचा गळा चिरुन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना कृष्णगिरी येथे घडली. के. महेंद्रन, असे जखमी समर्थकाचे नाव असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कृष्णगिरी निवासी के. महेंद्रन यांनी सोमवारी सकाळी विजयच्या पराभवाच्या अफवांमुळे व्यथित झाले होते. त्यांनी आपल्या घराबाहेर स्वतःचा गळा चिरला. उपस्थित लोकांनी त्यांना वाचवले आणि तातडीने कृष्णगिरी शासकीय वैद्यकीय रुग्णालयात दाखल केले. महेंद्रनवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. (वृत्तसंस्था)

# केरळमध्ये पहिल्यांदाच लालूंचा उमेदवार विजयी

◆ **कुथुपरंबा, ४ मे**

केरळ विधानसभा निवडणुकीत कुथुपरंबा मतदारसंघात राष्ट्रीय जनता दलाचे (आरजेडी) पी. के. प्रवीण यांनी विजय मिळवला आहे. आरजेडी हा केरळमधील डाव्या लोकशाही आघाडीचा (एलडीएफ) एक भाग आहे. केरळमध्ये लालू प्रसाद यादव यांच्या उमेदवाराने पहिल्यांदाच विधानसभा निवडणूक जिंकली आहे. पी. के. प्रवीण यांनी ७०,४४८ मते मिळवत इंडियन युनियन मुस्लिम लीगचे (आययूएमएल) उमेदवार जयंती राजन यांचा १,२८६ मतांनी पराभव केला. जयंती यांना ६९,१६२ मते मिळाली. तर भाजपाचे शिजीलाल २२,१९५ मतांसह तिसऱ्या क्रमांकावर आले.

निवडणूक प्रतिज्ञापत्रानुसार पीके प्रवीण हे एक व्यावसायिक आहेत. त्यांनी अण्णामलाई विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी (मास्टर डिग्री) आणि एम.फिल. पदवी मिळवली आहे. त्यांच्या मालकीची कोट्यवधी रुपयांची मालमत्ता असून त्यात १.३३ कोटींची जंगम मालमत्ता आणि २.०५ कोटींची स्थावर मालमत्ता समाविष्ट आहे. त्यांच्यावर १५ लाखांचे कर्ज आहे. त्यांच्यावर कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नाही. (वृत्तसंस्था)

# बांकुरा-आसनसोलमध्ये तणाव

◆ **कोलकाता, ४ मे**

पश्चिम बंगालमधील आसनसोल मतमोजणी केंद्राबाहेर सोमवारी तृणमूल काँग्रेसच्या कार्यालयाची तोडफोड करीत हल्ला करण्यात आला. यानंतर परिसरात तणाव वाढला होता.

या हल्ल्यासाठी भाजपाचे कार्यकर्ते जबाबदार असल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसने केला. या घटनेनंतर परिसरात गोंधळाचे वातावरण होते. परिस्थिती बिघडताच पोलिस आणि केंद्रीय दलांनी जमाव पांगवून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी लाठीहल्ला केला. सध्या येथील परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगण्यात आले. कोणतीही अप्रिय घटना रोखण्यासाठी मतमोजणी केंद्र आणि जवळपास सुरक्षेची चोख व्यवस्था करण्यात आली. दुसरीकडे, बांकुरा विद्यापीठाच्या मतगणना केंद्राबाहेर मोठ्या प्रमाणात गोंधळ झाल्याचे वृत्त होते. येथे भाजपा आणि तृणमूल काँग्रेसमध्ये हिंसाचार झाला. यानंतर परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी केंद्रीय दलांनी लाठीमार केला. (वृत्तसंस्था)

# बहरामपूरमध्ये काँग्रेसचे अधीर रंजन चौधरींचा पराभव

**कोलकाता** : निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबाद जिल्ह्यातील बहरामपूर या आपल्या बालेकिल्ल्यात सोमवारी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अधीर रंजन चौधरी यांचा भाजपचे सुब्रता मैत्रा यांच्याकडून १७,५४८ मतांच्या फरकाने पराभव झाला. ही जागा राखणाऱ्या मैत्रा यांना ९१,०८८ मते मिळाली तर चौधरी यांना ७३,५४० मते मिळाली. भाजपच्या या नेत्याने २०२१ मधील आपल्या ८९,३४० मतांच्या कामगिरीत किंचित सुधारणा करीत विजय मिळविला. दुसरीकडे चौधरी यांनी मागील वर्षीच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे उमेदवार मनोज चक्रवर्ती यांना ४०,१६७ मतांसह तिसऱ्या स्थानावर ढकलले होते; त्या तुलनेत या मतदारसंघात पक्षाच्या कामगिरीत मोठी सुधारणा केली.

दोन वर्षांच्या कालावधीत चौधरींचा त्यांच्या बालेकिल्ल्यात झालेला हा सलग दुसरा पराभव होता. यापूर्वी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत टीएमसीचे क्रिकेटपटू-राजकारणी युसूफ पठाण यांनी त्यांचा पराभव केला होता. यात त्यांनी आपली दीर्घकाळची बहरामपूर लोकसभा जागा मोठ्या फरकाने गमावली होती. (वृत्तसंस्था)

# एम. के. स्टॅलिन यांचा किल्ला ढासळला

## तीन वेळा जिंकलेल्या कोलाथूरमध्ये पराभव

◆ **चेन्नई, ४ मे**

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत जनतेने मुख्यमंत्र्यालाच पराभवाचा मोठा धक्का दिला. राज्यातील सर्वांत उत्कंठा असलेल्या कोलाथूर विधानसभा मतदारसंघात मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचा किल्ला ढासळला. स्टॅलिन यांचेच पक्ष सहकारी आणि टीव्हीकेचे उमेदवार व्ही. एस. बाबू यांनी त्यांचा ८७८५ मतांनी पराभव केला.

७५ वर्षांचे व्ही. एस. बाबू तामिळनाडूतील एक अनुभवी राजकारणी आहे. कोलाथूर येथे त्यांची राजकीय उंची अतिशय मोठी असल्याचे मानले जाते. व्ही. एस. बाबू यांनी २००६ मध्ये द्रमुकच्या उमेदवारीवर पुरासवाल्कम येथे मोठा विजय मिळविला होता. त्यावेळी त्यांनी अण्णाद्रमुकच्या उमेदवाराचा ९० हजारांपेक्षा जास्त मतांनी पराभव केला होता.

व्ही. एस. बाबू २० वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून राजकारणात सक्रिय आहे. २००६ ते २०११ पर्यंत त्यांनी आमदारकी उपभोगली आहे. ते स्टॅलिन यांचे निकटवर्तीय मानले जायचे.

### अध्यक्ष, सरचिटणीसाचा पराभव

निवडणुकीत प्रथमच द्रमुकचे अध्यक्ष स्टॅलिन आणि सरचिटणीस दुरईमुरुगन यांचा पराभव झाला. कोलाथूर येथे स्टॅलिन यांनी २०११, २०१६ आणि २०२१ मध्ये विजय मिळविला होता. मात्र यंदा त्यांच्या पदरी निराशा पडली. (वृत्तसंस्था)

# 'भाजपाने देशाला घुसखोरीपासून वाचवले'



◆ **मुंबई, ४ मे**

पश्चिम बंगालमधील भाजपाचा विजय देशाला घुसखोर आणि दहशतवादी कारवायांपासून वाचवण्यास मदत करेल, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी व्यक्त केली. जनतेने पक्ष आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर गाढ विश्वास व्यक्त केला, असेही त्यांनी ठामपणे नमूद केले. बंगाल, आसाम आणि पुडुचेरी येथील भाजपाच्या कामगिरीचा हवाला देत त्यांनी म्हटले की, देशाच्या ७८ टक्के भागावर आता भाजपाच्या नेतृत्वाखाली रालोआचे राज्य आहे. पश्चिम बंगालमधील विजय आपल्या देशाला घुसखोर, दहशतवादी कारवाया आणि हल्ल्यांपासून वाचवेल. (वृत्तसंस्था)

# विजय यांचा राजकीय 'स्टार्टअप' निकालानंतर 'युनिकॉर्न'

## राजकीय पंडितांचे अंदाज मिळवले धुळीस



◆ **नवी दिल्ली, ४ मे**

राजकीय पंडितांचे अंदाज चुकवत तामिळनाडूत सत्तेत आलेला अभिनेता विजय यांचा टीव्हीके पक्ष हा निवडणुकीपूर्वी नव्यानेच सुरू झालेला राजकीय स्टार्टअप होता. मात्र, निकालानंतर तो युनिकॉर्न ठरला आहे.

तामिळगा वेट्री कळघम (टीव्हीके) या पक्षाने आपल्या पहिल्याच निवडणुकीतील सहभागानंतर सरकार स्थापन करण्याच्या दिशेने पावले उचलत 'आम आदमी पार्टी' (आप), आसाम गण परिषद (एजीपी) आणि तेलुगू देसम् पार्टी (तेदेपा) यासारख्या पक्षांच्या पावलावर पाऊल टाकले आहे.

२०१३ मधील आपल्या पहिल्याच निवडणुकीनंतर आपने काँग्रेसच्या पाठिंब्याने सरकार स्थापन केले होते, तर दुसरीकडे एजीपीने मात्र १९८५ मध्ये आपल्या स्थापनेनंतर लगेचच आसाम आंदोलनाशी संबंधित यशस्वी अपक्ष उमेदवारांच्या पाठिंब्याने सरकार स्थापन केले होते.

स्थापनेनंतर अवघ्या एका वर्षातच १९८३ मध्ये झालेल्या आंध्रप्रदेश विधानसभा निवडणुकांमध्ये तेदेपाने २०१ जागा जिंकून प्रचंड बहुमतासह दणदणीत विजय मिळवला होता. तथापि, फारच कमी लोक 'स्टार्टअप्स'ना 'युनिकॉर्न' करण्यात यश आले आहे. काहींना यासाठी वेळ लागला, तर काही आपला ठसा उमटवण्यात यशस्वी ठरले. मागील वर्षी 'जन सुराज'ला अपयश पत्करावे लागले होते. असे आणखीही काही पक्ष होऊन गेले, ज्यांनी सुरुवातीला मोठी चर्चा निर्माण केली. परंतु, प्रत्यक्ष निवडणुकीच्या मैदानात मात्र त्यांना यश मिळवता आले नव्हते. यात अभिनेते कमल हसन यांच्या मक्कल नीधी मय्यम या पक्षाचा समावेश आहे. या पक्षाला २०२१ च्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत एकही जागा जिंकता आली नाही. (वृत्तसंस्था)

### तामिळनाडूत राजकीय भूकंप

टीव्हीकेने सर्वांनाच थक्क करून सोडले आहे. मागील अनेक दशकांपासून राज्यातील दोन प्रमुख पक्ष असलेल्या द्रमुक आणि अण्णाद्रमुक या दोघांचाही पराभव करीत त्यांनी तामिळनाडूत एक मोठा राजकीय भूकंप घडवून आणला.

### टीव्हीकेची चर्चा सुरुवातीपासून

टीव्हीकेने सुरुवातीपासूनच मोठी चर्चा निर्माण केलीहोती. विशेषतः, दक्षिणेकडील राज्यांमध्ये यापूर्वी चित्रपट ताऱ्यांनी स्थापन केलेले आणि राजकीय स्टार्टअप्स यशस्वी ठरले असल्याने तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत या पक्षाकडून मोठ्या अपेक्षा होत्या.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित





CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# परिवर्तन-पर्वाचा उत्तररंग!

युद्धात आणि राजकारणात एकच गोष्ट सत्य असते- 'जो जीता, वही सिकंदर'! केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम या राज्यांच्या व पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभा निवडणुकांचे जे निकाल समोर येत आहेत, ते पाहता आता देशभरातील भाजपाविरोधी पक्ष आणि मोदीविरोधकांच्या टोळ्या छाती पिटून पराजयाचे जुने-नवे प्रभावशून्य सिद्धान्त मांडण्यासाठी धडपडू लागतील. आता निवडणुका पार पडलेल्या राज्यांतील किंवा देशाच्या कोणत्याही कोपऱ्यातील कोणाचाही त्यावर विश्वास बसणार नाही. कारण भाजपाला मिळालेल्या यशाचे सारे श्रेय त्या मतदारांचेच असेल आणि विरोधकांची बोथट विश्लेषणे हा त्या मतदारांवरच थेट अविश्वास ठरेल. म्हणूनच, भाजपाच्या नव्या विजयाची नोंद ऐतिहासिक आणि अभूतपूर्व अशा केवळ दोन विशेषणांनीच करता येईल. पश्चिम बंगालसारख्या राज्यात, जेथे भाजपाला चंचुप्रवेशासाठीदेखील खडतर परिश्रम घ्यावे लागत होते, तेथे काँग्रेस, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि ममता बॅनर्जी यांची तृणमूल काँग्रेस यांना जबर धक्का देत भाजपाने नेत्रदीपक विजय संपादन केला आहे. या एकाच कारणासाठी या निवडणुकांमधील भाजपाचा विजय हा अभूतपूर्व आणि ऐतिहासिक ठरतो. स्वातंत्र्य मिळाल्यापासून, म्हणजे १९४७ ते १९७७ अशा सलग ३० वर्षांची काँग्रेसची राजवट संपुष्टात आणून डाव्या आघाडीने पश्चिम बंगालवर मिळविलेली सत्ता तृणमूल काँग्रेसने ३४ वर्षांनंतर हस्तगत केली. जवळपास १५ वर्षांच्या सत्ताकाळात ममता बॅनर्जी यांनी या राज्यास अक्षरशः वेठीस धरले. ममता बॅनर्जी यांनी केलेली राज्याची दुर्दशाच अखेरीस त्यांची सत्तेवरून हकालपट्टी करण्यास कारणीभूत ठरली. या पराभवाचे खरे विश्लेषण करावयाचे झाले, तर या राज्यातील मतदारांनी ममता दीदी व त्यांच्या पक्षाला दंडित केले, असेच म्हणावे लागेल. देशात गेल्या १२ वर्षांपासून सुरू झालेल्या परिवर्तन पर्वाचा हा एक तेजस्वी उत्तररंग आहे. त्यामुळे पश्चिम बंगालमधील मतदार अभिनंदनास पात्र ठरतात. प्रचंड संख्येने मतदानात सहभागी होऊन लोकशाहीच्या या उत्सवाचे पावित्र्य जपणाऱ्या मतदारांचा कौल त्यांच्या उत्साहातूनच उमटू लागला होता. त्यातून तृणमूल काँग्रेसमधील भयगंडाची लाट भाजपाच्या विजयाचे स्पष्ट संकेत देत होती. निकालानंतर भाजपा विजयाच्या उत्सवावर आरोपांची आणि नव्या-जुन्या कारणांची चिखलफेक करून विरोधकांनी कितीही आक्रस्ताळेपणा केला, तरी भाजपाचा पश्चिम बंगालमधील ऐतिहासिक दिग्विजय हा मतदारांच्या समंजसपणाचाच निःसंशय पुरावा आहे.

केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि आसाम ही चार राज्ये आणि पुडुचेरी या केंद्रशासित प्रदेशातील मतमोजणीतील सध्याचे कल हा भारतीय राजकारणातील बदलत्या प्रवाहांचा आरसा आहे. या निकालांकडे वेगवेगळ्या राज्यांच्या चौकटीत पाहणे जितके आवश्यक आहे, तितकेच त्यांना एकत्रित समजून घेणे अधिक महत्त्वाचे ठरते. या चार राज्यांनी दिलेला संदेश बहुपदरी व गुंतागुंतीचा आहे. म्हणूनच तो अधिक बोलका आहे. केरळमध्ये पुन्हा एकदा सत्तांतराचा कल स्पष्टपणे जाणवतो. संयुक्त लोकशाही आघाडी आणि डावी लोकशाही आघाडी यांच्यातील ही पारंपरिक लढत आणि त्यातून दिले गेलेले सत्तांतराचे संकेत हे मतदारांच्या मानसिकतेचे प्रतिबिंब आहे. सत्तेची सूत्रे कायम कोणाही एकाच हाती ठेवायची नाहीत, हा पायंडा केरळच्या मतदारांनी या निवडणुकीतही तंतोतंत पाळला. तामिळनाडूमधील कित्येक दशकांपासून दिसणारा द्रविडीयन राजकारणाचा प्रभाव आणि त्यामधून पोसले गेलेले द्विपक्षीय राजकारण यावेळी ढवळून निघाले आहे. अभिनेता विजय थलपतीचा तमिझगा वेत्री कझगम हा पक्ष या निवडणुकीत समर्थ राजकीय पर्याय म्हणून उभा राहिला आणि प्रस्थापित पक्षांना आव्हान देत त्याने बाजीदेखील मारली. या राज्यातील सत्तांतराचा हा प्रयोग नव्या पक्षाचा उदय तर आहेच. शिवाय, तो पर्यायाच्या शोधात असलेल्या मतदारांच्या मानसिकतेचा आणि इच्छाशक्तीचा पुरावा आहे. राज्यातील नवमतदार, शहरी वर्गाची सजगता आणि परिवारवादी पारंपरिक राजकारणाच्या विरोधात उमटू लागलेली उद्विग्नता यांचा हा परिणाम असावा. आसाममध्ये मात्र स्थैर्याचा वेगळाच सूर ऐकू येतो. येथे भारतीय जनता पार्टीची ताकद निर्विवादपणे वाढत असून हा पक्ष तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करणार आहे. विकास, पायाभूत सुविधांची उभारणी आणि जनतेशी जोडलेले नाते या तीनही घटकांचा हा प्रभाव आहे. पश्चिम बंगाल, केरळ आणि तामिळनाडूत बदलाची लाट असली, तरी आसामच्या जनतेने मात्र सातत्याला कौल देऊन विकासास प्राधान्य दिलेले दिसते. या चार राज्यांचे एकत्रित चित्र पाहिले, तर प्रादेशिक पक्षांची मक्तेदारी संपुष्टात आणून राज्यांना केंद्रातील सत्तेशी जोडत विकासाचे भागीदार बनविण्याची मोदी सरकारची रणनीती मतदारांनी मोठ्या प्रमाणात स्वीकारल्याचे स्पष्ट दिसते. देशाच्या सामाजिक मानसिकतेमध्ये होणारा बदल या निवडणुकांनी ठळकपणे अधोरेखित केला आहे. मतदार अधिक सजग, अधिक प्रयोगशील झाला असून विकास, नेतृत्व आणि राष्ट्रीय अस्मिता या तिन्ही घटकांचा संतुलित विचार करून तो आपला कौल देत आहे, हेदेखील या निकालांतून स्पष्ट झाले आहे. या निवडणुकीत सर्वाधिक चर्चेचा आणि औत्सुक्याचा मुद्दा पश्चिम बंगालच्या निकालांभोवती केंद्रित झाला होता. या राज्याच्या राजकारणाचा प्रवास काँग्रेसच्या वर्चस्वापासून सुरू झाला. पुढे तो मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्या दीर्घकालीन डाव्या सत्तेकडे झुकला आणि नंतर तृणमूल काँग्रेसच्या टप्प्यावर सुमारे १५ वर्षे स्थिरावला. भाजपाच्या विजयामुळे येथील राजकारण राष्ट्रीय दृष्टीने परिपक्वतेकडे जात असल्याचे दिसते. पश्चिम बंगालमध्ये स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या तीन दशकांत काँग्रेसने राज्य केले. १९६० च्या दशकानंतर राजकीय अस्थिरता, नक्षलवादी चळवळ आणि प्रशासनातील ढासळलेली पकड यामुळे काँग्रेसचा प्रभाव कमी होत गेला. औद्योगिक घसरणीची बीजे याच काळात पेरली गेली आणि पुढील अनेक दशके ती राज्याची समस्या बनली. १९७७ मध्ये सत्तेवर आलेल्या डाव्या आघाडीने पश्चिम बंगालच्या राजकारणाला नवा चेहरा दिला. मात्र, ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्याच्या हट्टापायी शेती क्षेत्रावर केंद्रित केलेल्या धोरणांमुळे उद्योगधंद्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष झाले. औद्योगिक विकास खुंटला. रोजगाराच्या संधी कमी झाल्याने तरुणाईत असंतोष वाढला आणि डाव्या सत्तेविरुद्ध तयार झालेल्या जनमताचा फायदा घेऊन परिवर्तनाचा नारा देत २०११ मध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला सत्तांतर घडविणे शक्य झाले. ममता बॅनर्जी यांची धोरणे मोठ्या उद्योगांना आकृष्ट करण्यात अपयशी ठरलीच. शिवाय, भ्रष्टाचार आणि राजकीय हिंसाचाराच्या आरोपांची मोठी काजळी ममता सरकारच्या कारकीर्दीवर उमटली. संतुलित विकासासाठी पश्चिम बंगाल भुकेला आहे, ही बाब नेमकी ओळखून नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने पश्चिम बंगालच्या विकासाची हमी दिल्याने मतदारांनी भाजपाला भरभरून कौल दिला आहे. विजयानंतरच्या आनंदोत्सवात सहभागी झालेल्या मतदारांनी त्याच अपेक्षांचा पुनरुच्चार केल्याने भाजपाला पश्चिम बंगालच्या विकासाचे स्वप्न साकारण्याचे आव्हान पेलावे लागेल. सत्ता बदलण्याचे काम मतदारांनी करून दाखविले आहे. विकासाचा स्थिर आणि सर्वसमावेशक मार्ग शोधण्याची जबाबदारी आता भाजपाची आहे. एका दृष्टीने पश्चिम बंगालमधील भाजपाचा ऐतिहासिक प्रवेश आणि अन्य राज्यांतील परिवर्तनाच्या लाटा पाहता, जनतेला पारंपरिक राजकारणाच्या विभ्रमातून बाहेर पडावयाचे आहे आणि योग्य व समर्थ पर्याय समोर आल्यास परिवर्तनाची संधी साधण्यासाठी समाज उत्सुकही आहे. विधानसभा निवडणुका हा आता केवळ त्या-त्या राज्यांच्या राजकीय विश्लेषणापुरता मर्यादित मुद्दा राहिलेला नाही. देशाच्या दीर्घकालीन राजकारणाचे व दिशेचे नवे संकेतही त्यामध्ये दडलेले आहेत. भाजपाला मिळालेला संकेत स्पष्ट आहे. तो आश्वासक आणि आव्हानात्मकही आहे. काँग्रेस आणि परिवारवादी राजकारण करणाऱ्या पक्षांना या कौलात स्वतःसाठी कोणते संकेत दिसतात आणि त्यांचा ते कसा अर्थ लावतात, यावर देशाच्या राजकारणाची पुढची दिशा ठरेल.

## आंतरराष्ट्रीय

# उत्तर कोरियात महिला उत्तराधिकारी?

**प्रा. जयसिंग यादव**

उत्तर कोरियातील सत्ताकेंद्राच्या आत चालणाऱ्या सूक्ष्म संकेतांची भाषा समजून घ्यायची असेल तर केवळ अधिकृत घोषणा किंवा धोरणे पाहून चालत नाही तर प्रतीके, प्रतिमा आणि सार्वजनिक उपस्थिती यांचे बारकाईने विश्लेषण करावे लागते. किम जोंग ऊन यांची मुलगी किम जू ए ची अलिकडील काळातील सार्वजनिक उपस्थिती आणि पोशाखावरून उभ्या राहिलेल्या चर्चेचा संदर्भ याच चौकटीत समजून घ्यावा लागतो. वरकरणी हा विषय 'फॅशन'शी संबंधित वाटू शकतो; मात्र प्रत्यक्षात तो सत्तेच्या वारशाशी आणि राजकीय संदेशवहनाशी जोडलेला आहे. उत्तर कोरियात पाश्चिमात्य संस्कृतीविषयी कठोर निर्बंध आहेत. २०२० मध्ये लागू करण्यात आलेल्या 'रिॲक्शनरी आयडियोलॉजी अँड कल्चर रिजेक्शन ॲक्ट'अंतर्गत विदेशी पोशाख, शैली आणि सांस्कृतिक प्रभावांवर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. अशा परिस्थितीत किम जू ए वारंवार लेदर जॅकेट, लक्झरी ब्रँडचे कपडे किंवा पाश्चिमात्य हेअरस्टाईलमध्ये दिसणे ही साधी बाब राहात नाही. उलट, ती एक राजकीय 'संकेत-भाषा' बनते. सामान्य नागरिकांसाठी निषिद्ध असलेले सत्ताधारी कुटुंबातील सदस्य खुलेपणाने वापरत असतील, तर त्यातून विशेषाधिकार आणि वेगळेपणाचा संदेश स्पष्टपणे दिला जातो. २०१३ मध्ये जन्मलेली किम जू ए प्रथमच २०२२ मध्ये सार्वजनिकरीत्या दिसली, तेव्हा ती आपल्या वडिलांसोबत आंतरखंडीय क्षेपणास्त्रासमोर फिरताना दिसली होती. ही उपस्थिती केवळ कौटुंबिक क्षण नव्हती, तर ती एक नियोजित राजकीय दृश्यरचना होती. किमला लहान वयातच अशा महत्त्वाच्या क्षणांमध्ये पुढे आणणे, हे तिच्या संभाव्य उत्तराधिकारी म्हणून तयार होण्याच्या प्रक्रियेचा भाग मानले जाते.

अलिकडच्या काळात या मुलीच्या पोशाखात आणि वावरात दिसणारा आत्मविश्वास, हे या प्रक्रियेचे पुढचे पाऊल आहे. विशेष म्हणजे तिच्या कपड्यांमध्ये दिसणारे लक्झरी ब्रँड्स हे केवळ फॅशन निवड नसून सत्तेचे आणि प्रतिष्ठेचे प्रतीक आहेत. साधारण उत्तर कोरियन नागरिकांसाठी असे कपडे उपलब्ध नाहीत. किंबहुना, त्यांची कल्पनाही करणे कठीण आहे. त्यामुळे किम जू एचा प्रत्येक पोशाख तिच्या 'अलिप्त' सामाजिक स्थानाचा पुनरुच्चार करतो. या संदर्भात तिची आई री सोल जू हिची भूमिका महत्त्वाची ठरते. री सोल जू स्वतः पाश्चिमात्य शैलीतील कपड्यांसाठी ओळखली जाते आणि तिच्या माध्यमातून उत्तर कोरियामध्ये 'एलिट फॅशन'ची एक वेगळी प्रतिमा तयार करण्यात आली आहे. किम जू एला तशाच प्रकारच्या पोशाखात सादर करणे, हे केवळ आई-मुलीच्या नात्यापुरते मर्यादित नाही, तर सत्तेच्या सातत्याचा आणि प्रतिमानिर्मितीचा भाग आहे. उत्तर कोरियाच्या राजकारणात 'इमेज रिप्लिकेशन' म्हणजेच प्रतिमेची पुनरावृत्ती ही जुनी आणि प्रभावी पद्धत आहे. पूर्वसुरींच्या प्रतिमेचे अनुकरण करून किम जोंग ऊन यांनी आपल्या नेतृत्वाच्या सुरुवातीच्या काळात जनमानसात आपली ओळख निर्माण केली होती. त्याच धर्तीवर किम जू एला विशिष्ट पोशाख, शैली आणि सार्वजनिक उपस्थितीद्वारे सादर केले जात आहे.



यामुळे जनतेच्या मनात तिची प्रतिमा हळूहळू 'सत्तेची नैसर्गिक वारस' म्हणून तयार केली जात आहे.

या सर्व प्रक्रियेमध्ये 'वर्कर्स पार्टी ऑफ कोरिया' च्या प्रचार यंत्रणेची भूमिका महत्त्वाची आहे. किम जू एला सामान्य नागरिकांपासून वेगळे, विशेष आणि प्रभावशाली दाखवणे हे या यंत्रणेचे उद्दिष्ट असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. लेदर जॅकेट, फर कोट किंवा महागडे पोशाख हे केवळ कपडे नसून सत्तेचे दृश्यमान प्रतीक आहेत. तथापि, या चित्राचा आणखी एक पैलूही आहे. उत्तर कोरियामध्ये पाश्चिमात्य संस्कृतीवर बंदी असली, तरी प्रत्यक्षात बाह्य प्रभाव पूर्णपणे थांबवणे शक्य झालेले नाही. परदेशात काम करणारे कामगार, तस्करीच्या मार्गाने येणारी उत्पादने आणि डिजिटल माध्यमांमुळे लोकांमध्ये विदेशी ब्रँड्स आणि फॅशनची माहिती वाढत आहे. या पृष्ठभूमीवर किम जू एचा 'स्टाईल आयकॉन' म्हणून उदय होणे राजकीयच नव्हे, तर सामाजिक बदलाचेही द्योतक ठरू शकते; मात्र या सर्व चर्चेचा केंद्रबिंदू एकच आहे- सत्ता. उत्तर कोरियामध्ये फॅशन ही वैयक्तिक अभिव्यक्ती नसून सत्तेचे आणि नियंत्रणाचे साधन आहे. किम जू एचे कपडे, तिची सार्वजनिक उपस्थिती आणि तिच्याभोवती तयार होणारी प्रतिमा हे सर्व एकत्रितपणे पाहिल्यास भविष्यातील नेतृत्वाची पायाभरणी असल्याचे स्पष्ट होते. किम जू एच्या फॅशनकडे केवळ 'पाश्चिमात्य प्रभाव' किंवा 'किशोरवयीन बंडखोरी' म्हणून पाहणे हा मोठा गैरसमज ठरेल. ती एक काळजीपूर्वक आखलेली रणनीती आहे. त्यात प्रतिमा, सत्ता आणि वारसा यांचे सूक्ष्म मिश्रण दिसते. उत्तर कोरियाच्या बंदिस्त व्यवस्थेमध्येही बदलाचे संकेत कसे उमटतात, याचे हे एक प्रभावी उदाहरण म्हणता येईल.

उत्तर कोरियामधील सत्ताकारणाची रचना केवळ राजकीय व्यवस्थेपुरती मर्यादित नाही, तर प्रतीक, प्रतिमा आणि नियंत्रित कथानक यांच्या सूक्ष्म गुंफणीतून उभी राहते. अशा व्यवस्थेत एखाद्या व्यक्तीची सार्वजनिक उपस्थिती, तिचे हावभाव, तिचा पोशाख या सर्व गोष्टींना स्वतंत्र अर्थ प्राप्त होतो. वरकरणी हा विषय 'फॅशन'चा वाटत असला, तरी प्रत्यक्षात सत्तेच्या सातत्याचा, उत्तराधिकाराच्या राजकारणाचा आणि राज्य-नियंत्रित प्रतिमानिर्मितीचा भाग आहे. उत्तर कोरिया ही अशी व्यवस्था आहे, जिथे पाश्चिमात्य संस्कृती अधिकृतरीत्या 'विघातक' मानली जाते. २०२० मध्ये लागू करण्यात आलेल्या 'रिॲक्शनरी आयडियॉलॉजी अँड कल्चर रिजेक्शन ॲक्ट'अंतर्गत विदेशी कपडे, चित्रपट, संगीत आणि जीवनशैलीवर कठोर निर्बंध लादले गेले. सामान्य नागरिकांसाठी जीन्स, लेदर जॅकेट किंवा लक्झरी ब्रँड्सचे कपडे केवळ दुर्मिळच नाहीत, तर अनेकदा बेकायदेशीरही मानले जातात. अशा परिस्थितीत किम जू ए वारंवार लेदर जॅकेट, महागडे कोट किंवा पाश्चिमात्य शैलीतील पोशाख परिधान करताना दिसते, ही बाब स्वतःमध्येच एक ठळक राजकीय संदेश बनते. हा संदेश साधा आहे, तो म्हणजे सत्ता आणि सामान्य नागरिक यांच्यातील स्पष्ट भेद. सामान्यांसाठी निषिद्ध आहे, ते सत्ताधारी वर्गासाठी 'विशेषाधिकार' आहे. किम जू एच्या पोशाखातून हा विशेषाधिकार केवळ दिसत नाही, तर तो जाणीवपूर्वक अधोरेखित केला जातो. उदाहरणार्थ, फ्रेंच लक्झरी ब्रँड ख्रिश्चन डायर'च्या महागड्या जॅकेटमध्ये तिची उपस्थिती ही केवळ फॅशन निवड नसून एक प्रतीकात्मक घोषणा आहे.

सत्तेच्या केंद्रात असलेल्यांना वेगळे नियम असतात. किम जू एची शैली काही प्रमाणात अनुकरणीय ठरू शकते. तिच्या पोशाखाची नक्कल करण्याची इच्छा काही लोकांमध्ये निर्माण होत असल्याचे संकेतही दिसतात. हे राज्याच्या कठोर नियंत्रणाला एक सूक्ष्म आव्हान मानले जाऊ शकते; मात्र या सर्व प्रक्रियेत सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'दुहेरी निकष'. सामान्य नागरिकांसाठी जे नियम कठोरपणे लागू केले जातात, तेच नियम सत्ताधारी वर्गासाठी शिथिल असतात. हा विरोधाभास केवळ सामाजिक असमानतेचे प्रतीक नाही, तर सत्तेच्या केंद्रीकरणाचेही द्योतक आहे. किम जू एचे कपडे या विरोधाभासाचे दृश्य रूप बनतात. उत्तर कोरियासारख्या बंदिस्त व्यवस्थेमध्ये बदलाचे संकेत उघडपणे दिसत नाहीत, तर अशा सूक्ष्म गोष्टींमधूनच प्रकट होतात. किम जू एच्या पोशाखातील पाश्चिमात्य छटा, तिची वाढती सार्वजनिक उपस्थिती आणि तिच्याभोवती उभा राहणारी 'विशेषाधिकाराची आभा' हे सर्व मिळून एक मोठी कथा सांगतात. ही कथा केवळ एका मुलीच्या फॅशनची नाही, तर सत्तेच्या सातत्याची, प्रतिमानिर्मितीची आणि भविष्यातील नेतृत्वाच्या तयारीची आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# लोणार सरोवराचे खगोल दर्शन

जागतिक दर्जाच्या लोणार सरोवरात होणारे बदल पाण्याची वाढ अशा वैज्ञानिकदृष्ट्या संशोधन करण्यासाठी गेल्या महिन्यात खगोल दर्शन महोत्सव आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आणि आंतरराष्ट्रीय डार्क स्काय सप्ताहाच्या पृष्ठभूमीवर या महोत्सवात डार्क स्काय संकल्पनेने अंतर्गत दुर्बीणद्वारे तारे व ग्रह निरीक्षण, नक्षत्र दर्शन खगोलशास्त्रीय चर्चासत्रे झालीत; ज्यामुळे खगोल पर्यटनाला मोठी चालना मिळाली. उल्कापातामुळे निर्मित या अद्वितीय विवराचा अभ्यास करणे, प्रकाश प्रदूषणापासून मुक्त ठिकाणी आकाश दर्शन घडवणे, या परिसरात रात्रीचे आकाश स्वच्छ दिसण्यासाठी काही काळ सार्वजनिक विद्युत व्यवस्था बंद ठेवून डार्क स्काय अनुभव देण्यात आला. लोणारला डार्क स्काय साईटचा दर्जा मिळण्याच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे; ज्यामुळे देश-विदेशातील पर्यटक आकर्षित होतील. लोणार सरोवराची निर्मिती अंदाजे ५२ हजार वर्षांपूर्वी उल्कापातामुळे झाली असून हे बेसॉल्ट खडकातील जगातील एकमेव मोठे आघाती विवर आहे. वैज्ञानिकदृष्ट्या या ठिकाणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शासनाच्या पर्यटन विभागाच्या वतीने आयोजित हा महोत्सव पर्यटकांना अवकाशाचे विलोभनीय दर्शन घडविणारा ठरला आहे.

लोणारचा प्रचार आंतरराष्ट्रीय स्तरावर व्हावा यासाठी येथे विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये एमटीडीसी पर्यटक निवास, पर्यटक अभ्यागत केंद्र, तारांगण, प्रयोगशाळा योग केंद्राचा समावेश आहे. लोणार खगोल दर्शन हा उपक्रम केवळ खगोलशास्त्रापुरता मर्यादित नसून तो पर्यावरणाशीही निगडित आहे. शाश्वत पर्यटनाला यामुळे नवी दिशा मिळेल. ज्वालामुखीच्या उद्रेकातून निर्माण झालेल्या महाराष्ट्रातील दख्खन बेसॉल्टच्या पठारावर उल्का आघाताने तयार झालेले हे विवर आहे. काहींच्या मते, यापूर्वी हे ज्वालामुखीच्या केंद्रीय उद्रेकातून तयार झाले असावे. मात्र हे नेमके केव्हा अस्तित्वात आले यावर अद्याप एकमत झालेले नाही. परंतु अलिकडील काळात झालेल्या संशोधनावरून अवकाशातून अतिवेगाने आलेल्या उल्केच्या आघातानेच असे प्रचंड आकाराचे विवर निर्माण होऊ शकते हे तेथील खडक, खनिजे व माती यांच्या नमुना चाचणी अभ्यासातून शास्त्रज्ञांनी सांगितले आहे. लोणार सरोवर निर्मितीचा हा इतिहास असला तरी विवर निर्मितीचे दोन वैज्ञानिक प्रवाह आहेत.

सरोवराची निर्मिती ज्वालामुखीच्या केंद्रीय मुखाने झाली असा सिद्धांत १९११ मध्ये लिहिलेल्या शोधनिबंधात टुशे व ख्रिस्ती यांनी केला आहे. त्यांनी १८४० ते १९१० पर्यंत सर्व शोधनिबंधांचा अभ्यास करून त्याचा आढावा घेतला, परंतु त्यानंतर झिग्रन व राव (१९५४), नंदी व देव (१९६१), बडवे व कुमारन (१९९२) यांनी भूशास्त्रीय, भूवैज्ञानिक व रासायनिक अभ्यास केला. त्यांनी विवर ज्वालामुखीच्या उद्रेकामुळेच झाले हे स्पष्ट केले. यातील वनस्पती मोठ्या प्रमाणात कार्बन डाय ऑक्साईड सोडतात. तो वायू पाण्यात विरघळतो व आम्ल तयार होते. त्याचे हायड्रोजन सल्फाईड्सवर कार्य होऊन सल्फाईड वायू तयार होतो. याच प्रक्रियेतून आम्लारी क्षार तयार होतात. ही क्रिया प्रकाश संश्लेषणेद्वारा होते. त्यामुळेच पाणी अजूनही खारटपणा सोडत नाही, असे संशोधकांचे मत आहे. सरोवराचे पाणी पिण्याला अयोग्य असले तरी त्यात स्नान केल्यावर त्वचेचे अनेक आजार बरे होतात असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. या पाण्यापासून साबण तयार होते. ती स्नानासाठी चांगली असते असेही काहींचे म्हणणे आहे. याचा पुरावा इतिहासात सापडतो. सरोवराची पाणी पातळी प्रचंड वाढली आहे गेल्या दोन वर्षांत झालेल्या अवकाळी पावसामुळे सरोवराची पातळी लक्षणीय वाढली आहे. हवामान बदलामुळे परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे सरोवरात अतिरिक्त पाणी जमा झाले. भूजल पातळीत जाण्याचे मार्ग बंद झाल्याने पाणी साचून राहत आहे. लोणार विकास आराखड्यांतर्गत २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र शासनाने तरतूद केली आहे. या वर्षाकरिता अंदाजे २.२१ कोटी निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. एकूण १५०.८३ कोटी रुपयांचा सुधारित विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. या निधीतून लोणार सरोवर परिसरात पर्यटकांसाठी पायाभूत सुविधा, सौंदर्यीकरण, ऐतिहासिक मंदिरांचे जतन व संवर्धन करण्याचे काम सुरू आहे. जागतिक वारसा स्थळ म्हणून लोणारच्या संवर्धनासाठी आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी हे काम केले जात आहे. उल्कापातातून निर्माण झालेले लोणार सरोवर हे राज्यातील महत्त्वाचे नैसर्गिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळ विकासाला गती देण्यासाठी सर्व कामे निर्धारित कालावधीत व उच्च दर्जाने पूर्ण करावीत असे निर्देश आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांनी वन विभाग, नगर परिषद तसेच महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत..

९८८१७१७८२८

## प्रासंगिक

# व्हॉट्सॲप - एक वैतागवाडी!

**विजय पांढरीपांडे**

सोशल मीडियाचे जसे काही फायदे आहेत, तसे तोटेही आहेत. घ्यायचे ते घ्या, नको ते सोडून द्या असा युक्तिवादही केला जातो. पण नको असलेल्या मेसेजेसमुळे आपली मेमरी वाया जाते त्याचे काय? शिवाय हे फालतू मेसेजेस डिलिट करीत बसणे हा आणखीन एक मोठा उद्योग! त्याने तर बोटे दुखतात. बहुतेक लोक गुड मॉर्निंग, शुभ प्रभातने सुरुवात करून गुड नाईटपर्यंत वैताग आणतात. शिवाय आजकाल धार्मिक व्हिडीओ, एकदम उफाळून आलेले धर्माविषयीचे प्रेम, राष्ट्रभक्ती हे ओघाने आलेच. जणू इथे व्यक्त केल्याशिवाय ते देशभक्त, धर्मनिष्ठ ठरणार नाहीत! आपल्याला आलेले मेसेज दुसऱ्याच्या उपयोगाची असो, नसो ती फॉरवर्ड केलीच पाहिजे असे बहुतेकांना वाटते. त्याशिवाय यांना चैन पडत नाही. मोबाईल पचत नाही! मग काही आंबटशौकीन लोक पी जे पाठवतात. नॉनव्हेज जोक्स, व्हिडीओ देखील पाठवतात. या देवघेवीमुळे म्हातारचळ लागलेल्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढली आहे असे दिसते!

आता व्हॉट्सॲप ग्रुप तयार करणे हा देखील एक रिकामपणाचा उद्योग झाला आहे. त्यात कुटुंबाचा वेगळा ग्रुप. कुटुंबातील विशिष्ट भावा-बहिणींचा वेगळा ग्रुप. ऑफिसचा, मित्रांचा, मैत्रिणींचा, असे वेगवेगळे प्रकार. भाज्यांचे, चटण्या, कोशिंबिरीचे नसतील एव्हढे या ग्रुपचे सबग्रुप असतात. काही माहितीच्या देवाणघेवाणीाठी, तातडीची सूचना पाठविण्यासाठी याचा निश्चितच चांगला फायदा होतो. पण इथेही रिकामटेकडी माणसे गुड मॉर्निंग, गुड नाईटपासून तर फालतू मेसेजेस फॉरवर्ड करीत असतात. शिवाय गणपती, देवी, हनुमान या देवांवरील श्रद्धा भक्ती ही व्हॉट्सॲप फॉरवर्डशिवाय सिद्ध होत नाही अशीही त्यांची गोड समजूत असते. त्यातच हा मेसेज एकवीस जणांना फॉरवर्ड करा, पुण्य मिळेल अशी अंधश्रद्धा देखील इथे फोफावलेली दिसते.

सगळ्यात जास्त वैताग असतो तो विशिष्ट छंद जोपासणाऱ्या मंडळींचा. इथे सिने संगीत, शास्त्रीय संगीत, नाट्यप्रेमी, साहित्यिक, कवी, शिक्षणप्रेमी, कलावंत, चित्रकार अशा छंदिष्ट लोकांचे ग्रुप असतात. इथे कुणी एक जण म्होरक्या पुढारी असतो. त्याला ॲडमिन म्हणतात. हे महाशय आपण एखाद्या मोठ्या आयटी कंपनीचे सीईओ किंवा प्रेसिडेंट वगैरे असल्यासारखे वेगळ्याच तोऱ्यात वागतात. कुणाला घ्यायचे, कुणाला वगळायचे असे एचआर हेडचे अधिकार यांच्या हातात (बोटात) असतात. इथे एकमेकांची स्तुती करणे, तू मला खाजव मी तुला खाजवतो असे परस्पर कौतुक सोहळे चालतात. काही ग्रुपवर तर नळावर बायकांची जशी भांडणे होतात, तसे वाक्युद्ध चालते. यात पक्षीय, जातीय राजकारण आले तर मग विचारायलाच नको. कधी कधी ही वादावादी इतकी टोकाला जाते की ॲडमिन महाशयांना मध्यस्थी करून कुणाला तरी ग्रुपमधून काढावे लागते. कारण इथे मेरे मुर्गीकी एकही टांग असा अट्टहास धरणारी हटवादी, आग्रही मंडळीच जास्त असतात. प्रत्येकाचा इगो सांभाळणे ही ॲडमिनसाठी चक्क तारेवरची कसरत असते. या ग्रुपवर एकाने वाढदिवसाच्या कुणाला शुभेच्छा दिल्या की मग इतरांना तो उपचार पाळणे भाग पडते. तीच कथा कुणी दगावल्याची. मग तुम्ही त्या व्यक्तीला ओळखत नसला, तुम्ही ती व्यक्ती कधी पाहिली नसली तरी ओम शांती, सांत्वना संदेश हे उपचार पाळावेच लागतात. एरवी तुम्ही शिष्ट, अहंकारी ठरता. कुणाला कुठले अवॉर्ड मिळते, कुणाचा कुठे सत्कार होतो तेव्हा ग्रुपवर अभिनंदनाचा वर्षाव सुरू होतो. तेव्हा ग्रुपला ट्रॅक्टरवरून झेंडूच्या पाकळ्यांचा वर्षाव होणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांच्या मिरवणुकीचे स्वरूप येते! इथे अनेक जण आपोआप सुप्रसिद्ध लेखक, वक्ते होतात. कवी मंडळींचे तर विचारूच नका. व्हॉट्सॲप ग्रुपवर अनेकांना प्रतिभेचे गरुड पंख फुटतात. मग कौतुकाची थाप देण्याचे उपचार प्रत्येकाला पाळावे लागतात. स्तुतिपाठक एकमेकांना आवडतात. बाकीचे शिष्ट, मग्रूर म्हणून तांदळातल्या खड्यासारखे बाहेर पडतात, फेकले जातात.

काही जणांना मोठमोठ्या पोस्ट पाठवून व्यक्त व्हायचा उमाळा येतो या ग्रुपवर. घरी एकमेकांशी न बोलणारी मंडळी इथे मात्र नको तितकी ॲक्टिव्ह असतात. घरातील समस्या त्यांच्या कानी देखील नसतात. पण इथे मत द्यायला, उपदेश करायला ते एकदम विचारवंत होतात.

आपल्या लेखनाचे, छंदाचे, कौतुक करवून घ्यायला लोकांना व्हॉट्सॲप ग्रुप हे फुकटचे व्यासपीठ मिळाले असते. त्यामुळे इथे प्रत्येकाला स्वतःची जाहिरातबाजी करण्याची हौस भागवता येते. कधी कधी याचा इतका अतिरेक होतो की काही मंडळी स्वतःचे हसे करून घेतात. पण त्याची त्यांना खबरबात देखील नसते. हे मेसेजेस बघण्यात, डिलिट करण्यात, त्यावर व्यक्त होण्यात आपला किती अमूल्य वेळ खर्च होतो याचे आपल्याला कुणालाच भान नसते. यातून काहीच साध्य होत नाही. थोडेफार मनोरंजन होत असेल कुणाचे. ज्याला टाईमपास म्हणतात ते साधत असेल कुणासाठी. पण काही थोडे चांगल्या माहितीच्या देवाणघेवाणीतून होणारे अपवाद सोडले तर कुणाच्याच पदरी काही पडत नाही. हा वेळ आपण चांगले पुस्तक वाचण्यासाठी, चांगले गाणे ऐकण्यासाठी, चांगला सिनेमा, एखादे नाटक बघण्यासाठी, आपल्या घरी मुलांशी गप्पा मारण्यासाठी, कौटुंबिक समस्या सोडविण्यासाठी, काही नवे शिकण्यासाठी, आपला राहून गेलेला छंद जोपासण्यासाठी सहज घालवू शकतो. खरे तर ते जास्त गरजेचे असते आपल्यासाठी. पण आपल्यालाच काय हवे, काय गरजेचे आहे हे कळेनासे झाले आहे. आपली स्थिती भरकटलेल्या वाटसरूसारखी झाली आहे. हातचे सोडून पळत्याच्या मागे लागणाऱ्या वेड्यासारखी आपली केविलवाणी स्थिती झाली आहे. या नव्या तंत्रज्ञानात सगळेच काही वाईट नाही. महत्त्वाच्या बातम्यांची देवाणघेवाण, प्रत्यक्ष जाऊन आमंत्रण देण्यापेक्षा इथे टाकून वेळेची बचत, काही चांगल्या माहितीत भर, असे मोजके फायदे देखील आहेत. पण या आदानप्रदान होणाऱ्या माहिती जंजाळात खरे काय, खोटे काय, कामाचे उपयोगाचे काय, फेक काय हे समजणे फार कठीण झाले आहे. यात टाईमपासपेक्षा (टाईम वेस्ट), वेळेचा दुरुपयोग जास्त आहे हे निश्चित. हे महाभारतातील चक्रव्यूहासारखे आहे. आत शिरणे तसे सोपे, पण त्यातून बाहेर येणे तितकेच कठीण!

७६५९०८४५५५

### ऊन-वादळी वाऱ्याचा खेळ

राज्यातील अनेक भागांत सध्या हवामानाचा अनिश्चित खेळ सुरू असून कडक उन्हासोबत अचानक येणारे वारे आणि बदलते वातावरण यामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. एप्रिल-मे महिन्यात अपेक्षित असलेली स्थिर उष्णता यंदा वाऱ्याच्या झटक्यांनी आणि तापमानातील चढ-उतारांनी बाधित झाली आहे. परिणामी शेतीपिकांवर गंभीर परिणाम दिसून येत आहे. भाजीपाला बागायती पिकांना या बदलत्या हवामानाचा फटका बसत आहे. जोरदार वाऱ्यामुळे फळांची गळती होत असून कडक उन्हामुळे पिकांची वाढ खुंटते आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या खर्चाने उभे केलेले पीक काही तासांतच नुकसानग्रस्त होत असल्याने आर्थिक संकट अधिक गडद होत आहे. हवामानातील हा बदल केवळ नैसर्गिक नाही तर दीर्घकालीन पर्यावरणीय असंतुलनाचाही परिणाम आहे. वाढते तापमान, जंगलतोड आणि बदललेले पर्जन्यमान यामुळे ऋतूंचा ठरलेला क्रम ढासळत आहे. याचा सर्वात मोठा फटका शेती क्षेत्राला बसत आहे, जे आधीच अनेक अडचणींना सामोरे जात आहे.

सरकारकडून तत्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे गरजेचे आहे. त्याचबरोबर हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना, जसे की संरक्षित शेती, जलसंधारण आणि हवामान-स्मार्ट तंत्रज्ञानाचा वापर, यावर भर देणे आवश्यक आहे. आज गरज आहे ती केवळ मदतीची नाही, तर शाश्वत शेती व्यवस्थेची. अन्यथा ''उन्ह वाढली-वाऱ्याचा खेळ हा केवळ हवामानाचा विषय न राहता शेतकऱ्यांच्या आयुष्याचा कायमचा प्रश्न ठरेल.

**मुनिश्वर मलेवार**/देव्हाडा

### बालसुरक्षेसाठी समन्वय आणि जागरूकता अपरिहार्य

महिला-बाल अपराध प्रतिबंध विभागाच्या अहवालानुसार अलिकडील काळात बालकांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये झालेली वाढ हे वृत्त वाचनात आले. बदलती कुटुंबव्यवस्था, पालकांची व्यस्त जीवनशैली आणि तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव यामुळे बालसुरक्षेबाबतचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे झाले आहेत. शासन विविध योजना आणि कायदे राबवत असले तरी त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसह समाजातील सर्व घटकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

शाळांमध्ये बालसुरक्षा शिक्षण तसेच मुलांना योग्य-अयोग्य स्पर्शाची जाणीव करून देणे ही काळाची गरज आहे. बालसुरक्षा ही केवळ शासनाची जबाबदारी नसून पालक, शाळा, समाज आणि प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच ती सुनिश्चित होऊ शकते.

**विश्वनाथ पंडित**/ठाणे

## वाचक पत्रे

### भारतीय रेल्वे

भारतीय रेल्वे ही जगातील सर्वात मोठ्या रेल्वे नेटवर्क पैकी एक आहे. नेटवर्कच्या बाबतीत भारतीय रेल्वे जगात चौथ्या क्रमांकावर आहे. गरीब श्रीमंत सर्वांना परवडणारी आणि सर्वांना सामावून घेणारी असल्याने भारतात दररोज लाखो नागरिक भारतीय रेल्वेने प्रवास करण्यास पसंती देतात.

ही पसंती लक्षात घेता रेल्वे देखील प्रवाशांना वेगवेगळ्या सुविधा देते. गेल्या काही वर्षांत रेल्वे प्रवास जास्त आरामदायी, जलद गतीने आणि स्वस्तात व्हावा यासाठी वेगळे उपक्रम रेल्वे राबवित आहे. काही सुविधा मोफत आहेत त्या आपण जाणून घेऊन त्याचा फायदा करून घ्यावा. ऑनलाइन बूकिंग असल्यास वेळीच अपडेट्स दिल्या जातात. एसी प्रवासात बेडरोल सेवा पूर्वीपासून दिली जाते. मोफत वैद्यकीय सेवा तसेच कोणताही समस्या उद्भवल्यास १३९ या क्रमांकावर कॉल केल्यास त्वरित कर्मचारी हजर होतो आणि समस्येचे निराकरण होते. डिजिटल सेवा, ई कॅटरिंग सेवेद्वारे प्रवाशांना जागेवरच दर्जेदार अन्न मिळण्याची सुविधा उपलब्ध आहे. टॉयलेट्स बऱ्यापैकी स्वच्छ असतात. अशा अनेक आपल्याला माहीत नसलेल्या सुविधा भारतीय रेल्वे आपल्याला पुरवत असते.

बऱ्याच सुविधा आधीपासूनच आहेत. परंतु त्याबाबत रेल्वे अधिक दक्ष झालेली आढळून येते. या बाबतीत आपण कृतज्ञ असले पाहिजे. प्रवासी म्हणुन आपलीही काही जबाबदारी असते ह्याचे प्रत्येकाने भान ठेवावे. काही दुष्प्रवृत्तीचे नागरिक रेल्वेतील सीट फाडणे, तोडफोड करणे, अस्वच्छता पसरविणे, विनाकारण साखळी ओढणे, प्लास्टिक बॉटल, खाद्यपदार्थ किंवा चॉकलेटचे

वेष्टन, चहा कॉफीचे ग्लास, कागदी प्लेट्स इत्यादी इत्यादी कचरा सर्रास पायाखाली टाकलात किंवा खिडकीतून बाहेर फेकतात. सर्व बोगीत. डस्ट बीन्स असतात. त्याचा वापर करावा. छोट्या छोट्या गोष्टीत स्वतःला वळण लावावे. आपली रेल्वे आपली जबाबदारी या धारणेतून प्रवास केल्यास प्रवास अधिक आनंददायी आणि सुखकर होईल. गरज आहे फक्त जबाबदार, सुजाण नागरिक बनण्याची.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# हत्यांच्या पार्श्वभूमीवर शहर भाजपाकडून निवडणूक विजयाचा साधेपणाने आनंदोत्सव

## • श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या स्वप्नपूर्तीकडे भाजपाची वाटचाल सुरुय : रोहिणी तडवळकर •

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे झालेली निष्पाप बालिकेची हत्या आणि सोलापूर शहर जिल्ह्यात विविध घटनांमध्ये झालेल्या खूनांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीने सोमवारी पश्चिम बंगाल, आसामसह विधानसभा निवडणुकांमध्ये मिळवलेल्या यशाचा आनंद अत्यंत साधेपणाने साजरा केला.

भारतीय जनता पार्टी सोलापूर शहर कार्यालयासमोर भाजपाचा ध्वज फडकावून कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी भारतमाता की जय, वंदे मातरम, जय श्रीराम, भारतीय जनता पार्टीचा विजय असो, देश का नेता कैसा हो नरेंद्र मोदी जैसा हो अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर म्हणाल्या, पश्चिम बंगालची जनता संकटाच्या कचाट्यातून सुटली आहे. भाजपाचा विजय म्हणजे श्यामाप्रसाद मुखर्जी यांना खरी श्रद्धांजली ठरणार आहे. संपूर्ण देशात भाजपाची सत्ता यावी हे शामाप्रसाद मुखर्जींचे स्वप्न साकार करण्याकडे भाजपची वाटचाल होत आहे. नसरापूर येथील निष्पाप बालिकेच्या हत्येची तसेच शहर जिल्ह्यात झालेल्या सहा हत्यांच्या प्रकरणाची जाणीव ठेवून भारतीय जनता पार्टीने ढोल, ताशे, मिठाई अशा स्वरूपाचा आनंदोत्सव न करता अत्यंत साधेपणाने एकमेकांना अभिनंदन करून आनंद साजरा केला आहे.



महापौर विनायक कोंड्याल म्हणाले, भारतातील जनतेचा विश्वास भारतीय जनता पार्टीवर आहे. याचे प्रत्यंतर या विधानसभा निवडणुकांच्या निकालाने पुन्हा एकदा आलेले आहे. भारताला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकार विकासाच्या शिखरावर नेईल, असा विश्वास सर्व जनतेला आहे. हाच विश्वास या निवडणुकांच्या निकालातून स्पष्ट झाला आहे, असेही महापौर विनायक कोंड्याल याप्रसंगी म्हणाले.

यावेळी भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, रामचंद्र जन्नू, माजी आमदार नरसिंग मेंगजी, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, भारतीय जनता युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष विजय कुलथे, भाजपाचे सरचिटणीस डॉ. शिवराज सरतापे, मंडल अध्यक्ष नागेश सरगम, महेश देवकर, शहर चिटणीस रवी भवानी, बजरंग कुलकर्णी, नगरसेविका कल्पना कदम, नगरसेवक प्रशांत पल्ली, विजय चिप्पा, राजकुमार पाटील, भरतसिंग बडूरवाले, बिज्जू प्रधाने, समाधान आवळे, सात्विक बडवे, रवी कैय्यावाले, ऋषिकेश मेट्रे, मेघनाथ येमुल, नागनाथ कासलोलकर, संगीता जाधव, श्रीदेवी फुलारे, मंदाकिनी तोडकरी, विजया वड्डेपल्ली, दीपिका यलदंडी, सत्यनारायण गुर्रम, गौतम कसबे, रुद्रेश बोरामणी, जाकीर सगरी, शिरीष गायकवाड, विजय महिंद्रकर, दोडमणी, श्वेता खरात, मृण्मयी गवळी, बसवराज केंगनाळकर, जकप्पा कांबळे, कविता गज्जम, सतीश महाले, ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष राजू हिबारे, अल्पसंख्यांक महामंत्री आदम शेख, व्यापारी आघाडी अध्यक्ष लक्ष्मीकांत खंडेलवाल, विश्वनाथ प्याटी, विजय धोत्रे, ओंकार होमकर आदी उपस्थित होते.

### मृतांना वाहिली श्रद्धांजली

नसरापूर येथील बळी पडलेल्या निष्पाप बालिकेला तसेच शहर जिल्ह्यात झालेल्या खुनांच्या घटनातील मृतांना यावेळी भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एक मिनिट मौन राहून श्रद्धांजली वाहिली.

# रुद्देवाडीजवळ एसटी-डंपरची धडक; दोन ठार, आठ जखमी

## मृतात अल्पवयीन मुलीचा समावेश

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि ४ मे-**





दुधनी-अक्कलकोट रस्त्यावरील रुद्देवाडी गावाजवळील बस स्टॉप समोर एस टी बस ( क्र . एम एच १ ३ सी यु ८३३९ ) व डंपर (क्र. एम एच ०७ ए यु ३९६० ) यांची आज सोमवारी धडक झाली. भीषण अपघातात २ जण जागीच ठार झाले तर ८ जण जखमी झाले. सोमवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेची नोंद दक्षिण पोलिस ठाण्यात झाली आहे.

अपघातामध्ये चंद्रकला लाडाप्पा हडपद (वय १६ रा. चिक्केहळ्ळी ता. अक्कलकोट) व चांगदेव श्रीरंग लवटे (वय ७८ रा. डुक्करवाडी सुकटा ता. भूम जि. धाराशिव) हे जागीच ठार झाले. मनोज मधुकर उगले (वय ३१ रा वाशिम) शिवानंद चंद्रकांत बजे (वय ४० रा. सदलापूर ता. अक्कलकोट), लाडाप्पा मल्लप्पा हडपद (वय ३९ रा. चिक्केहळ्ळी) अमिना इब्राहिमसाब ओतीहाळ (वय ५० रा. माशाळ) विठ्ठल मनोज उगले (वय ४ रा. वाशिम), गजानन पंडीत कोलंदरे (वय १६ रा. वाशिम), निकीता पंडीत कोलंदरे (वय १८ रा. वाशिम). प्रियंका लाडाप्पा हडपद (वय ११ रा. चिक्केहळ्ळी) हे बसमधील प्रवासी जखमी झाले आहेत. एसटी बस दुधनी ते अक्कलकोट मार्गावरुन जासत असताना रुद्देवाडी बसस्टॉप जवळ आली असता समोरुन टाटा मोटार कंपनीचे डंपरवरील चालक अजयकुमार अर्जुन यादव (रा. पद्मा जि. पलामू राज्य झारखंड) याने डंपरवरील नियंत्रण सुटले. डंपर भरधाव वेगाने चालवुन बसला उजव्या बाजूने जोरदार धडक दिली.

घटनेची एसटी चालक फिर्याद ज्योतीराम चव्हाण ( वय ३९. रा. डिकसळ ता. कळंब जि. धाराशिव) यांनी दिली. तपास सपोनि माने हे करत आहेत.

# ‘इखलास’मुळे गैरसमज दूर होण्यास मदत होईल : अय्यूब अहमद नल्लामंदू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

‘इखलास’ ह्या पुस्तकामुळे समाजात असलेले गैरसमज दूर होतील, असे प्रतिपादन ज्येष्ठ उर्दू मराठी साहित्यिक अय्यूब अहमद नल्लामंदू यांनी केले. ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्थेच्या वतीने पुस्तक प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी निलोफर फणीबंद होते.

यावेळी प्राचार्य शकील शेख, प्राचार्य डॉ इ. जा. तांबोळी, प्राचार्य अनिस सिकंदर, साबीर सोलापूरी, हसीब नदाफ, प्रा डॉ. इस्हाक मुजावर, मजहर अल्लोळी, प्रा दस्तगीर जमादार, जाफर बांगी, मीर अफजल, इकबाल बागबान, फखरोदीन शेख, जिलानी जहागीरदार आदी उपस्थित होते.



मान्यवरांच्या हस्ते वृक्षला जल अर्पण करून याचे उद्घाटन करण्यात आले. उपाध्यक्षा अनिसा शेख यांनी प्रस्ताविक केले.

सुरय्या जहागीदार व खाजाभाई यांनी स्वागत केले. समाजाची सकारात्मक बाजू आपल्या लेखणीतून आली पाहिजे, अशी अपेक्षा कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. फणीबंद यानी व्यक्त केले. शेवटी गझलकार बदिऊज़्ज़म ां बिराजदार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कवी संमेलनात राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व राष्ट्रीय एकात्मता या विविध विषयावर निलोफर फणीबंद, अनिसा शेख, प्रा. बी. एच. करजगीकर, कवि जाफर बांगी, प्राचार्य शकील शेख, तहसीन सय्यद, खाजा भाई बागबान, अय्यूब अहमद, नूर जहां शेख यांनी दाद मिळविली. तहसीन सय्यद यांनी सूत्रसंचालन तर नूरजहा शेख यांनी आभार मानले.

### बोरामणी तिहेरी हत्याकांड प्रकरण

# पाच आरोपींना ८ मे पर्यंत पोलीस कोठडी

**सोलापूर :** बोरामणी येथील भावजय व दोन मुलांच्या निर्घृण हत्याकांड प्रकरणी अटक केलेल्या पाच आरोपींना आज सोमवार रोजी दुपारी येथील न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सर्व आरोपींना ८ मे पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

राणी शंकर मस्के, दीक्षा शंकर मस्के, धीरज शंकर मस्के, सूरज माधवराव मोरे व सचिन शिवाजी वाघमारे (सर्व रा. बोरामणी, दक्षिण सोलापूर) अशी पोलीस कोठडी सुनावलेल्या आरोपींची नावे आहेत. बोरामणी येथील मस्के वस्तीवर दोन मेच्या पहाटे हे हत्याकांड झाले होते. याप्रकरणी वरील आरोपीवर सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला होता. वरील आरोपींना तालुका पोलिसांनी रविवारी अटक केली होती. मुख्य आरोपी शंकर याचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. तपास पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे हे करीत आहेत.

# नराधमाच्या प्रतीकात्मक पुतळ्याचा संभाजी आरमारने केला ‘चौरंगा’

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ मे-**

नसरापूर येथे चिमुकल्या मुलीवर अमानुष अत्याचार करून खून करणाऱ्या नराधमाचा प्रतिकात्मक चौरंगा करून संभाजी आरमारने निषेध आंदोलन केले.



कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त करत आरोपीच्या प्रतीकात्मक पुतळ्याचा भरचौकात ’चौरंगा’ (हातपाय तोडणे) करून आपला रोष व्यक्त केला. आरम ारच्या कार्यकर्त्यांनी आरोपीच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. या प्रकरणाचा तपास जलद गतीने करून खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्यात यावा.

यावेळी शशिकांत शिंदे (उपाध्यक्ष), गजानन जमदाडे, सागर ढगे, सागर संगवे, संध्या हेब्बाळकर, गव्हाणे, गीता पवार, अश्विनी गायकवाड, कविता पाटसकर शोभा घंटे, लक्ष्मीबाई कोळी, राज जगताप, तेजस चौधरी, रेवन कोळी, अर्जुन शिवशिंगवाले, द्वारकेश बबलादीकर, अविनाश विटकर, स्वप्निल इराबत्ती, प्रवीण मोरे, सुधाकर करणकोट, संजय तुळशीगार, बाळासाहेब वाघमारे, अमित जाधव, प्रदीप मोरे आदी उपस्थित होते.

## हिंदू जनजागृती समितीतर्फे धर्म संस्कार शिबीर उत्साहात

**सोलापूर, दि. ४ मे-**

हिंदू जनजागृती समितीच्यावतीने शहरात विविध ठिकाणी १५-३० वयोगटातील धर्मप्रेमींसाठी हिंदू धर्म संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. प्रथम शिबीर दि.२४ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत बत्तुल क्लासेस, साई मंदिर चौक, ७० फूट रोड येथे संपन्न झाले. शिबीरात कुंकू लावण्याचे धर्मशास्त्र, नमस्कार करण्याची योग्य पध्दत, चार युगांचे महत्व, पितृदोष निवारण्यासाठी दत्त नामजप, वास्तुशुध्दीचे उपाय तसेच हिंदू वीरांगणांचे प्रेरणादायी कार्य अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले आहे. शिबिरात हिंदू जनजागृती समितीचे संकेत पिसाळ, राजश्री देशमुख, सुखदा ग्रामोपाध्याये, शिवलीला गुब्याड, दत्ता पिसे, यश मुगड्याल यांनी मार्गदर्शन केले.

## रखमाबाई हत्तुरे महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९३.५ टक्के

**सोलापूर, दि. ४ मे-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या वतीने फेब्रुवारीमध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेत रखम ाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९३.५७ टक्के लागला असून विज्ञान शाखेचा १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ७७.४१ टक्के लागला. विज्ञान शाखेत प्रथम सिध्देश्वर वाकडे ७९.१ टक्के, द्वितीय अथर्व माने ८.३३ टक्के, तृतीय वैभवी हिरेमठ ७.१७ क्रमांक मिळविले. कला शाखेत प्रथम सुशांत वग्गे ७४.०० टक्के, द्वितीय अंजली पवार ७१.८३ टक्के, तृतीय विजयालक्ष्मी लाड ०.१ टक्के क्रमांक मिहविले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक सर्व प्राध्यापकांचे, संस्थेचे संस्थापक अप्पासाहेब हत्तुरे व उपाध्यक्ष सिध्दप्पा वरनाळ, सचिव नागप्पा सिंदगी, माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, धरेप्पा हत्तुरे, मुख्याध्यापक रमेश दिंडोरे यांनी अभिनंदन केले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** : डि।। व सब डि।। सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी महानगरपालिका हद्दवाढमधील कसबे सोलापूर येथील पुणे गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ, पुणे यांचे मार्फत जुळे सोलापूर भाग-२, हैदराबाद रोड येथील विडी घरकुलमधील घरकुल गाळा क्र. १९२४ यांसी सोडत नं. २९५७ व अर्ज नं. २४६४ दि. २१/०४/१९८८ रोजीच्या मंजूर आदेशानुसार येणेप्रमाणे गाळा मिळकतीची चतुःसिमा :- पुर्वेस - घरकुल गाळा नं. १९२३, पश्चिमेस - घरकुल गाळा नं. १९२५, दक्षिणेस - घरकुल गाळा नं. १९४९, उत्तरेस - ६मी. रुंदीचा रस्ता येणेप्रमाणे ही मिळकत लक्ष्मीबाई नारायण नल्ला यांना मिळालेली असून त्यानुसार त्यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची होती, सदरची मिळकत लक्ष्मीबाई नारायण नल्ला यांनी विक्रीस काढण्याचे ठरवून त्यानुसार आमचे अशिलांकडून मोबदला स्विकारुन मिळकत विक्री केली होती. त्यानुसार दि.१२/०२/१९९२ रोजी लक्ष्मीबाई नारायण नल्ला यांनी आमचे अशिलाच्या हक्कात खरेदीखत लिहून दिलेले आहे.

त्यानुसार सदरहू खरेदीखताप्रमाणे आमचे अशिल हे पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ सोलापूर येथील दप्तरी आमच्या अशिलाच्या नावाची नोंद होणेकरीता म्हणून रितसर अर्ज दाखल करणार आहेत. तरी सदर घरकुल मिळकतीबाबत कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, दान, लिज, टाच, गहाण, जप्ती, बोजा, इसारापावती साठेखत, खरेदीखत, कब्जापावती, पोटगी, करार, मदार, इत्यादी प्रकारचे हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यानिशी लेखीस्वरुपात खालील पत्यावर तसेच पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ सोलापूर यांच्या कार्यालयाकडे हरकत नोंदवावी. मुद्रतीत कोणाचेही, कसलीही हरकत/तक्रार न आल्यास सदरहू घरकुल मिळकत हि निर्वेध, निजोखीम आहे असे समजून पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ सोलापूर हे त्यांचे दप्तरी आमचे अशिलाच्या नावाची नोंद करतील. तद्नंतर येणाऱ्या हरकती चालणार नाहीत. कोणाचीही कसलीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहिर नोटीस देत आहे, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली दि. /०५/२०२६

**सही/-**
**श्री. अश्विन एस. कोंगारी**
**ॲडव्होकेट, बी.कॉम., एलएल.बी.**
**पत्ता - प्लॉट नं. २३, नवनाथ नगर, आकाशवाणी केंद्र रोड, सोलापूर**
**मो.नं. ९८९०५०३२८१**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



### जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १६/२०२६
नि. ६

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो।, कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

**श्री. सय्यद मकदूम हुसेनी अकबर हुसेनी जहागीरदार उर्फ तेकब-हाणा**
रा. नागनहळ्ळी, ता. अक्कलकोट — **अर्जदार**
विरुध्द
**कोणीही नाही** - **सामनेवाला**

ज्याअर्थी वरील अर्जदारांने अक्कलकोट येथील दिवाणी न्यायालयात मयत बहिण अमीरबी फकीरबाशा जुन्नदी यांचा मृत्यू दि.१६/०८/२०१३ रोजी व अमीरबी फकीरबाशा जुन्नदी हिचे पती दि.११/१२/२००६ रोजी राहत्या घरी मौजे गुलबर्गा, कर्नाटक राज्य येथे मयत झाले असून, त्यांचे अंत्यविधी देखील तेथेच झाला आहे. मयताचे नावे डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर, तालुका अक्कलकोट, जिल्हा सोलापूर पैकी मौजे नागनहळ्ळी येथील शेतजमीन गट नं.६९/१ यांसी क्षेत्र ०७ हेक्टर ०७ आर व पो.ख. ०.२४ आर, यांसी आकारणी १६.०५ या मिळकती ह्या मयताच्या पश्चात अर्जदार यांच्या नावे होण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार व सामनेवाला यांना मयताचे वारसाचा दाखला (लिगल हेअर सर्टिफिकेट) देण्याबाबत कोणाची कसलीही हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर नेमलेली तारीख १२/०६/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावेत. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

आज दि. ०२/०५/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. हे जाहीर प्रसिध्दीकरण केले दिनांक ०२/०५/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सह. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकोट**



### जाहीर नोटीस

**ॲड. दिपक भास्कर केसकर**
बी.ए., एल.एल.एम (ॲडव्होकेट)
प्लॉट नं. ९ प्राची अपार्टमेंट, गांधी नगर,
२२४/९ सिव्हील लाईन सोलापूर ४१३००३

**सोलापूर येथील मे. लवाद अधिकारी श्री. संजय आर करवा साहेब यांचे न्यायलयात**

श्री अरुणोदय मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर ... अर्जदार/वादी
विरुद्ध
श्री. वाधवा सुनिल भजनलाल - वगैरे ३ ... जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ०२/२०२५ | **नं : ३ वाधवा विजया भजनलाल** ३५४ पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२ | ४५,३६,२६१/- | १४/०५/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. ३ यांना मे. कोर्टातून पाठवलेले नोटीस नं. ३ ची नोटीस घर सोडून गेल्याच्या कारणाने परत आल्यामुळे नं. ३ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट अर्जदारास आलेला नाही या कारणाने परत आल्यामुळे नं. ३ यांची सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दिष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमूद केलेल्या तारखेदिवशी वार - गुरुवार, दिनांक १४/०५/२०२६ सकाळी ११.३० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे. सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३०/०४/२०२५ रोजीचे मा.लवाद अधिकारी साहेब यांच्या हूकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

शिक्का

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**श्री अरुणोदय मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर**

**ठिकाण :-** श्री अरुणोदय मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर.
**कार्यालय :-** प्लॉट नं. ७७, भाग्यलक्ष्मी पार्क, जुळे सोलापूर, जि. सोलापूर - ४१३००४



### मंगळवेढा नगरपरिषद, मंगळवेढा

**विद्युत विभाग**

**शुध्दीपत्रक**

**ई-निविदा सूचना जा.क्र./कार्या-५/विद्युत/५९५/२०२६-२७**

मंगळवेढा नगरपरिषदेकडील ई-निविदा सूचना जा.क्र. कार्या-५/विद्युत/५९५/२०२६-२७ दिनांक २२/०४/२०२६ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या https://mahatender.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) दिनांक २७/०४/२०२६ रोजी खालील १ से ३ कामे प्रसिध्द करण्यात आले होते.

| अ.न. | कामांचे नाव |
|---|---|
| १ | विद्युत विभागाकडे आवश्यकतेप्रमाणे इलेक्ट्रीक साहित्य पुरवठा करणे तसेच इलेक्ट्रीक कामे करणे. |
| २ | मंगळवेढा नगरपरिषद येथे कुशल, अर्धकुशल व अकुशल कंत्राटी पध्दतीने विद्युत विभागाकडे विविध कामे करण्याकरीता कर्मचारी पुरवठा करणे. |
| ३ | मंगळवेढा नगरपरिषद विद्युत विभागाकडे विद्युतीकरणाच्या कामांचे रेखा नकाशे तयार करणे, अंदाजपत्रक तयार करून त्यास मजीप्रा/सार्व. बांधकाम कार्यालयाकडील तांत्रिक मंजूरी घेणेकामी विद्युत अभियंता/कन्सलटिंग इंजिनिअर यांची टक्केवारी फी पध्दतीने नेमणूक करणे |

तरी वरील कामाचे निविदामध्ये खालील अट समाविष्ठ करण्यात येत नाहे.

१) मा. मुख्याधिकारी सो. नगरपरिषद मंगळवेढा यांचेकडून कामांचा स्थळ पाहणी दाखला घेणे बंधनकारक राहील. तसेच वरील १ ते ३ कामांना दिनांक ०८/०५/२०२६ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

**सही/-**
**(सुमित जाधव)**
**मुख्याधिकारी**
**मंगळवेढा नगरपरिषद**



अुत्तम सेवा | मंगळवार दि. ५ मे २०२६ | नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **१)** | **आदिवासी विकास विभाग** | | | |
| | चौकीदार (४१६ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | १८/०५/२६ |
| **२)** | **राष्ट्रीय पात्रता चाचणी परीक्षा, NET** | | | |
| | सहा. प्राध्यापक | पदव्युत्तर पदवी किंवा ॲपिअर असणारे स्त्री/पुरुष उमेदवार | - | २०/०५/२६ |
| **३)** | **रिझर्व बँक ऑफ इंडिया, RBI** | | | |
| | ऑफिसर (६० पदे) | पदवी (६०%) गुणांसह उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | २०/०५/२६ |
| **४)** | **युनियन बँक ऑफ इंडिया, UBI** | | | |
| | ॲप्रेंटिस (१८६५ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार | २८ पर्यंत | १९/०५/२६ |
| **५)** | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC (मुदतवाढ)** | | | |
| | संयुक्त सेवा पूर्व परिक्षा-२०२६ गट-ब (५५२ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार किंवा ॲपिअर असावे | ३८ पर्यंत ३१ पर्यंत | १४/०५/२६ |
| **६)** | **केंद्रीय राखीव पोलीस बल CRPF** | | | |
| १ | वाहन चालक (३१७६ पदे) | दहावी व जड वाहन परवाना असावे | २७ पर्यंत | १९/०५/२६ |
| २ | ट्रेडसमन (५९२० पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | |
| **७)** | **चलन नोट मुद्रणालय** | | | |
| १ | ऑफिस असिस्टंट (२२ पदे) | पदवी व इंग्रजी टायपिंग असावे | २५ पर्यंत | १९/०५/२६ |
| २ | ज्युनियर टेक्निशियन (४०८) | ITI (इले/इलेक्ट्रॉ /मशिनिस्ट / एसी / फिटर / प्रिंटींग / प्लेट मेकर / केमिकल) | २५ पर्यंत | |
| ३ | सुपरवायझर (९९ पदे) | पदवी/पदविका (६०%) (कॉम्प्यु/ आय.टी / मेकॅ/ एसी/ इले/ इलेक्ट्रॉ/ सिव्हील) | ३० पर्यंत | |
| **८)** | **स्टाफ सिलेक्शन कमिशन, SSC** | | | |
| १ | स्टेनोग्राफर (७३१ पदे) | बारावी व स्टेनो उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | १५/०५/२६ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ‘‘जॉईन’’ असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

**सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.**
**२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)**
**३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.**

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा
१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर.
वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org

ममता बॅनर्जी यांना शह देण्यासाठी निवडणूक आयोग आणि भारतीय जनता पक्ष, मोदी आणि शाह यांनी एसआयआरच्या नावाखाली जवळपास ९० लाख मते मतदार यादीतून काढली. याचा परिणाम निकालावर होतो.
- **संजय राऊत**, खासदार


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

**सोलापूर**, मंगळवार, ५ मे २०२६ **६**


बारामतीत सुनेत्रा पवार जिंकल्या, हे मी मान्य करते. मात्र, 'हार कर जीतने वाले को बाजीगर कहते हैं' ही भावना माझ्या मनात आहे. उमेदवारी अर्ज वैध ठरल्याच्या क्षणापासूनच मी स्वतःला विजयी समजलं होतं. मते किती मिळाली याला अर्थ नाही.
- **करुणा मुंडे**, सामाजिक कार्यकर्ती



तृणमूल काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर हताश झालेला ममता बॅनर्जींचा समर्थक

# भाजपाचा विस्तार बिहार ते बंगाल

**पश्चिम बंगाल**



बालुरघाट येथे आनंद व्यक्त करताना भाजपा कार्यकर्ते

**भगीरथ मोदींचा करिष्मा**

### अंग, बंग आणि कलिंग

**पंतप्रधान मोदी भाषणात नेहमीच अंग, बंग आणि कलिंगचा उल्लेख करतात. हा केवळ एक भौगोलिक शब्द नाही. भाजपाच्या पूर्व भारतातील व्यूहरचनेतील महत्त्वाचा भाग आहे. भाजपाने बिहारमध्ये आपली मुळे मजबूत केली. ओडिशात प्रथमच सत्ता मिळवली. मात्र, बंगाल त्यांच्यासाठी सहजसोपा नव्हता. अखेर या राज्यातही भाजपाने सत्ता मिळवली आहे.**



◆ **नवी दिल्ली, ४ मे**

श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे स्वप्न नरेंद्र मोदी यांनी पूर्ण केले आहे. भाजपा पहिल्यांदाच बंगालमध्ये सरकार स्थापन करीत आहे. भाजपाची निवडणुकीची गंगा पाटण्याच्या समोर नेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भगीरथ प्रयत्न सर्वांनी पाहिले आहे. भाजपा गंगोत्री धामच्या उत्तराखंडात अगोदरच सत्तेत आहे. मग भाजपाचा झेंडा उत्तरप्रदेश आणि बिहारमध्ये येऊन थांबला. आता बंगालनंतर संपूर्ण पूर्वेत भाजपा नवीन अध्याय लिहिण्यास सज्ज आहे.

सोमवारी सकाळी बंगाल विधानसभेचे निकाल समोर येणे सुरू झाल्यावर भाजपाची सत्ता येणार हे चित्र दुपारपर्यंत स्पष्ट झाले. मुख्यमंत्रिपद कुणाला दिले जाईल केवळ इतकीच चर्चा कोलकाताच्या कालीघाट ते दिल्लीच्या दीनदयाल उपाध्याय मार्गापर्यंत नव्हती, तर भारतातील या सर्वांत भीषण राजकीय युद्धाचा परिणाम लोकशाहीवर काय होईल, यावरही मंथन केले जात होते. बंगालमधील निवडणूक केवळ एका राज्यातील नव्हती, तर ती दोन विचारधारा, दोन अस्मिता आणि दोन महाशक्तींमधील युद्ध होते. यामुळे भारतीय राजकारणाची व्याख्या बदलली आहे.

बिहार निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर दिल्लीतील भाजपा मुख्यालयात पंतप्रधानांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले, त्यावेळी हा विकासाचा विजय असल्याचे म्हटले होते. पाटण्यातील विजयाच्या गंगेचा प्रवाह आता बंगालकडे वळवायचा आहे, असे त्यांनी म्हटले होते. त्यावेळी नरेंद्र मोदी यांनी केलेली ही एक घोषणा नव्हती, तर ती एक विचारपूर्वक आणि सुनियोजित राजकीय खेळी होती, हे आता स्पष्ट झाले आहे.

बिहारमधील रालोआच्या विजयानंतर भाजपाचा आत्मविश्वास दुणावला होता. मात्र, गंगेसाठी पुढचा रस्ता सहजसोपा नाही, हे मोदींना माहीत होते. त्यांचे भगीरथ प्रयत्न त्याच दिवसापासून सुरू झाले. बंगाल हे भाजपासाठी केवळ एक राज्य नाही, तर मिशन असल्याचे त्यांनी सांगितले होते. गंगेला जमिनीवर आणण्यासाठी भगीरथाने ज्या प्रकारे कठोर प्रयत्न केले, तसेच नरेंद्र मोदी यांनी बंगालमध्ये सत्ता मिळवण्यासाठी केले.

(वृत्तसंस्था)

## बंगालमध्ये विजयी मिरवणुकांना परवानगी नाही

◆ **कोलकाता, ४ मे**

पश्चिम बंगालमध्ये २९३ विधानसभा जागांसाठी मतमोजणी होत असल्याने सोमवारी राज्यात उमेदवारांच्या विजयी मिरवणुकांना परवानगी दिली जाणार नाही, असे या राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी मनोज अग्रवाल यांनी सांगितले.

मतमोजणी सुरळीत पार पडली आणि राज्यात कोणत्याही हिंसाचाराची नोंद झालेली नाही, असे त्यांनी सांगितले. कोणत्याही विजयी मिरवणुकांना परवानगी देऊ नये, असा निर्देश आम्ही सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या निवडणुका उद्यापासून काढण्याची परवानगी दिली जाईल. आम्हाला निवडणुकीनंतरचा कोणताही हिंसाचार नको आहे. त्यामुळे सर्वांनी शांत राहावे आणि शांतता राखावी, असे आवाहन आम्ही करतो, असे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले. विजयी मिरवणुका काढण्यासाठी राजकीय पक्षांनी स्थानिक पोलिस ठाण्यांकडून परवानगी घेणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



भोपाळ येथे झालमुडीचे वितरण करताना भाजपा समर्थक

भारतीय जनता पार्टीच्या शानदार विजयानंतर गुवाहाटी येथे पारंपरिक भजनाचे आयोजन केले होते





पारंपरिक नृत्य सादर करीत विजयाचा आनंद साजरा करताना गुवाहाटी येथील भाजपा कार्यकर्ते



# ममता बॅनर्जींच्या घराबाहेर 'जय श्रीराम'च्या घोषणा

◆ **कोलकाता, ४ मे**

प. बंगालमध्ये भाजपाचा विजय निश्चित होताच मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या सुप्रीमो ममता बॅनर्जी यांच्या घराबाहेर 'जय श्रीराम'च्या घोषणा देण्यात आल्या. पराभवाच्या गर्तेत गेल्यानंतर येथील तृणमूल काँग्रेसचे कार्यालय सामसूम झाले.

पक्ष १०० जागांसाठी संघर्ष करीत असल्याचे स्पष्ट होताच तृणमूल काँग्रेसचा एकही मोठा नेता पक्ष कार्यालयाकडे फटकला नाही. कार्यकर्त्यांनीही कार्यालयापासून अंतर ठेवले. येथे शुकशुकाट होता. दुसरीकडे ममता बॅनर्जी यांच्या घराबाहेर वेगळेच वातावरण होते. साधारणपणे येथे तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची मोठी गर्दी असते. मात्र, आज तेथेही शुकशुकाट होता. दुसरीकडे भाजपा कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला होता. त्यांनी ममता बॅनर्जी यांच्या घरासमोर 'जय श्रीराम'च्या घोषणा दिल्या. कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून ममता बॅनर्जी यांच्या सुरक्षेत असलेल्या पोलिसांनी त्यांना तिथून जाण्यास सांगितले. (वृत्तसंस्था)



हावडातील शिब्बूर येथे आनंद व्यक्त करताना भाजपा कार्यकर्ते

**तामिळनाडू**

# ५९ वर्षांनंतर टीव्हीकेच्या विजयचा उदय

## मतदारांनी शोधला द्रविड राजकारणाच्या दोन स्तंभांमध्ये एक नवा पर्याय

◆ **नवी दिल्ली, ४ मे**

तामिळ चित्रपट सुपरस्टार आणि नव्याने स्थापन झालेल्या तामिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) पक्षाचे संस्थापक जोसेफ विजय चंद्रशेखर यांच्या चेन्नई येथील निवासस्थानी आनंदाचे वातावरण आहे. राज्यातील राजकारणात एखाद्या चित्रपट ताऱ्याचा उदय होणे ही काही नवीन गोष्ट नाही. मतदारांनी द्रविड राजकारणाच्या दोन स्तंभांमध्ये एका नवा पर्याय शोधला आहे.

१९६७ पासून तामिळनाडूचे राजकारण हे द्रविड मुन्नेत्र कळघम (डीएमके) आणि अखिल भारतीय अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम (एआयएडीएमके) या दोन प्रमुख द्रविड स्तंभांपुरते मर्यादित राहिले आहे. अभिनेते-राजकारणी विजय ज्याप्रकारे आता राजकारणाच्या केंद्रस्थानी येत असल्याचे दिसत आहे, त्यावरून राज्याचे राजकारण एका नव्या वळणावर असल्याचे सूचित



होते. ही केवळ सत्ता बदलाची शक्यता नाही, तर मतदारांच्या मानसिकतेतील एका खोलवरच्या स्थित्यंतराचे प्रतिबिंबही आहे.

द्रविड राजकारण हे नेहमीच सामाजिक न्याय, प्रादेशिक ओळख आणि कल्याणकारी योजनांशी जोडले गेले आहे. परंतु काळानुसार प्रत्येक विचारप्रणालीला नव्या संदर्भांशी जुळवून घ्यावे लागते. मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील डीएमके सरकारने अनेक योजना राबवल्या. परंतु, शासन म्हणजे केवळ योजनांचा विस्तार करणे नव्हे. त्यासाठी विश्वासाचे सातत्यही आवश्यक असते. अलिकडच्या काळात, वाढलेले वीज दर, मालमत्ता कर आणि शहरी गोंधळ यांसारख्या समस्यांचा सामान्य नागरिकांच्या जीवनावर थेट परिणाम झाला आहे. जेव्हा हे छोटे असंतोष एकत्र येतात, तेव्हा ते सत्ताविरोधी लाटेचा एक प्रबळ प्रवाह बनतात.

### चित्रपटातील लोकप्रियतेपासून ते राजकीय आधारापर्यंत

**अशा वातावरणात, विजय आणि त्यांचा पक्ष टीव्हीके यांचा उदय ही केवळ एक राजकीय घटना नसून सामाजिक मानसशास्त्राचा परिणाम आहे. विजयची लोकप्रियता चित्रपटांपासून सुरू झाली, पण त्याने ती केवळ पडद्यापुरती मर्यादित ठेवली नाही. त्याचा चाहतावर्ग हळूहळू एका संघटित राजकीय आधारात रूपांतरित झाला.**

डीएमकेमधील घराण्याच्या वाढत्या प्रभावानेही प्रश्न निर्माण केले आहेत. उदयनिधी स्टॅलिन यांचा झपाट्याने झालेला उदय हे राजकीय संधींचे समान वाटप होत आहे की नाही, हे दर्शवतो. राजकारणात वारसा ही काही नवीन गोष्ट नाही, पण जेव्हा तो गुणवत्तेवर भारी पडतो, तेव्हा जनतेचा विश्वास डगमगू लागतो. त्याचबरोबर, धार्मिक मुद्द्यांवरील काही विधानांनी लोकसंख्येचा एक मोठा वर्ग अस्वस्थ केला आहे. (वृत्तसंस्था)

**केरळ**

# पिनाराई विजयन यांच्या १० वर्षांच्या राजवटीचा अंत

## देशातील एकमेव साम्यवादी सरकारही कोसळले

◆ **तिरुवनंतपुरम, ४ मे**

केरळमध्ये यूडीएफच्या लाटेसमोर एलडीएफचे बालेकिल्ले कोसळल्याने सलग तिसरे सरकार स्थापन करण्याचे पिनाराई विजयन यांचे स्वप्न भंगले आहे. देशातील एकमेव साम्यवादी सरकार कोसळले आहे. यासोबतच, विजयन यांच्या दशकाहून अधिक काळाच्या राजवटीचा अंत झाला आहे.



कोणतीही सत्ताविरोधी लाट नसल्याचा एलडीएफने वारंवार दावा केला असला तरी निवडणुकीच्या निकालांनी एक वेगळेच चित्र समोर आणले आहे. अंतर्गत कलह असूनही सीपीएमला सत्ता टिकवून ठेवण्याचा विश्वास होता. तथापि, सुरुवातीपासून मतमोजणीच्या ट्रेंडने चित्रच बदलले. कमकुवत होत असलेला बालेकिल्ला यूडीएफचा निर्णायक विजय हा केरळच्या राजकारणातील एक मोठा टर्निंग पॉइंट ठरला आहे. यामुळे पिनाराई विजयन यांच्या वर्चस्वाच्या युगाचा प्रभावीपणे अंत झाला आहे.

पिनाराई विजयन जवळपास एक दशकापर्यंत सरकार आणि सीपीएम या दोन्हींचा निर्विवाद चेहरा होते. राज्यभरातील निवडणूक प्रचारात त्यांच्या प्रतिमेचे वर्चस्व होते. या पराभवामुळे पक्षांतर्गत त्यांचा प्रभाव लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो. पिनाराई विजयन त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे अनेकदा चर्चेत राहिले आहेत. त्यांची वक्तव्ये, जी उद्धट किंवा अपमानकारक म्हणून मोठ्या प्रमाणावर टीकाग्रस्त झाली. त्यामुळे त्यांची एक हुकूमशाही नेता म्हणून प्रतिमा तयार झाली. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी पक्षांतर्गत विरोध मोठ्या प्रमाणावर दडपला असला तरी, आता जनमत बदललेले दिसते. (वृत्तसंस्था)

### विरोधी पक्षाचे नेतृत्व कोण करणार?

**विरोधी पक्षाचे नेतृत्व कोण करणार याबाबत अनिश्चितता आहे. पिनाराई विजयन स्वतः ही भूमिका स्वीकारतील की नाही, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. जर त्यांनी माघार घेतली, तर सीपीएमचे ज्येष्ठ नेते के. एन. बालागोपाल हे एक प्रबळ दावेदार मानले जात आहेत. मंत्री पी. ए. मोहम्मद रियास हे देखील एक संभाव्य पर्याय म्हणून पुढे आले आहेत. विशेषतः जर तरुण नेतृत्वाला प्राधान्य दिले गेले तर हा निर्णय मोठ्या प्रमाणावर पक्षातील अंतर्गत घडामोडी आणि उदयास येणाऱ्या गटांच्या प्रभावावर अवलंबून असेल.**



थलपती समर्थक

# उमरेठमध्ये भाजपाचे हर्षद परमार विजयी



**गुजरात**

◆ **आणंद, ४ मे**

गुजरातच्या उमरेठ विधानसभा जागेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपाचे उमेदवार हर्षद परमार यांनी काँग्रेसचे त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी भृगुराजसिंह चौहान यांचा ३० हजारांपेक्षा जास्त मतांच्या फरकाने पराभव करीत विजय मिळवला.

निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरील आकडेवारीप्रमाणे परमार यांना ८५,५०० मते मिळाली, तर चौहान यांना ५४,७५७ मतांवर समाधान मानावे लागले. तीन अपक्ष तसेच इतर एक उमेदवार मोठ्या प्रमाणावर मागे पडले. त्यांना हजार मतांचा पल्लाही ओलांडता आला नाही. ६ मार्च रोजी हृदयविकाराच्या झटक्याने तत्कालीन भाजपा आमदार गोविंद परमार यांचे निधन झाल्याने २३ एप्रिल रोजी ही पोटनिवडणूक पार पडली.

भाजपाने त्यांचा मुलगा हर्षद परमार यांना उमेदवारी दिली होती आणि ही त्यांची पहिलीच निवडणूक होती. काँग्रेसचे उमेदवार चौहान यांनी २००० ते २०१५ या काळात सलग ती कार्यकाळांसाठी उमरेठ तालुका पंचायतीचे अध्यक्षपद भूषविले होते. (वृत्तसंस्था)

# ख्रिश्चन उमेदवाराकडून मुस्लिम नेत्याचा पराभव



◆ **मलप्पुरम, ४ मे**

केरळ विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफने मोठा उलटफेर घडवला आहे. सत्ताधारी लेफ्ट डेमोक्रॅटिक फ्रंटला पराभवाला सामोरे जावे लागले. दरम्यान, मुस्लिम-बहुल मलप्पुरम मतदारसंघातील निकालही आश्चर्यकारक आहे.

मलप्पुरम विधानसभा मतदारसंघ हा मुस्लिमबहुल मतदारसंघ आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, येथील ७०.२% लोकसंख्या इस्लाम धर्माचे पालन करते, तर हिंदू केवळ २७.६% आहेत. ख्रिश्चनांची संख्या तर जेमतेम १.९% आहे. विशेष म्हणजे, हा मुस्लिम बहुल मतदारसंघ ख्रिश्चन उमेदवार पी. के. कुन्हालीकुट्टी यांनी जिंकला आहे. कुन्हालीकुट्टी यांनी इंडियन युनियन मुस्लिम लीगच्या तिकिटावर निवडणूक लढवली. इतकेच नाही, तर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) तिकिटावर निवडणूक लढवणारे मुस्लिम उमेदवार मुजीब रहमान यांचा पराभव केला.

मुस्लिम लीगचे पी. के. कुन्हालीकुट्टी यांना १,१३,००० मते मिळाली होती. तर, दुसऱ्या क्रमांकावर आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुजीब रहमान यांना केवळ ४०,००० मते मिळाली. या जागेवर भाजपाच्या उमेदवार अश्वथी गुप्तकुमार तिसऱ्या क्रमांकावर राहिल्या. (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### पिलीवच्या ओम गाटेला बारावी परीक्षेत ९१.६७ टक्के गुण



**पिलीव दि ४ मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव ओम सचिन गाटे याने बारावी परीक्षेत ९१.६७ टक्के गुण संपादन करीत दैदीप्यमान यश संपादन केले. तो सध्या पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. पिलीवसारख्या ग्रामीण भागातून पुणे सारख्या शहरात जात त्याने हे यश संपादन केले. ओम हा माळशिरस तालुका शिक्षक पतसंस्थेचे संचालक सचिन गाटे यांचा मुलगा आहे. ओमच्या यशाबद्दल माळशिरस पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी, पिलीव येथील माजी विद्यार्थी संघटना आठवणी ९५ तसेच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे.



### विद्यार्थ्यांनो मोठी स्वप्नं बघा

**राहुल शहा; दामाजी महाविद्यालयात गुणवंताचा सत्कार**

**मंगळवेढा, दि. ४ मे-**

विद्यार्थ्यांनी मनाला चौकट न घालता कान आणि डोळे उघडे ठेवून मोठे स्वप्न बघितले पाहिजे. ते स्वप्न सत्यात कसे उतरेल यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजे असे मत श्री विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष राहुल शहा यांनी व्यक्त केले. श्री संत दामाजी महाविद्यालयात बारावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. बारावी बोर्ड प्रमाणपत्र परीक्षेत शास्त्र विभागातून प्रथम प्रिती हंगरगे, द्वितीय अमर मनगेनी, तृतीय दिक्षा ढगे, वाणिज्य विभागातून प्रथम गार्गी माने, द्वितीय ज्ञानेश्वर लुगडे, तृतीय सोनम जाधव तर कला शाखेतून प्रथम गौरव राठोड, द्वितीय यशश्री चंदनशिवे, तृतीय अस्मिता जगताप आदी गुणवंत विद्यार्थ्यांचा महाविद्यालयातर्फे अध्यक्ष राहुल शहा, प्राचार्य औदुंबर जाधव, उपप्राचार्य राजेंद्र गायकवाड यांच्या हस्ते सत्कार झाला. प्राचार्य औदुंबर जाधव आणि उपप्राचार्य राजेंद्र गायकवाड यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. गुणवंत विद्यार्थ्यांनी यशामध्ये महाविद्यालयाचा मोठा वाटा असल्याचे सांगत सर्व शिक्षकांचे आभार मानले. तसेच वरिष्ठ विभागातील इतिहास विभागाची विद्यार्थिनी प्रज्वला क्षीरसागर हिचा मीरा-भाईंदर मुंबई पोलिसपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सर्व पदाधिकारी, सभासद यांनी अभिनंदन केले . यावेळी पालक, शिक्षकवर्ग उपस्थित होता. प्रा. विनायक कलुबर्मे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.



### सांगोला विद्यामंदिरमध्ये वासंतिक वर्गाचे उद्घाटन

**सांगोला, दि.४ मे -**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला येथे नव्याने ५ वीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वासंतिक वर्गाचे उत्साहात उद्घाटन झाले. यावेळी गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास पालक व विद्यार्थ्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केला. याप्रसंगी प्राचार्य बिभीषण माने, उपमुख्याध्यापक चारुदत्त जगताप, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक काकासाहेब नरुटे, प्रदीप धुकटे उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे स्वागत बिस्किटे वाटून करण्यात आले. बलून्स डेकोरेशन व सेल्फी पॉईंटमुळे विद्यार्थी आनंदित झाले. प्राचार्य बिभीषण माने यांनी शाळेत पाल्यांना प्रवेश घेतल्याबद्दल पालकांचे आभार मानले. पालकांमधून महादेव घोंगडे, अमृता येलपले यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक नरेंद्र होनराव, सूत्रसंचालन वैभव कोठावळे यांनी केले. आभार काकासाहेब नरुटे यांनी मानले.

### मंगळवेढा बसस्थानकावरुन बेपत्ता झालेली विवाहिता सापडली

**मंगळवेढा, दि.४ मे -**

मंगळवेढा एस.टी. बसस्थानकावरुन बेपत्ता झालेल्या २५ वर्षीय विवाहितेचा शोध घेण्यात महिला पोलीस हवालदारांना यश आले आहे. त्यांनी तरुणीला आई-वडिलांच्या ताब्यात दिले आहे. दि. १६ एप्रिल रोजी दुपारी १.१५ वाजता मंगळवेढा बसस्थानकावरुन ही २५ वर्षीय विवाहित तरुणी आईसोबत माहेरी जाण्यासाठी मंगळवेढा बसस्थानकावर आली होती. सोलापूर एस.टी.बस लागल्यानंतर आई बस मध्ये चढत असताना तरुणी गर्दीत अचानक गायब झाली. तिच्या आईने सर्वत्र शोध घेतला, मात्र ती मिळून न आल्याने मंगळवेढा पोलिसात मिसींग दाखल करण्यात आले होते. बेपत्ता तरुणीचा तपास महिला पोलीस हवालदार सुनिता चवरे ह्या करीत होत्या. त्यांनी मोबाईल लोकेशनवरुन तिचा पत्ता काढला असता ती तरुणी तुळजापूर येथे असल्याच निष्पन्न झाले. तदनंतर तिला मंगळवेढा पोलीस स्टेशनला आणून तिचा जबाब नोंदविण्यात आला. जबाबात तिने मी तुळजापूरला देवीच्या दर्शनाला गेल्याचे म्हटले आहे. तदनंतर सदर विवाहित तरुणीने पतीकडे न जाता आईकडे माहेरी जाणे पसंत केल्याने तिला तिच्या आईच्या ताब्यात देण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## निधन वृत्त...

### उस्मान मुल्ला



**सोलापूर, दि. ४ मे-**

अक्कलकोट तालुक्यातील कुरनूर येथील मूळ रहिवासी व सध्या सोलापूर सिद्धेश्वर नगर भाग -४ नई जिंदगी येथील व जिल्हा परिषद शाळेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक उस्मान अहमद मुल्ला (वय ८७) यांचे रविवार दि. ३ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर मोदी कब्रस्तान येथे सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाठीमागे एक मुलगा, दोन मुली सुना -नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते नुरूद्दीन मुल्ला यांचे ते वडील होते.

# 'वर्क फ्रॉम व्हिलेज'ने ग्रामीण आर्थिक सबलीकरण शक्य

## डॉ. अनिल काकोडकर; स्वेरीत अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटरचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ मे -**

'डिजिटल तंत्रज्ञाना'मुळे 'वर्क फ्रॉम होम' प्रमाणेच 'वर्क फ्रॉम व्हिलेज' ही संकल्पना प्रत्यक्षात साकारता येईल. त्याम ाध्यमातून ग्रामीण आर्थिक सबलीकरण शक्य असल्याचे मत अणुशास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. अनिल काकोडकर यांनी व्यक्त केले. गोपाळपूर येथील स्वेरी महाविद्यालयात आयोजित 'अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटरच्या उदघाटन प्रसंगी डॉ. काकोडकर मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार समाधान आवताडे हे होते.

'संकल्पने पासून ते शेवटच्या ग्राहकापर्यंत एखादी गोष्ट पोहोचवण्याचा प्रवास म्हणजेच इनोव्हेशन होय. औद्योगिक युगात 'शहराकडे चला' अशी मानसिकता निर्माण झाली होती, मात्र आजच्या ज्ञानयुगात ग्रामीण भागातील तरुणांना शहराप्रमाणे साधने उपलब्ध करून दिल्यास देशाची आर्थिक विषमता कमी होऊन खऱ्या अर्थाने प्रगती साधता येणे शक्य आहे. इनोव्हेशन पुढे नेण्यासाठी पूरकवातावरण निर्मिती करणे आवश्यक असून शहरापेक्षा ग्रामीण भागात इनोव्हेशन इकोसिस्टमनिर्माण करणे अवघड आहे. पण, हे करणे महत्वाचे असाल्याचे ठाम मत यावेळी काकोडकर यांनी व्यक्त केले.

या वेळी एसीआयसीचे सल्लागार व सोबस इन्साईट फोरमचे संस्थापक दिग्विजय चौधरी, एसीआयसी स्वेरीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष भुतडा, सल्लागार रेशा पटेल आदींनी मार्गदर्शन केले.

आमदार समाधान आवताडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली संशोधन क्षेत्रात विशेष निधी उपलब्ध करून दिला आहे. यासाठी नाविन्यपूर्ण विचार पुढे येण्याची गरज आहे. कमी वेळेत उत्कृष्ठ उत्पादन झाल्यास निश्चितपणे स्वप्नातील भारत अवतरणार आहे. भारताच्या जडणघडणीत शास्त्रज्ञ डॉ. काकोडकर यांचा मोलाचा वाटा आहे. जर देशाची पाच ट्रिलीयन डॉलर इकॉनॉमी करायची असेल तर नवनवीन तंत्रज्ञान, प्रयोगांची निर्मिती, संशोधन झाले पाहिजे.

यावेळी स्वेरीचे सर्वेसर्वा डॉ.बी. पी.रोंगे, सुयशा काकोडकर, डॉ. जान्हवी गांगल, तन्मय मुखर्जी, अनघा पाठक, महेश पाठक, शरद भोसले, स्वप्नील कांबळे, आर्ट ऑफ लिव्हिंगचे डॉ. म ाधव पोळ, कामगार आयुक्त दत्ता पवार, पांडुरंग साखर कारखान्याचे संचालक दिलीप गुरव, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वंदना बीडकर, अनिता पवार, विलास मस्के, आर्किटेक्ट यादगिरी कोंडा, शेतकरी, महिला बचत गटातील महिला वर्ग, प्रशासकीय व सामाजिक क्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी, स्वेरीचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ.सुरज रोंगे, माजी अध्यक्ष व विश्वस्त प्रा.सी.बी.नाडगौडा, धनंजय सालविठ्ठल, विश्वस्त एन.एम. पाटील, विश्वस्त एच. एम.बागल,विश्वस्त बी.डी. रोंगे, स्वेरी अंतर्गत असलेल्या पाचही महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्या, अधिष्ठाता, विभागप्रमुख, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या केंद्रासाठी डॉ.हर्षवर्धन रोंगे हे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.

सूत्रसंचालन डॉ.नीता तळवलकर यांनी केले. डॉ. प्रशांत पवार यांनी आभार मानले.

**स्वेरीतील केंद्र अनुकरणीय मॉडेल बनेल**

डॉ.काकोडकर म्हणाले की, 'पंढरपूरमध्ये औद्योगिक वसाहत निर्माण झाल्यास येथील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पंढरपूरसारख्या ग्रामीण भागाचा विकास झपाट्याने होईल. ज्या ठिकाणी आर्थिक विषमता कमी होते, तेथील विकास झपाट्याने होतो. एकूणच स्वेरीतील एसीआयसी केंद्र भविष्यात अनुकरणीय मॉडेल बनेल.'

# पिलीवमधील अनधिकृत होर्डिंग्ज ताबडतोब हटविण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि ४ मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय आहे. महाविद्यालयाच्या इमारतीसम ोरच अनधिकृत होर्डिंग्ज लावण्यात येतात. ती काढण्याची मागणी शिक्षकांसह नागरिकांकडून केली जात आहे.

विद्यालयात पाचवी ते आठवीचे वर्ग भरतात. हे विद्यालय बसस्थानकापासुन हाकेच्या अंतरावर आहे. विद्यालयाची सुसज्ज इमारत आहे. परंतू गेल्या काही वर्षांपासून विद्यालयासमोरच अनधिकृत अनेक होर्डिंग्ज लावले जातात. यामुळे बसस्थानकावरुन




विद्यालयाची इमारत सुद्धा दिसत नाही. विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचे होर्डिंग्ज लावायलाही जागा याठिकाणी ठेवलेली नाही. विद्यालयात सीसीटीव्ही कॅमेरे असूनही अनधिकृत होर्डिंग्जमुळे त्याचे रेकॉर्डिंग सुद्धा करता येत नाही. या होर्डिंग्जमुळे विद्यालयच दिसत नाही. विद्यालयात चोरी होण्याची शक्यता वाढली आहे. शाळा सुरु असताना विद्यार्थी सायकल गेटसमोर लावतात. त्या ठिकाणाहून अनेकदा सायकलच्या चोऱ्या झालेल्या आहेत. परिणामी विद्यालयासमोरील अनधिकृत होर्डिंग्ज ताबडतोब हटविण्याची मागणी ग्रामविकास अधिकारी व प्रशासक तसेच पिलीव पोलीस स्टेशनकडे करण्यात आली आहे.

**होर्डिंग्जबाबतची नियमावली फक्त कागदावरच**

पिलीव येथील अनधिकृत होर्डिंग्जबाबत ग्रामपंचायतीने परवानगी घेऊन होर्डिंग्ज लावणे. तसेच ते किती दिवस ठेवायचे याबाबत नियमावली केली होती. मात्र ती नियमावली कागदावरच राहिल्याचे दिसत आहे.

# माचणूर-रहाटेवाडी रस्त्याची दुरवस्था; दुरुस्तीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ४ मे**

माचणूर ते रहाटेवाडी हा डांबरी रस्ता पुर्णत: उखडला आहे. संपूर्ण खडी वर आल्याने मोटर सायकलस्वार व पादचाऱ्यांना येणे जाणे मुश्किल बनले आहे. अधिकाऱ्यांचे या रस्त्याकडे लक्ष आहे की नाही? असा संताप नागरिक व्यक्त करत आहे.

माचणूर ते रहाटेवाडी हे ८ कि.मी. अंतर असून हा रस्ता डांबरी रस्ता आहे. सध्या या रस्त्याची खडी संपूर्ण पृष्ठभागावर आली आहे. अवजड वाहने येणे जाण्यामुळे अधिकच खडी वर आल्याने मोटरसायकल स्वार व पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. अनेक महिन्यापासून रस्त्याची ही वस्तुस्थिती असताना या रस्त्याकडे अधिकाऱ्यांचे लक्ष नसल्याचे दिसून येत आहे.



सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे तात्काळ रस्ता दुरुस्त होणे अपेक्षित आहे. भविष्यात पावसाळा सुरु होणार असल्यामुळे तो करणे अशक्य बनणार आहे. त्यामुळे तात्काळ अधिकाऱ्यांनी या रस्त्याचे काम सुरु करावे अशी मागणी होत आहे.

दरम्यान तालुक्यामधील अनेक रस्त्यांची खूपच वाईट अवस्था बनली असून याकडे कोणाचेही लक्ष नसल्यामुळे हे रस्ते दुरुस्त कधी होणार? याबाबत प्रश्नांचा भडीमार होत आहे. सोलापूर-मंगळवेढा राष्ट्रीय महामार्ग सोडला तर ग्रामीण भागातील तालुक्याला जोडणारे रस्ते पुर्णत: खराब झाले आहेत. याचीही दुरुस्ती होणे तितकेच महत्वाचे आहे.

# बार्शीत महिलेच्या घरावर संशयास्पद हालचालींचा प्रकार

**अज्ञात संशयित ताब्यात; डायल ११२ वर कॉल व पोलिसांची तत्पर कारवाई, पाच मिनिटांत मदत**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि ४ मे-**

बार्शी शहरातील भैरवनाथ हौसिंग सोसायटी परिसरात राहणाऱ्या एका वकील महिलेच्या घरासमोर मध्यरात्री संशयास्पद हालचालींचा प्रकार घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सदर प्रकरणी पोलिसांनी तत्परता दाखवत एका संशयित इसमास ताब्यात घेतले आहे.

उज्वला ज्ञानदेव फरतडे (वय ४५, व्यवसाय वकील, रा. भैरवनाथ हौसिंग सोसायटी, गाडेगाव रोड, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून, त्या ४ मे रोजी रात्री २.३० वाजण्याच्या सुमारास आपल्या घरी झोपलेल्या असताना त्यांच्या घराचा दरवाजा कोणीतरी जोरात ठोठावला. त्यांनी दरवाज्याजवळ जाऊन कोण आहे? अशी विचारणा केली, मात्र समोरुन कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

या घटनेमुळे घाबरलेल्या फरतडे यांनी समोर राहणारे तानाजी काशीद यांना फोनद्वारे माहिती दिली. त्यानंतर त्यांनी तत्काळ पोलीस ठाण्याच्या लँडलाईन क्रमांकावर संपर्क साधून घडलेला प्रकार सांगितला. पोलिसांकडून मदत पाठविण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. दरम्यान, त्यांनी २.४८ वाजता डायल ११२ वर कॉल केला असता अवघ्या काही मि निटांत पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घराबाहेर येऊन फरतडे यांच्याशी संपर्क साधला. त्यावेळी शेजारी तानाजी काशीद व त्यांच्या पत्नीही तेथे उपस्थित होते.

फरतडे यांनी पोलिसांना जवळील चौडेश्वरी मंदिर परिसरात संशयित इसम असल्याची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी त्या इसमास ताब्यात घेतले. घटनास्थळी पाहणी केली असता, घराच्या दरवाज्यावरील पडदे व रॉड काढून फेकल्याचे दिसून आले. तसेच बाहेर उभी असलेल्या स्कुटीची हवा सोडण्यात आली होती आणि कुत्र्याला ठेवलेली भांडीही अज्ञात इसमाने नेल्याचे निदर्शनास आले.

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या इसमाचे नाव निखिल दराडे असल्याची प्राथमिक माहिती मिळाली असून, तो नेमक्या कोणत्या उद्देशाने आला होता, याचा तपास सुरू आहे. हा प्रकार कोणाच्या सांगण्यावरुन झाला का, याचाही शोध घेतला जात आहे.

सदर प्रकरणी भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ अंतर्गत कलम ३०३(२), ३२४, ३२९(३) व ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करत आहे.

### विद्यानिकेतन हायस्कूलमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

विद्यानिकेतन हायस्कूल, हिंगुलांबिका प्राथमिक शाळा व बालक मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बापू ढगे होते. तर प्रशालेचे वरिष्ठ लिपिक सुधाकर महिंद्रकर व उत्कृष्ट खेळाडू ऋतुजा भास्कर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

मुख्याध्यापक गोपीनाथ नवले यांनी प्रास्ताविक केले. सहशिक्षिका शोभा अंबुरे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सूत्रसंचालन नितीन मुसळे यांनी केले तर आभार हिंगुलांबिका प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे यांनी मानले.

### नगरसेविका शालन शिंदेचा जामीन अर्ज फेटाळला

**सरवदे खून प्रकरण**

**सोलापूर, दि ४ मे-**

सोलापूर मनसे विद्यार्थी शहर प्रमुख बाळासाहेब पांडुरंग सरवदे याची निर्घृण हत्या केल्याप्रकरणी अटकेत असलेली आरोपी नगरसेविका शालन शिंदे यांचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला . तर दुसरी आरोपी शारदा तानाजी शिंदे हिचा जामीन अर्ज येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. पी. राजवैद्य यांनी आज सोमवारी मंजूर केला आहे. महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या उमेदवारीचा अर्ज मागे घेण्याच्या कारणावरून जोशी गल्ली येथे दि. २ जानेवारी रोजी दुपारी आरोपींनी बाळासाहेब सरवदे यांच्या डोळ्यांत चटणी टाकून त्यांना काहीही दिसू नये अशी स्थिती निर्माण केली. त्यानंतर काही आरोपींनी त्यांचे हात पकडले, तर काही आरोपींनी तलवार व कोयत्याने छातीवर वार करून निर्गुण खून केला होता. या प्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येऊन एकूण १५ आरोपींना अटक केली होती. त्याप्रमाणे अटक असलेली आरोपी नगरसेविका शालन शिंदे यांनी दाखल केलेला जामीन अर्ज न्यायालयाने आज सोमवार रोजी फेटून लावला. याप्रकरणी सरकारतर्फे जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह रजपूत यांनी तर आरोपी तर्फे ॲड. संतोष न्हावकर तर यांनी काम पाहिले.



### पोलिस भरतीत निवड झालेल्या विद्यार्थिनींचा श्री कमला देवी कन्या विद्यालयात सत्कार

**सोलापूर, दि ४ मे-**

शहरातील श्री कमला देवी कन्या विद्यालयातील तीन विद्यार्थिनींची पोलीस भरतीत निवड झाली आहे. त्यांचा विद्यालयात संस्थेचे संचालक शामराव पुराणिक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र दिनाच्या औचित्याने आयोजित कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण व राष्ट्रगीताने झाली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पोलीस भरतीत निवड झालेल्या गौरी नलवडे, दिपाली नलवडे व मुस्कान गफर या विद्यार्थिनींचा पुष्पगुच्छ शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका एस. टी. शिंदे या होत्या. संस्थेचे सचिव सुनील सूर्यपुजारी, शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापिका शिंदे यांनी या मुलींनी केवळ स्वतःचे स्वप्न पूर्ण केले नाही तर संपूर्ण शाळा आणि गावाची मान उंचावल्याचा गौरवोल्लेख केला. सत्कारमूर्ती विद्यार्थिनींनी शिक्षक व पालकांच्या पाठिंब्याचे विशेष महत्व सांगुन नियमित सराव शिस्त आणि स्वतः वर विश्वास ठेवल्यास लक्ष गाठता येते असे सांगितले. सत्कार सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून शाळेच्या इतिहासात हा दिवस सुवर्ण अक्षराने नोंदवला जाईल अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# पंढरपूरच्या बाजारात डोंगराची काळीमैना दाखल

- रानमेवा खरेदीसाठी गर्दी; तुरट-गोड काळ्या मैनेला' पसंती
- कोकणातून करवंदांची मोठी आवक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ मे -**

'काळी मैना...डोंगराची मैना', गोड गोड मैना.. अशा हाळ्या सध्या पंढरपुरातील बाजारपेठ, उपनगरे आणि मुख्य रस्त्यांवर घुमू लागल्या आहेत. चवीला तुरट आणि गोड असणारी ही लहान करवंदे भाविक व नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

गेल्या काही दिवसांपासून पंढरपूरच्या फळ बाजारात कोकणातून मोठ्या प्रमाणात करवंदांची आवक सुरू झाली आहे. सावंतवाडी, महाड, रत्नागिरी आणि कणकवली परिसरातून हा रानमेवा बाजारात येत आहे. सध्या शहरातील मोजक्याच व्यापाऱ्यांकडे करवंदे उपलब्ध



असली तरी येत्या काळात ही आवक आणखी वाढणार आहे.

मे महिन्याच्या मध्यवर्ती काळात करवंदांसोबत जांभूळ आणि इतर कोकणी मेव्याची आवकही वाढेल. मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत भाविकांना रानमेव्याची भुरळ पडली आहे. पंढरपूर शहर आणि तालुक्यात म ार्चअखेर व एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासून जंगलातील रानमेवा म्हणून प्रसिद्ध असणारी करवंदे, जांभळे यांचा बहर सुरू होतो. प्रतिवर्षी उन्हाळी सुटीत हा रानमेवा खाण्यासाठी आबालवृद्धांची गडबड सुरू असते.

विठुरायाच्या दर्शनासाठी याच दरम्यान पंढरपुरात पर्यटकांची आणि भाविकांची मोठी गर्दी वाढलेली असते. विठुरायाच्या दर्शनासाठी आलेले हे भाविक आवर्जून या 'काळ्या मैनेचा' आणि रानमेव्याचा मन मनमुराद आनंद लुटत असताना दिसत आहेत.

**खरेदीसाठी अबालवृध्दांची गर्दी**

गेल्या १५ दिवसांपासून पडणाऱ्या वळवाच्या पावसामुळे हा रानमेवा परिपक्व झाला आहे. त्यामुळे काळ्या मैनांनी भरलेली टोपली घेऊन हातगाड्यांवर विक्री करणाऱ्या महिला आणि पुरुषांचे प्रमाण शहरात वाढले आहे. शाळांना उन्हाळी सुटी असल्याने आबालवृद्ध ही 'काळी मैना' खरेदी करण्यासाठी आकर्षित होत आहेत.

# ...अशा घाणेरड्या वृत्ती ठेचून काढण्याचा अधिकार जनतेला द्या

## मुली, महिलांची होती लक्षणीय उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मे-**

नसरापूरमध्ये एका चार वर्षीय चिमुकलीवर ६५ वर्षीय वृध्दाने अमानुष अत्याचार करुन तिचा जीव घेतला. प्रशासन जर कारवाई करणार नसेल तर अशा हैवानाला ठेचून काढण्याचा जनतेला अधिकार द्यावा तरच समाजामध्ये घाणेरड्या वृत्तींना आळा बसेल, असे मत संतप्त महिलांनी व्यक्त केले. दरम्यान, पीडितेला न्याय मिळण्यासाठी चौपाड विठ्ठल मंदिर येथून, राजवाडे चौक, नवी पेठ, शिंदे चौक या मार्गावरुन मेणबत्ती मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात नागरिकांसह मुली, महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

प्रशासनाने लवकरात लवकर पीडितेच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून द्यावा अन्यथा त्या नराधमाला आमच्या स्वाधीन करा त्याला आम्ही आमच्या हाताने ठेचून काढू. वेळोवेळी मुली, महिलांवर असे प्रकार घडत आहेत. ही बाब चिंतेची आहे. याबाबत प्रशासनाने कडक भूमिका घेणे गरजेचे असल्याचे मत तेथील महिलांनी व्यक्त केले. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख, नगरसेवक अमोल शिंदे, ज्ञानेश्वर सपाटे, अमर पाटील, विनायक महिंद्रकर, पंचांगकर्ते मोहन दाते, विजय पुकाळे, अमर कुलकर्णी आदी उपस्थित होते.




### सोलापूरला बदलापूरसारखा बदला हवा

बदलापूर येथे चिमुकलीवर एका व्यक्तीने अत्याचार केला होता. त्यावेळी ना.एकनाथ शिंदे यांनी ज्या पध्दतीने त्या नराधमाला शिक्षा दिली होती. सोलापूरला बदलापूर सारखा बदला हवा आहे, असे शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे यांनी सांगितले.

### सोलापूरच्या नातीला न्याय मिळाला पाहिजे

कुठे तर आपण चुकतोय, न्यायव्यवस्था चुकतेय. त्यांच्या आई-वडिलांना किती वेदना होत असतील. जोपर्यंत सोलापूरच्या नातीला न्याय मिळत नाही तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असे आमदार विजय देशमुख यांनी सांगितले.

### नातू विचारतोय त्याने काय केले

माझा नातू मला विचारतो की त्याने काय केले. बलात्कार केले म्हणजे काय केले. त्याला का मारायचे. त्याला शिक्षा काय करायची हे आम्ही सांगू शकत नाही. अशा घटना थांबल्या पाहिजेत, असे पंचागकर्ते मोहन दाते यांनी सांगितले.

# महापालिकेतील १०९ अधिकारी कर्मचाऱ्यांना पदोन्नती

## उपअभियंता मठपती, चौबे झाले कार्यकारी अभियंता

## ४ खाते प्रमुख, १७ कार्यालय अधीक्षक,

## २3 वरिष्ठ मुख्य लेखनिक यांचा समावेश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मे-**

सोलापूर महापालिकेतील तांत्रिक संवर्गातील १३, बिगर तंत्रिक संवर्गातील ८५ आणि वर्ग ड मधून कनिष्ठ श्रेणी लिपिक पदावर ११ कर्मचाऱ्यांना अशा एकूण १०९ अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. यात ४ खाते प्रमुख, १७ कार्यालय अधीक्षक तर २३ वरिष्ठ मुख्य लेखनिक यांचा समावेश आहे. यासंदर्भातले आदेश महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी काढले आहेत.

सोलापूर महापालिकेतील खातेनिहाय पदोन्नती समितीने विविध संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदांवर व वेतन श्रेणीवर पदोन्नती करिता निवड केली आहे. तांत्रिक संवर्गामध्ये उपअभियंता नीलकंठ मठपती यांना कार्यकारी अभियंता म्हणून नगररचना कार्यालयात पदोन्नती देण्यात आली आहे. उपअभियंता वेंकटेश चौबे यांना सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागात कार्यकारी अभियंता म्हणून पदोन्नती दिली आहे. यांच्यासह १३ अधिकाऱ्यांना या विभागात पदोन्नती मिळाली आहे.

खातेनिहाय पदोन्नती समितीने अधिकारी, कर्मचाऱ्यांची निवड केली आहे. यामध्ये तांत्रिक संवर्गातील पदोन्नती- कार्यकारी अभियंता-२, उपअभियंता ४, कनिष्ठ अभियंता-२, मुख्य सफाई अधीक्षक १, सफाई अधीक्षक-१, मुख्य आरोग्य निरीक्षक-२, हेड माळी-१. बिगर तांत्रिक संवर्गातील पदोन्नती अशी; खाते प्रमुख-४, कार्यालय अधीक्षक-१७, वरिष्ठ मुख्य लेखनिक-२३, वरिष्ठ श्रेणी लिपिक-४०, कनिष्ठ श्रेणी लिपिक-११.

## महत्वाचे...



### नरेंद्र काळे मित्रपरिवारातर्फे सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याच्या तयारी

**सोलापूर, दि. ४ मे-**

नरेंद्र काळे मित्र परिवाराच्या वतीने येत्या ७ मे रोजी सायंकाळी ६ वाजता सर्व धर्मीय मोफत सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर मंडप उभारणी व स्टेजचा शुभारंभ विधीवत पूजन करून करण्यात आला. अविनाश जोशी यांच्या हस्ते धार्मिक विधी पार पडला. यावेळी नरेंद्र काळे, संतोष पाटील, शेखर देशमुख, प्रा. देवेंद्र मदने, व्होनमाने सर, अरविंद, राहुल, बजरंग कुलकर्णी, नागेश सरगम, राम वाकसे, उमेश कोळेकर, अमर दुधाळ, परमेश्वर माळगे, विनोद मोटे, रोहित तडवळकर, सचिन गोडसे, राज बंडगर, शिवा वाघमारे, सागर पाटील, शंकर पडसलगी आदी उपस्थित होते.

# संभाजी ब्रिगेडतर्फे भीमा कांबळेचा पुतळा भर चौकात जाळला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

पुणे येथील नरसापुर या गावी झालेल्या चिमुरडीवर अत्याचाराच्या निषेधार्थ संभाजी ब्रिगेडच्या वतीने चार हुतात्मा चौकात गुन्हेगार आरोपी भीमा कांबळे याचा प्रतिकात्मक पुतळा जाळून आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्रात वारंवार महिला अत्याचाराच्या घटना वाढत आहेत मुख्यमंत्री गृहमंत्री हे निष्क्रिय झाले असून, गृहमंत्री पदाचा स्वतंत्र पदभार राज्य शासनाने निर्माण करावा, महिलांवरील अत्याचारासंदर्भात जलद न्यायालयाची स्थापना करण्यात यावी, महाराष्ट्र शासनाने तात्काळ अधिवेशन



बोलावून महिलां अत्याचार संदर्भात स्वतंत्र कायदा करण्यात यावा, बलात्काराला भर चौकात तात्काळ फाशी देण्यात यावी अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मिनल दास, जिल्हा उपाध्यक्ष मनीषा कोळी, संजीवनी सलबत्ते, शहर कार्याध्यक्ष सोनाली सगर, सरोजिनी माकाई, अनिता वाघमारे, जयश्री रानसरजे उद्योग आघाडीचे शहराध्यक्ष संतोष सुरवसे, उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष विक्रम वानकर, जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले, जिल्हा सचिव दत्तात्रय डिंगणे, कृष्णा पवार आदी उपस्थित

# प्रादेशिक परिवहन कार्यालय वायूवेग पथकाची २०२ वाहनांवर कारवाई;२० लाखांचा दंड वसुल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

सोलापूर शहर व जिल्ह्यात वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून, वैध कागदपत्रे व परवाने जवळ न बाळगता बेकायदेशीरपणे वाहतूक करणे आणि अवैध प्रवासी वाहतूक सुरू असल्याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे तक्रारी प्राप्त होत्या.

त्यानुसार परिवहनमंत्री, व परिवहन आयुक्त यांच्या निर्देशानुसार तसेच प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शहर व जिल्ह्यात विशेष वाहन तपासणी मोहिमेसाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयातील ६ वायुवेग पथके व एसटी पथक तैनात करण्यात आली आहेत.



शहर व जिल्ह्याच्या विविध भागांत राबविण्यात आलेल्या या मोहिमेत रस्ते सुरक्षा आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर मोटार वाहन कायद्यातील तरतुदींनुसार यात दोषी आढळलेली एकूण २०२ वाहने आढळली आहेत.

त्यांना या करिता रु. २० लाख २७ हजार इतका दंड ठोठावण्यात आला आहे. अवैध वाहतुकीमुळे रस्ते सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत असून, भविष्यातही अशा प्रकारची धडक मोहीम सातत्याने सुरू राहणार आहे. तरी सर्व वाहनधारकांनी आपल्या वाहनांवी कागदपत्रे, विमा आणि चालक परवाना वैध ठेवाबा, तसेच वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत करण्यात येत आहे.

# नवीन वाहनामुळे ग्रामीण पोलीस दलाची कार्यक्षमता अधिक वाढेल

## पालकमंत्री जयकुमार गोरे

## पोलीस विभागाच्या वाहनांचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ग्रामीण पोलीस विभागाला विविध पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या निधीतून पोलीस विभागाने खरेदी केलेल्या वाहनामुळे पोलीस दलाची कार्यक्षमता अधिक वाढली जाणार आहे त्यामुळे पोलीस दलाने सर्वसामान्य नागरिकांना अधिक गतिमान पद्धतीने सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

सोलापूर ग्रामीण पोलीस मुख्यालयात शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता भव्य सोहळा पार पडला. मुख्यालय येथील ओपन लॉन चे उद्घाटन, डॉरमेट्री हॉलचे भूमिपूजन तर पोलीस विभागाच्या विविध वाहनांचे लोकार्पण पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, राज्यसभा खासदार ज्योती वाघमारे, महापौर विनायक कोंड्याल, आमदार देवेंद्र कोठे, कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिदेशक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर आदी उपस्थित होते.

प्रारंभी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी जिल्हा नियोजन समितीतून वाहनासाठी ९५ लाख, ओपन लॉन साठी ४५ लाख तर डॉरमेट्री हॉल साठी एक कोटी ३४ लाख उपलब्ध करून दिलेले आहेत अशी माहिती दिली. यामुळे पोलीस मुख्यालयाच्या अधोरेखित पायाभूत सुविधांना बळकटी मिळणार आहे. प्रारंभी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सेंद्रिय शेतीचे महत्त्व सांगून जिल्ह्यातील शेतकरी यासाठी चांगला प्रतिसाद देत आहेत तसेच अशा शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या भाज्या व फळाला बाजारपेठ मिळावी म्हणून ग्रामीण पोलीस दलाच्या पेट्रोल पंपाच्या ठिकाणी जागा उपलब्ध करून दिली असल्याचे सांगितले.




### ऑरगॅनिक शेतीला चालना : पालकमंत्री

ग्रामीण पोलीस दलाच्या विशेषत: पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या प्रयत्नातून जिल्ह्यात वृक्ष लागवडी बरोबरच ऑरगॅनिक शेतीला प्राधान्य दिले जात आहे. पोलीस विभाग जिल्ह्यातील सर्व पोलीस पाटलांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना ऑरगॅनिक शेतीचे महत्व सांगून ती शेती करण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. सध्या शेतीचे उत्पादन वाढवणे तसेच शेती पिकाला कीड लागू नये म्हणून मोठ्या प्रमाणावर रसायने फवारली जात आहेत, त्यातून कॅन्सर सारख्या आजाराचे प्रमाणात वाढ झाल्याचे निर्देशनास आलेले आहे. त्यामुळे ग्रामीण पोलीस दलाने ऑरगॅनिक शेतीला दिलेली चालना हा एक चांगला उपक्रम असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

# शहरवासीयांच्या मनातील भीती कमी होण्यासाठी हवा कायद्याचा वचक!

## भाजपाची पोलीस आयुक्तांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे -**

सोलापूर शहर-जिल्ह्यात विविध ठिकाणी झालेल्या हत्यांच्या घटनांमुळे कायदा आणि सुव्यवस्था बिघडली आहे. शहरवासीयांच्या मनातील भीती कमी होण्यासाठी पोलिसांच्या माध्यमातून गुन्हेगारांवर कायद्याचा वचक राहणे आवश्यक आहे. याकरिता पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी सोलापूर शहर भारतीय जनता पार्टीने पोलिस आयुक्तांकडे केली आहे. पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी हे निवेदन स्वीकारले.

गेल्या काही दिवसांपासून सोलापूर शहर आणि जिल्ह्यात गुन्हेगारीने अत्यंत उग्ररूप धारण केले आहे. अवघ्या तीन दिवसात तब्बल सहा जणांचे खून झाल्याने संपूर्ण सोलापूर जिल्हा हादरून गेला आहे. सलग घडणाऱ्या हत्याकांडांमुळे संपूर्ण समाजात प्रचंड भीतीचे आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. तीन मे रोजी माधव नगर परिसरात भर चौकात दिवसाढवळ्या झालेली हत्या आणि बोरामणी येथे घरात घुसून झालेल्या तिहेरी हत्याकांडामुळे सामान्य नागरिक, महिला आणि व्यापारी वर्गात मोठी दहशत पसरली आहे. भर दिवसा लोकांची वर्दळ असताना गुन्हेगार हत्यारे घेऊन रस्त्यावर दहशत माजवत आहेत आणि खून करत आहेत. यावरून गुन्हेगारांना पोलिसांचा आणि कायद्याचा कसलाही वचक नाही हे स्पष्ट होते.

समाजातील ही अस्वस्थता आणि भीती दूर करणे ही सध्या प्रशासनाची सर्वात मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे या सर्व हत्या प्रकरणांचा तपास तातडीने पूर्ण करून हे खटले जलदगती न्यायालयात चालवण्यात यावेत. तसेच गुन्हेगारांना लवकरात लवकर कठोर शिक्षा होण्यासाठी प्रयत्न करावेत, असे भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर म्हणाल्या. याप्रसंगी महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, माजी आमदार नरसिंग मेंगजी, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, भारतीय जनता युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष विजय कुलथे, भाजपाचे सरचिटणीस डॉ. शिवराज सरतापे, मंडल अध्यक्ष नागेश सरगम, महेश देवकर, शहर चिटणीस रवी भवानी, बजरंग कुलकर्णी, ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष राजू हिबारे, अल्पसंख्यांक महामंत्री आदम शेख, व्यापारी आघाडी अध्यक्ष लक्ष्मीकांत खंडेलवाल, विश्वनाथ प्याटी, विजय धोत्रे, ओंकार होमकर आदी उपस्थित होते.




### पोलिसांची गस्त वाढवावी : महापौर कोंड्याल

गुन्हेगारांना कायद्याचा धाक रहावा याकरिता पोलीस प्रशासनाकडून सतत गस्त ठेवणे, त्यात वाढ करणे, शहरातील सर्वच भागात विशेषतः संवेदनशील परिसरात रात्रीची तसेच दिवसाची पोलीस गस्त वाढवावी. जेणेकरून नागरिकांच्या मनातील भीती कमी होईल. नागरिकांच्या मनातील भीती दूर करून त्यांना सुरक्षित वाटण्यासाठी स्वतः पोलीस अधिकाऱ्यांनी या परिस्थितीकडे लक्ष देऊन तातडीने कठोर पावले उचलावीत, असे महापौर विनायक कोंड्याल याप्रसंगी म्हणाले.

## नसरापूर अत्याचार प्रकरणात आरोपीस फाशीची शिक्षा द्यावी : आ.सुभाष देशमुख

**सोलापूर, दि. ४ मे-**



पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे घडलेल्या अल्पवयीन मुलीवरील अत्याचार व हत्येच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून आरोपीस फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. ही घटना अत्यंत संतापजनक असून, मानवतेला काळिमा फासणारी आहे. या घटनेमुळे राज्यातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, महिलांच्या व बालिकांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. न्यायालयामार्फत आरोपींना फाशीची शिक्षा मिळावी यासाठी शासनाने प्रभावी पावले उचलावीत, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा



## ▶▶ महत्वाचे...

### व्हिडिओ काढल्याच्या कारणावरुन महिलेस मारहाण

**सोलापूर, दि.४ मे-**

मागच्या भांडणाचा व्हिडिओ काढला म्हणून एका महिलेस चौघांनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना लिमयेवाडी येथे रात्री घडली. अश्विनी संजू गायकवाड (वय-३०, रा.लिमयेवाडी) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. अश्विनी गायकवाड ह्या रविवारी संध्याकाळी ७.३० वाजता राहत्या घरात असताना भांडणाचा व्हिडिओ का काढलात, असे म्हणत राजू जाधव, संदेश जाधव, यल्लप्पा गायकवाड, सोनाली गायकवाड यांनी मारहाण केली. यात त्या जखमी झाल्याने भाऊ रोहित जाधव यांनी रुग्णालयात उपचाराकरिता दाखल केले.

### घरजागेच्या वादातून वृध्द आई आणि मुलास मारहाण

**सोलापूर, दि.४ मे-**

घरजागेच्या वादातून लोखंडी रॉड, दगड आणि टिकावाचा दांड्याने केलेल्या मारहाणीत आई आणि मुलगा असे दोघेजण जखमी झाल्याची घटना माढा तालुक्यातील मोडनिंब तेथे रविवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास घडली. सिद्धेश्वर दिलीप पाटोळे (वय-३४) आणि त्यांची आई अंबुबाई पाटोळे (वय-६५, दोघेही रा.मार्केटयार्ड, पुणे) अशी जखमींची नावे आहेत. ते रविवारी रात्री घराजवळ असताना घर जागेच्या कारणावरून त्यांना विक्रम पाटोळे , सत्यवान जाधव आणि इतर ७ जणांनी मिळून मारहाण केली. त्यांना टेंभुर्णी येथे प्राथमिक उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात ते स्वतः आज सोमवारी सकाळी दाखल झाले.

### रस्त्याच्या कारणावरुन दांपत्यास मारहाण

**सोलापूर, दि.४ मे-**

शेतातील रस्त्याच्या कारणावरून काठी आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत पती-पत्नी जखमी झाल्याची घटना अक्कलकोट तालुक्यातील हालचिंचोळी येथे रविवारी सायंकाळच्या सुमारात घडली. महेश चंद्रप्पा शंभूभैरे (वय-३८), त्यांची पत्नी अश्विनी शंभूभैरे (वय-३५) अशी जखमी दांपत्याची नावे आहेत. त्यांना संतोष बिराजदार, गेनसिद्ध बिराजदार यांच्यासह दोघांनी मिळून मारहाण केली. अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करुन सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी ते स्वतः दाखल झाले. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# पंढरपूर तीर्थक्षेत्र विकासासाठी ४१५० कोटी रुपयांच्या आराखड्यास शिखर समितीची मान्यता

## ● 'कॉरिडॉर'संदर्भात भूसंपादनाची प्रक्रिया १ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

श्रीक्षेत्र पंढरपूर तीर्थक्षेत्र विकासासाठी ४१५०.४६ कोटी रुपयांच्या आराखड्यास शिखर समितीची मान्यता मिळाली आहे. दरम्यान, पंढरपूर कॉरिडॉर संदर्भात भूसंपादनाची प्रक्रिया १ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयात पार पडलेल्या एका बैठकीत दिले.

शिखर समितीच्या या बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वने मंत्री गणेश नाईक, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान अवताडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. देश-विदेशातील भाविक श्रीक्षेत्र पंढरपूर येथे मोठ्या संख्येने येत असतात. आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री या चार वारी अर्थात यात्रांच्या काळात पालख्या येत असतात. भाविकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने तीर्थक्षेत्र विकास अंतर्गत विविध कामे हाती घेण्यात आले आहेत. श्रीक्षेत्र पंढरपूर येथे भाविकांची सातत्याने वाढणारी संख्या, रस्ते, वाहतूक आणि अन्य संबंधित बाबी लक्षात घेता पंढरपूर तीर्थक्षेत्र परिसराच्या समग्र व नियोजित विकासाची कामे वेगाने हाती घेण्यात यावीत. निधीअभावी कोणतेही काम अपूर्ण राहता कामा नये, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. वारकरी-भाविकांना स्वच्छ, गर्दीमुक्त, सुरक्षित आणि आध्यात्मिकदृष्ट्या समाधानकारक अनुभव मिळावा; हा विचार करून विकास कामे दर्जेदार, शाश्वत व भविष्याभिमुख पायाभूत सुविधा उभारणे आवश्यक आहे. यासाठी बाधित निवासी व व्यावसायिक मालमत्ताधारक, भाडेकरुंना योग्य मोबदला देण्यात यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

### जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी मांडला आराखडा



जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी या बैठकीत पंढरपूर विकास आराखडा मांडला. गर्दी व्यवस्थापनासाठी कॉरिडॉर उभारणी, पुरातन मंदिर व मठांचे जतन-संवर्धन, बाधितांना व्यावसायिक संधी आणि वारकऱ्यांसाठी समग्र सुविधा विकास यासाठी ७३५.८० कोटी रुपयांचा आराखडा मांडण्यात आला. नगर प्रदक्षिणा मार्ग विकास, नदी घाट सुशोभीकरण, वाहनतळ व व्यापारी संकुल, शहर सुशोभीकरण, रस्ते व पूल आणि पालखी तळांच्या विकासासाठी १३८७.९१ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला. भूसंपादन व पुनर्वसन खर्च, बाधित इमारतींचा मोबदला आदींसाठी २०२६.७५ कोटी रुपयांचा प्रस्ताव मांडण्यात आला. असा एकूण ४१५०.४६ कोटी रुपयांच्या या सर्वसमावेशक आराखड्यास फडणवीस यांनी शिखर समितीच्या बैठकीत मान्यता दिली.

# तुळजापूर रोडवरील कचरा डेपोला आग



अग्निशमन दलाच्या पाच गाड्या तात्काळ सक्रिय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मे-**

तुळजापूर रोडवरील कचरा डेपोतील दोन मोठ्या ढिगाऱ्यांना सोमवारी दुपारी आग लागली. या आगीमुळे परिसरात धुराचे लोट पसरले होते. वाढत्या तापमानामुळे आणि अतिउष्णतेमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज प्रशासनाने व्यक्त केला.

ही वार्ता कळताच अग्निशामक दलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. सायंकाळी ६.४५ वाजेपर्यंत एकूण १५ गाड्या पाण्याचा फवारा मारुन आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. ५ गाड्या घटनास्थळावर आग विझवण्यासाठी सक्रिय कार्यरत आहेत. कचऱ्याच्या ढिगाऱ्यामध्ये मिथेन हा वायू असतो. हा वायू साधारण ४० ते ४३ अंश सेल्सिअस तापमानामध्ये पेट घेतो. सोलापूर शहरातील तापमान आज ४०.८ अंश सेल्सिअसवर असल्याने आग लागली असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाचे जवान शर्थीचे प्रयत्न करत आहेत. सध्या ५ गाड्यांच्या माध्यमातून काम सुरु आहे. आग पूर्णपणे शांत झाल्यानंतर परिसरात तातडीने 'कुलिंग ऑपरेशन' हाती घेण्यात येणार आहे, असे अग्निशमन दल अधीक्षक राकेश साळुंखे यांनी स्पष्ट केले.

#### ४ वर्षांपूर्वी लागली होती याच दिवशी आग

तुळजापूर रोडवरील कचरा डेपोमध्ये ४ मे २०२२ रोजी उष्णतेमुळे आग लागल्याची घटना घडली होती. २५ दिवसांच्या अथक प्रयत्नानंतर ७० टक्के आग विझवण्यात प्रशासनाला त्यावेळी यश आले होते. त्यानंतर दोन वर्षांपूर्वी म्हणजे सन २०२४ च्या मे महिन्यात देखील आगीची घटना घडली होती. आतापर्यंत डेपोला ३१ वेळा आग लागल्याच्या घटना घडल्या आहेत.

# 'डीसीसी'त कोट्यवधींचा अपहार

## ● 'ईडी'कडे करण्यात आली तक्रार ●

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मे-**

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या विविध शाखांमध्ये कोट्यवधी रुपयांचा अपहार झाला. यासंदर्भात 'ईडी'कडे तक्रार करण्यात आली. याप्रकरणी उच्चस्तरीय समितीकडून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली, अशी माहिती माढा तालुक्यातील उपळाई खुर्द येथील नागनाथ कदम यांनी केली.



पंढरपूर, कुर्डुवाडी, माढा, माळशिरस आदी भागातील विविध शाखांमध्ये बनावट कागदपत्रे, खोट्या सह्या, सोने तारण कर्ज आदींच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा अपहार झाला आहे. यासंदर्भात दि.२९ एप्रिल २०२६ रोजी ईडी अर्थात अंमलबजावणी संचालनालय कार्यालयाकडे आपण तक्रार दाखल केलेली आहे. सोने तारण कर्ज प्रकरणात सुमारे २५ कोटी रुपयांचा अपहार झाला. पिंपळनेर शाखेतील ५.७ कोटी रुपयांच्या प्रकरणात मूळ दोषींना वाचवण्याचा प्रयत्न होत आहे. मृत खातेदारांच्या नावाने रक्कम काढण्यात आले. काही प्रकरणांमध्ये संबंधित कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल न करता त्यांना पुन्हा सेवेत घेण्यात आल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# १५ केंद्रांवर ५ हजार ५६६ विद्यार्थ्यांनी दिली 'नीट'ची परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणारी नीट अर्थात राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षेसाठी सोलापूर शहरातील १५ केंद्रांवर ५ हजार ५६६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. रविवार, दि.३ मे २०२६ रोजी ही परीक्षा घेण्यात आली. परीक्षा सुरु होण्याच्या एक तास आधी केंद्रावर उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार बहुसंख्य विद्यार्थी वेळेत केंद्रांवर दाखल झाले. ही परीक्षा कडक शिस्तीत व शांततेत पार पडली.

'नीट'च्या परीक्षेसाठी सोलापुरातून एकूण ५ हजार ६९१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ५ हजार ५६६ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. १२५ विद्यार्थी गैरहजर राहिल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणेद्वारे निगराणी ठेवण्यात आली होती. विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक हजेरी घेण्यात आली. परीक्षा केंद्रात प्रवेश करण्यापूर्वी मेटल डिटेक्टरच्या साहाय्याने विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.




जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी सिध्देश्वर प्रशाला, संगमेश्वर महाविद्यालय, हरिभाई देवकरण प्रशाला, पानगल हायस्कूल या परीक्षा केंद्रांना भेटी देऊन सुविधांचा आढावा घेतला. यावेळी माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप हेही उपस्थित होते.

#### पालकांची गर्दी, विद्यार्थ्यांमध्ये उत्साहासोबत तणाव

परीक्षा केंद्राबाहेर पालकांची मोठी गर्दी दिसून आली होती. विद्यार्थ्यांमध्ये उत्साहासोबतच काहीसा तणावही जाणवत होता. प्रशासनाच्या दक्ष नियोजनामुळे सोलापुरातील नीट परीक्षा कोणताही अनुचित प्रकार न घडता सुरळीत आणि यशस्वीरीत्या पार पडल्याचे दिसून आले.

# पद्मशाली पुरोहित संघातर्फे १७५ बटुंवर उपनयन संस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मे-**

पद्मशाली पुरोहित संघम्च्या वतीने पूर्वविभाग श्रीराम मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या वडकलग्नम् अर्थात उपनयन संस्कार कार्यक्रम ातंर्गत १७५ बटूंवर मोफत स्वरुपात उपनयन संस्कार करण्यात आले. हिंदू धर्मातील १६ मुख्य संस्कारांपैकी एक महत्त्वाचा संस्कार म्हणून उपनयन संस्काराकडे पाहिले जाते. 'उप' म्हणजे जवळ आणि 'नयन' म्हणजे नेणे, म्हणजेच विद्यार्थ्याला शिक्षणासाठी गुरुंकडे नेणे, असा याचा अर्थ होतो.



हा संस्कार मुलाच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक शिक्षणाची सुरुवात मानला जातो, ज्यामध्ये त्याला गायत्री मंत्राची दीक्षा दिली जाते आणि पवित्र जानवे अर्थात यज्ञोपवीत धारण केले जाते, असे यावेळी सांगण्यात आले. उपनयन संस्काराच्या आधी गणपती पूजन, पुण्याहवाचन, गायत्री पंचायतन, नक्षत्र नवग्रह पूजन, होम हवन करण्यात आला. होमहवनचे यजमानपद नरेश चिलका यांनी स्वीकारले होते. गायत्री मंत्राची दीक्षा देताना मंगलाष्टके व अक्षता सोहळा झाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघाचे अध्यक्ष मनोहर जडल, सचिव भानुचंद्र चिप्पा, उपाध्यक्ष रवींद्र श्रीपती, सहसचिव वेंकटेश जिल्ला, खजिनदार नरसय्या अल्ली, विश्वस्त नरेंद्र श्रीमल, श्रीनिवास गाजूल, देविदास अन्नलदास आदींनी परिश्रम घेतले.

# मोहोळ-वळसंग राष्ट्रीय महामार्गासाठी ७४२ कोटी मंजूर : आ. देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

सोलापूर जिल्ह्यातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेत, मोहोळ-कुरुल-कामती-कंदलगाव-मंद्रूप-बसवनगर-औराद-वळसंग या मार्गाच्या विकासासाठी तब्बल ७४२ कोटी रुपयांचा निधी केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी मंजूर केला आहे. सुमारे ८२ किलोमीटर लांबीच्या या रस्त्याला प्रशासकीय मान्यता मिळाली असून, लवकरच निविदा प्रक्रिया पूर्ण करून कामास गती दिली जाणार असल्याची माहिती आमदार सुभाष देशमुख यांनी दिली.



यामुळे सोलापूर दक्षिण व अक्कलकोट तालुक्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या निर्णयानंतर आमदार देशमुख यांनी नाम दार नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत. या प्रकल्पामुळे मोहोळ ते वळसंग दरम्यानच्या प्रमुख गावांचा थेट संपर्क सुधारण्यास मदत होणार असून, शेतमाल वाहतुकीस गती मिळणार आहे. परिणामी शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होणार आहे. तसेच प्रवासाचा वेळ व इंधन खर्चात बचत होऊन ग्रामीण भागाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला चालना मिळणार आहे.

#### ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासन कटिबध्द

या प्रकल्पांतर्गत संजवाड येथे सीना नदीवर मोठा पूल उभारण्यात येणार असून, आहेरवाडी फाटा येथे रेल्वे उड्डाणपूल बांधण्यात येणार आहे. याशिवाय विविध ठिकाणी लहान पूल व पाणी निचरा कामे करण्यात येणार आहेत. असे आमदार सुभाष देशमुख म्हणाले. शासन ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे या निर्णयातून स्पष्ट होत आहे, असेही ते म्हणाले.

# तीन राज्यांमध्ये विजयोत्सव; भाजपाकडून झालमुडी, जिलेबी वाटप

## पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने पश्चिम बंगाल, आसाम, पाँडिचेरी या राज्यामध्ये एकतर्फी विजय मिळवल्याबद्दल मंगळवेढा शहरात जिल्हा भाजपच्या वतीने भव्य विजयोत्सव साजरा करण्यात आला. या विजयोत्सवामध्ये झालमोडीचे (भेळ) वाटप करत पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी आपला आनंद व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पश्चिम बंगालच्या निवडणुकीदरम्यान झालमोडी दुकानावरती जाऊन झालमुडी खात एक नवीन ट्रेंड निर्माण केला होता आणि पश्चिम बंगालमध्ये भाजपला यश मिळाल्यानंतर झालमोडीचे वाटप केले जाईल, असे मोदींनी म्हटले होते. त्याचप्रमाणे मंगळवेढा शहरामध्ये देखील झालमोडी व जिलेबी वाटप करत विजय उत्सव साजरा करण्यात आला. कित्येक वर्षाच्या प्रयत्नानंतर पश्चिम बंगालमध्ये भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले आहे आणि त्याचा आनंद भाजप कार्यकर्त्यांनी हलग्या वाजवत, फटाके फोडत केला. मंगळवेढा शहरातील दामाजी चौकामध्ये भाजपचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हा विजय उत्सव साजरा करण्यात आला .

यावेळी जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण म्हणाले, पश्चिम बंगालमध्ये कित्येक वर्षानंतर सामान्य कार्यकर्ता त्याठिकाणी झटत, झगडत संघर्ष करत राहिला आणि त्याचेच हे यश आज आपल्या सर्वांना दिसत आहे. हे यश एक-दोन महिन्याचे नसून कित्येक वर्षांच्या संघर्षाचे यश आहे . या यशाचं श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा त्याचबरोबर पश्चिम बंगाल मधील सर्व भाजपा पदाधिकारी-कार्यकर्त्यांचे आहे. आज खरंतर भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्यांचा आनंद गगनात मावत नाही. ज्या पश्चिम बंगालमध्ये यापूर्वी डाव्यांची सत्ता होती आणि त्यानंतर तृणमूल काँग्रेसची सत्ता होती त्या ठिकाणी कित्येक अत्याचार भाजपच्या कार्यकर्त्यांना सहन करावे लागले. पण आज खऱ्या अर्थाने सर्व अत्याचारातून मुक्त होत आमचा कार्यकर्ता विजयी झालेला आहे. यावेळी मंगळवेढा शहरांमधून बाईक रॅली काढत फटाके फोडत पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आनंद साजरा केला.

यावेळी जिल्हा सरचिटणीस संतोष मोगले, उपनगराध्यक्ष येताळा भगत, युवा मोर्चा अध्यक्ष सुदर्शन यादव, तालुकाध्यक्ष नागेश डोंगरे, खंडू खंदारे, संजय माळी, सुनील रत्नपारखी, सुशांत हजारे, जयदीप रत्नपारखी, विनायक गुरुकुल, स्वप्निल गवळी, रणजितसिंग गवळी, सुनील कांबळे, सिद्धेश्वर कोकरे, आप्पा स्वामी, कैलास मर्दा, अजित लेंडवे, आशाताई पाटील, ऋतिक खंदारे, रवी चौगुले, अविनाश आठवले, अशोक भगत, उमेश ढगे, सचिन डोरले, अभिजीत लोखंडे, रमेश मोरे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मालमत्तेच्या वादातून सख्ख्या भावांकडून मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ४ मे -**

बार्शी शहरातील पिंपळकर प्लॉट परिसरात मालमत्तेच्या वादातून सख्ख्या भावांनीच भावावर हल्ला केल्याची गंभीर घटना घडली आहे. या घटनेत वैजिनाथ किसन जाधव (वय ५०, व्यवसाय इलेक्ट्रिकल/फोर व्हीलर मेकॅनिक) हे जखमी झाले असून त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, वैजिनाथ जाधव हे पत्नी व मुलासह बार्शीत वास्तव्यास असून मेकॅनिक व्यवसाय करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या कुटुंबीयांनी एकत्रित कमाईतून बार्शी शहरात विविध ठिकाणी मालमत्ता खरेदी केली होती. मात्र, त्या मालमत्तेच्या वाटणीवरुन त्यांचे भाऊ नवनाथ किसन जाधव व जगन्नाथ किसन जाधव यांच्याशी वारंवार वाद होत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. दि. १ मे रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास कुडूवाडी रोड, जैन मंदिराजवळील रुबाब कलेक्शन दुकानासमोर वैजिनाथ जाधव उभे असताना, नवनाथ जाधव, जगन्नाथ जाधव व अभय जगन्नाथ जाधव हे तिथे आले. प्रॉपर्टीचे दोन हिस्से का करु देत नाहीस? या कारणावरून वाद घालत नवनाथ जाधव यांनी स्टीलच्या पाईपने त्यांच्या डाव्या पायाच्या पिंडरीवर, मांडीवर व कमरेवर वार केले. त्यानंतर तिघांनी मिळून त्यांच्या चेहऱ्यावर व डोळ्यावर बुक्क्यांनी मारहाण करत त्यांना जखमी केले व शिवीगाळ करत तेथून पसार झाले. घटनेनंतर जखमी अवस्थेत वैजिनाथ जाधव यांनी दुकानातील कामगाराला संपर्क साधला. त्यानंतर त्यांना प्रथम ग्रामीण रुग्णालय, बार्शी येथे आणि पुढे जगदाळे मामा हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून ते शुद्धीवर आहेत. या प्रकरणी संबंधित तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोलीस करत आहेत.

## ज्ञानामृत आनंदलहरी-१४३१

**जैसा वेश्याभोगीं कवडा वेंचे । मग दारही चेपूं नये तियेचें ।
तैसें लाजीरवाणें दीक्षितांचे । काय सांगों ॥**

कांही लोक व्यवहारीक भक्ती कशी करतात, याचे विवेचन भगवंत करीत आहेत. खूप कष्ट करुन चांगली कार्ये जोडून पुण्याचा संचय लोक वाढवतात. या वाढलेल्या पुण्यसंचयाच्या मोबदल्यात स्वर्गादी सुखाची, भौतिक१ सुखाची अपेक्षा करतात. भौतिकसुख प्राप्ती हा एक व्यवहार आहे. आपल्याकडील पुण्यरुपी, सत्कर्मरुपी धन संपले की भौतिकसुखापासून आपोआप परावृत्त व्हावे लागते. भौतिक सुख (स्वर्ग सुख ) प्राप्तीसाठी पुण्यरुपी धनाचा मोबदला चुकवावा लागतो. भौतिक सुखात मग्न झालेला माणूस पुण्यसंचय वाढवू शकत नाही. उलट आहे त्या पुण्याचा क्षय तेथे होऊ लागतो. म्हणूनच पुण्यसंचयाने स्वर्गादी सुख प्राप्त करणा-यांचा कालांतराने पुण्यसंचय संपतो त्यामुळे त्या भौतिक सुखापासून त्यांना परत या मृत्यू लोकाच्या संसारात यावे लागते. पुण्यसंचयातून मिळविलेले भौतिक सुख हा एक



व्यवहार असल्याने एका हातातील पुण्यसंचय संपला की भौतिक सुख प्राप्त करणारा दुसरा हात आपोआप पहिल्या हाताबरोबर रिकामा होऊ लागतो. प्रत्यक्षात स्वर्ग आहे की नाही या विषयाकडे न वळता केलेल्या सत्कार्याच्या मोबदला स्वसुखासाठी मागणे चुकीचे असते. एवढा अर्थ येथे घेतला तरी पुरेसे आहे. असो, अशा पुण्यक्षय झालेल्या लोकांना स्वर्गादी भौतिक सुखापासून कसे लाथाडले जाते हे सांगतांना भगवंत म्हणाले, **जैसा वेश्याभोगीं कवडा वेंचे । मग दारही चेपूं नये तियेचें । तैसें लाजीरवाणें दीक्षितांचे । काय सांगों ॥** अर्थात, वारांगणा सुंदर दिसते म्हणून तिच्या प्रेमसुखात रमणारा व्यक्ति तोपर्यन्त तिचा सहवास मिळवू शकतो, जोपर्यन्त त्याच्या हातात पैसा असतो. ज्यावेळी त्याच्या हातातील पैसा संपतो तेव्हा वारांगना त्याला तेथून हकलून देते, अर्थात, तिचे दार त्याच्यासाठी आपोआप बंद होते. या प्रमाणेच यज्ञकर्त्याचे पुण्य संपले की स्वर्गादी भौतिक सुखाची दारे आपोआप बंद होऊ लागतात. म्हणून माणसाने सत्कार्याचा व्यवहार करु नये. नि:स्वार्थ भावनेने सत्कार्य करावे.

खूप कष्टाने यज्ञ करुन पुण्यसंचय करायचा नि प्रत्यक्षात ज्या भगवंतांची (प्राणीमात्रांच्या सेवेच्या संधीची) प्राप्ती करुन घ्यावयाची, ते न करता भौतिक सुखात रंगणे म्हणजे चुकीचे आहे, असे भगवंत म्हणाले. दैनंदिन जीवनात आपण पाहतो की अनेक लोक एखादया देव-देवतेची थोडीसी भक्ती करतात आणि त्याच्या मोबदल्यात लगेच कांहीतरी इच्छित प्राप्ती मागत असतात. भक्ती ही माणसाच्या मनाची शक्ती वाढविण्याचे माध्यम असतांनाही, लोक लगेच तिचा व्यवहार करतात. नि:स्वार्थ प्रेम, भक्ती नांवाचा प्रकार फार कमी अनुभवायला मिळतो. स्वार्थ ठेवूनच कार्य केले जात असतील तर त्या कार्याचे फल मर्यादित आणि नाशिवंत असते. सकाम भक्तीमध्ये व्यवहार आल्याने येथे फक्त नगदी चालते, उधारीवर भौतिकसुख मिळत नाही. पूजा-पाठ, उपवास, वृत्त, वैकल्ये ही जवळपास संसारसुखात भर पडावी म्हणूनच केली जातात. त्यामुळे आत्मसुख दुरावले जाते. म्हणून अर्जुना, समजदार, ज्ञानी माणसाने कधीही यज्ञकर्माच्या मोबदल्यात भौतिक, स्वर्गादी सुखाची अपेक्षा करु नये असे भगवंत म्हणाले. जय जय राम कृष्ण हरी।


**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार,**
**दि. ५ मे २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - वैशाख, कृ. चतुर्थी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- ज्येष्ठा (१२.५४)**
**योग - शिव (२४.१५)**
**करण - बव (१८.३७)**
**राहू काल : मंगळवार**
**दु. ३.०० ते ४.३०**

**दिनविशेष : ✻ जागतिक अस्थमा दिन**
**१४७९ : 'गुरू अमर दास' - शिखांचे तिसरे गुरू यांचा जन्म.**
**१९१६ : 'ग्यानी झलसिंग' - भारताचे माजी राष्ट्रपती यांचा जन्म.**
**१९१८ : त्र्यंबक बापूजी ठोमरे उर्फ बालकवी तथा निसर्गकवी यांचे निधन.**
**१९४३ : गायक नट, गायनगुरु रामकृष्णबुवा वझे - यांचे निधन.**



## अनिल पाटील यांच्या साहित्यकृतीचा 'तितिक्षा' संस्थेच्या वतीने गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

पुणे येथील तितिक्षा इंटरनॅशनल संस्थेच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठित सर्वोत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार येथील लेखक अनिल पाटील यांच्या काही जनातले काही मनातले या साहित्यकृतीला प्रदान करण्यात आला. पुण्याच्या ऐतिहासिक वारसा लाभलेल्या भारत इतिहास संशोधक मंडळ येथील वि. का. राजवाडे सभागृहात हा सोहळा संपन्न झाला.

या ग्रंथ स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून १५६ पुस्तके प्राप्त झाली होती. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या स्पर्धेतून ५६ विविध गटांतील पुस्तकांची निवड 'सर्वोत्कृष्ट ग्रंथ पुरस्कारा'साठी करण्यात आली. यामध्ये पाटील यांच्या लेखणीतून उतरलेल्या 'काही जनातले काही मनातले' या पुस्तकाने मान्यवरांची पसंती मिळवत आपले स्थान निश्चित केले. तितिक्षा भावार्थ सेवा अंतर्गत आयोजित या वितरण सोहळ्याला संस्थेच्या संस्थापिका प्रिया प्रमोद दामले, सुजित दातार, योगेश सुपेकर, सुभाष सोनवणे आणि डॉ. राजेश्वर हेंद्रे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

त्यांच्या हस्ते पाटील यांना सन्मानित करण्यात आले. सकाळी ११ वाजता सुरू झालेला हा कार्यक्रम सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत विविध उपक्रमांनी रंगत गेला. ग्रंथ प्रकाशन, काव्य स्पर्धा आणि मुख्य पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमाची सांगता संस्थेच्या सर्वेसर्वा प्रिया दामले यांनी केली.

# पटसंख्या वाढ, मिशन स्कॉलरशिप व निपुण महाराष्ट्रवर भर

## शिक्षकांच्या सहविचार सभेत महापालिका शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

महापालिकेने यंदा सरासरी १७ टक्के पटसंख्या वाढीचे उद्दिष्ट ठेवले असून 'मिशन स्कॉलरशिप'च्या माध्यमातून शिष्यवृत्ती परीक्षेतील यशाचा टक्का वाढविण्यावर विशेष भर देण्यात येईल. इयत्ता पहिलीसाठी उत्कृष्ट शिक्षकांची नेमणूक करून सप्टेंबर २०२६ अखेर सर्व विद्यार्थ्यांना वाचन, लेखन आणि संख्याज्ञान आत्मसात करून देण्याचा निर्धार व्यक्त करत शिक्षणाचा दर्जा उंचावणे, पटसंख्या वाढवणे आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे या उद्दिष्टांसह विविध महत्त्वपूर्ण निर्णय शिक्षकांच्या सहविचार सभेत घेण्यात आला.

आगामी शैक्षणिक वर्षाच्या पूर्वतयारीसाठी महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या सर्व शिक्षकांची सहविचार सभा हरिभाई देवकरण प्रशाला येथील मुळे सभागृहात उत्साहात पार पडली. या सभेस महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे नियंत्रण अधिकारी तथा मुख्य लेखा अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर, प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांनी मार्गदर्शन केले. पर्यवेक्षक मनीष बांगर, रजनी राऊळ, निलोफर सय्यद यांनी विविध शैक्षणिक विषयांचा





### महापालिका शाळांमध्ये इंग्रजी भाषेच्या अध्यापनासाठी विशेष उपक्रम

इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे वाढणारे आकर्षण लक्षात घेऊन महापालिकेच्या शाळांमध्ये इंग्रजी भाषेच्या अध्यापनासाठी विशेष उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी नवीन वर्गखोल्या व इमारतींसाठी महापालिका अंदाजपत्रकात ३ कोटी ३६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. किरकोळ दुरुस्ती, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम तसेच शिष्यवृत्ती मार्गदर्शनासाठीही निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

**-डॉ. रत्नराज जवळगेकर, मुख्य लेखा अधिकारी**

आढावा घेतला. मनपा शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांनी शिक्षकांचे प्रश्न वेळेत मार्गी लावून त्यांना चिंतामुक्त वातावरण देण्यावरही भर देण्यात येणार आहे. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना दरवर्षी सन्मानित करून प्रोत्साहन दिले जाणार आहे, असे सांगितले. महापालिकेतील शिक्षकांची मंजूर पदसंख्या ७२२ वरून सध्या २२० पर्यंत घटल्याची बाबही यावेळी मांडण्यात आली.

महापालिकेने यंदा सरासरी १७ टक्के पटसंख्या वाढीचे उद्दिष्ट ठेवले असून 'मिशन स्कॉलरशिप'च्या माध्यमातून शिष्यवृत्ती परीक्षेतील यशाचा टक्का वाढविण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. इयत्ता पहिलीसाठी उत्कृष्ट शिक्षकांची नेमणूक करून सप्टेंबर २०२६ अखेर सर्व विद्यार्थ्यांना वाचन, लेखन आणि संख्याज्ञान आत्मसात करून देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

'निपुण महाराष्ट्र' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करत इयत्ता पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा मूलभूत शैक्षणिक पाया भक्कम करण्यावरही भर देण्यात येणार आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढ, पटसंख्या वाढ आणि मूलभूत कौशल्यांवर भर देत महापालिका शाळांना नवसंजीवनी देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या सहविचार सभेस महापालिकेतील सर्व मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिक्षकांनी समर्पण भावनेने काम करावे

शिक्षकांनी समर्पण भावनेने काम करून गुणवत्ता व पटसंख्या वाढीसाठी प्रयत्न करावेत. शिक्षकांना कार्यालयीन कामकाजासाठी त्रास होऊ नये यासाठी सुलभ व्यवस्था निर्माण करण्यात येईल. पुढील काळामध्ये महापालिकेच्या शाळाकडे पाहण्याचा समाजाचा आणि पालकांचा दृष्टिकोन बदलण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

**-मल्हारी माने, प्रशासनाधिकारी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सूत गिरणी निवडणूक

## सभासदांनो, निवडणुकीच्या मतदार यादीसाठी नावे समाविष्ट करा : पळसकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय सहकारी सुतगिरणीच्या आगामी निवडणुकीसाठी प्रारूप मतदारयादी तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले असून, सर्व सभासदांनी आपली नावे मतदारयादीत समाविष्ट करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.



यासाठी सभासदांनी आधारकार्ड व मतदान ओळखपत्राची प्रत सादर करावी. तसेच, संबंधित सभासद मयत असल्यास त्यांच्या कुटुंबीयांनी मृत्यूदाखला सादर करावा, असे आवाहन प्रशासक उज्वला पळसकर यांनी केले आहे. सभासदांनी कागदपत्रे प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, सोलापूर यांच्या कार्यालयात- सोलापूर जिल्हा महसूल कर्मचाऱ्यांची पतसंस्था इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार येथे पुढील सात दिवसांत जमा करावीत, असेही सूचित करण्यात आले आहे.

सदर कागदपत्रे वेळेत सादर केल्यास मतदारयादीचे पुढील कामकाज सुरळीत पार पाडणे शक्य होणार आहे. त्यामुळे सर्व सभासदांनी या आवाहनाची नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, असे प्रशासक पळसकर यांनी कळविले आहे.

## कला-गुणांचा अविष्कार : ए. जी. पाटील इंजिनिअरिंगमध्ये 'अभियुवा' उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ मे-**

ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, म्हणून अभ्यासक्रमासोबतच अभ्यासक्रमपूरक तसेच अभ्यासेतर असे अनेक उपक्रम राबविले जातात. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी अभियुवा हा कार्यक्रम उपक्रम राबविण्यात आला. अभियुवा हे एक सांस्कृतिक, कला गुणांना वाव देणारे एक समृद्ध व्यासपीठ आहे.

अभियुवाचे आयोजन महाविद्यालयाचे सांस्कृतिक मंडळ करत असते. याही वर्षी सांस्कृतिक मंडळाच्या अध्यक्षा डॉ. पाटील प्रियंका आणि त्यांच्या टीमने अतिशय नियोजनबद्ध कार्यक्रमाची आखणी केली. अभियुवा हा उपक्रम तीन दिवस चालला. प्रथम दिनी मेहंदी, रांगोळी, मिसमॅच डे, ट्विन्स डे इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मेहंदी, रांगोळी या मुलींचे वर्चस्व असणाऱ्या क्षेत्रात मुलांनीही आपला सहभाग नोंदविला व कला सादर केली. ट्विन्स डे, मिसमॅच डे मध्ये जवळजवळ १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. नाविन्यपूर्ण वेशभूषेस बक्षिसेही



जाहीर करण्यात आली.

दुसऱ्या दिवशी बॉलिवूड डे, रेट्रो डे इ. चे सादरीकरण झाले. यातही विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व सहभाग नोंदविला. सर्व पारंपारिक वेशभूषेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रत्येक विभागाची एक थीम ठरविण्यात आली होती. प्रत्येक विद्यार्थ्यांनी रॅम्प वॉक करून भारतीय संस्कृतीचे पारंपारिक वेशभूषेचे सादरीकरण केले.

त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन तिसऱ्या दिवशी करण्यात आले होते. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये ग्रुप डान्स, सोलो डान्स, सोलो गायन इ. सादर करण्यात आले. एकूण कार्यक्रमांची संख्या ३५ होती. प्रत्येक विद्यार्थ्याने नृत्याविष्कार केला, त्यातून त्यांनी त्यासाठी घेतलेले कष्ट दिसत होते. उत्कृष्ट नृत्याविष्कारांना बक्षिसे जाहीर करण्यात आली. नृत्यामध्ये पण भरतनाट्यम, कथ्थक, पाश्चात्य इ. विविधता होती.

सांस्कृतिक कार्यक्रमाच्या सादरीकरणाच्या वेळी संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, सचिव एस. एस. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, सर्व विभागप्रमुख, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. प्रियंका पाटील, प्रा. मेघा बिराजदार, प्रा. अक्षया घाळीमठ, प्रा. मेघा देशमुख, प्रा. सुधन्वा देशपांडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सीईओ कुशल जैन यांची वसतीगृहांना अचानक भेट

### विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेत सुविधांबाबत दिले आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

सुट्टीच्या दिवशीही विद्यार्थ्यांच्या हितासाठी मैदानात उतरलेल्या सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी शहरातील जिल्हा परिषद संचलित वसतीगृहांना अचानक भेट देत सुविधांची सखोल पाहणी केली. विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्याने वसतीगृहात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

जिल्हा परिषदेमार्फत शहरात दोन प्रमुख वसतीगृहे चालवली जातात. शेळगी येथील मुलींचे वसतीगृह आणि पार्क चौक परिसरातील मुलांचे नेहरू वसतीगृह या दोन्ही ठिकाणी सीईओ जैन यांनी प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी राहण्याची व्यवस्था, स्वच्छता, भोजनाची गुणवत्ता, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तसेच इतर मूलभूत सुविधांची त्यांनी बारकाईने तपासणी केली. पाहणीदरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या दैनंदिन अडचणी, शैक्षणिक गरजा तसेच वसतीगृहातील काही उणिवा स्पष्टपणे मांडल्या. काहींनी भोजनाच्या दर्जाबाबत सुधारणा, तर काहींनी अभ्यासासाठी अधिक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक सूचनेची दखल घेत जैन यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक



त्या सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

वसतीगृह अधीक्षकांना स्वच्छता, सुरक्षितता, शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने कोणतीही तडजोड होऊ नये. विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि अभ्यासासाठी पोषक वातावरण मिळावे, यासाठी प्रशासन पूर्णपणे कटिबद्ध असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. सीईओंच्या या अचानक पाहणीमुळे वसतीगृह प्रशासनात चांगलीच हालचाल निर्माण झाली असून व्यवस्थापन अधिक सजग झाले आहे. विद्यार्थ्यांनीही या भेटीचे स्वागत करत समस्या थेट प्रशासनापर्यंत पोहोचल्याबद्दल समाधान व्यक्त केले. एकंदरीतच, विद्यार्थ्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी प्रशासनाने घेतलेली ही पुढाकाराची भूमिका महत्त्वाची ठरत असून, आगामी काळात वसतीगृहांच्या सुविधांमध्ये अधिक सकारात्मक बदल अपेक्षित आहेत.

## भावजीने चोरीबाबत विचारणा केल्याने मेहुणीने पिले पिवळे औषध

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ मे-**

आमचे सोने चोरीला गेले आहे 'तुम्ही ते घेतले आहे का असे भाऊजी ने विचारणा केल्याच्या रागात एका मेहुणीने अंगणात सडा मारण्याचे पिवळे कलर पिल्याची घटना नीलम नगर येथे आज सोमवारी सकाळी सात वाजता घडली. प्रमिला चंद्रशेखर दोड्डी (वय ५० वर्षे, रा. नीलम नगर, एमआयडीसी सोलापूर ) असे त्या महिलेचे नाव आहे. आज सोमवारी सकाळी राहत्या घरात असताना महिलेच्या भाऊजी ने आमचे घरातील सोने चोरीला गेले आहे ते तुम्ही घेतले का म्हणून विचारणा केली असता त्याचा राग आल्याने तिने पिवळे कलर पिले. त्रास होऊ लागल्याने तिला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात पती चंद्रशेखर यांनी सकाळीच दाखल केले.

## दमा नियंत्रणात राहू शकतो, गैरसमज दूर करा : डॉ. सुयश पाटील

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ मे-**

दमा (अस्थमा) हा योग्य उपचारांनी पूर्णपणे नियंत्रणात राहू शकणारा आजार असून समाजातील गैरसमज दूर करणे अत्यावश्यक आहे, अशी माहिती रंगभवन परिसरातील श्वास चेस्ट क्लिनिकचे फुफ्फुस विकार तज्ञ व क्रिटिकल केअर स्पेशालिस्ट डॉ. सुयश पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी तन्वीर कोटी उपस्थित होते.

दरवर्षी मे महिन्याच्या पहिल्या मंगळवारी 'जागतिक दमा दिवस' साजरा केला जातो. यंदाची संकल्पना 'दमा शिक्षणाद्वारे सक्षमीकरण' अशी असून, रुग्णांमध्ये जागरूकता वाढवणे हा मुख्य उद्देश आहे. भारतासह महाराष्ट्रातही दम्याच्या रुग्णांची संख्या वाढत असून प्रदूषण, बदलते हवामान आणि जीवनशैली यामुळे लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच त्याचा फटका बसत आहे. मात्र, अजूनही अनेकजण दमा असाध्य असल्याचा गैरसमज बाळगतात आणि वेळेवर उपचार घेत नाहीत, असे त्यांनी सांगितले.

छातीत शिट्टीसारखा आवाज (व्हिजिंग), सतत खोकला विशेषतः रात्री किंवा पहाटे, श्वास घेण्यास त्रास आणि छातीत जडपणा ही प्रमुख लक्षणे असतात. ही आढळल्यास दुर्लक्ष न करता त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. इनहेलरबाबत ते म्हणाले, इनहेलर वापरणे म्हणजे आजार वाढला असा अर्थ नाही. उलट इनहेलर हेच सर्वात प्रभावी उपचार असून औषध थेट फुफ्फुसात पोहोचते आणि दुष्परिणाम कमी होतात. त्यांनी स्पायरोमेट्री चाचणीद्वारे योग्य निदान करावे. दमा असला म्हणजे आयुष्य थांबत नाही. योग्य उपचार आणि काळजी घेतल्यास रुग्ण पूर्णपणे सक्रिय व आनंदी जीवन जगू शकतो. 'दम्यावर नियंत्रण, आयुष्याला संजीवनी' हा संदेश सर्वत्र पोहोचवूया, असे आवाहन डॉ. सुयश पाटील यांनी केले.

# समाजाच्या प्रगतीसाठी बसव विचार आचरणाची गरज

## विरक्त मठाचे राजशेखर महास्वामी यांचे आशीर्वचन; बसव सेंटरच्या विविध पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

सोलापूर : बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वर महाराज यांनी सर्वधर्मसमभाव, समता, स्त्री स्वातंत्र्य, कामाचे महत्त्व यासह आदर्श विचार दिले. महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या वचनांचा प्रसार व प्रचार करण्याची गरज आहे. आज समाज अधोगतीकडे जात आहे. त्याला प्रगतीकडे नेण्यासाठी महात्मा बसवेश्वर महाराज यांचे विचार आचरणाची नितांत गरज आहे, असा उपदेश विरक्त मठाचे राजशेखर महास्वामी यानी दिला.

येथील लिं. राजशेखर मडकी संस्थापित बसव सेंटरच्या वतीने पुरस्कार वितरण सोहळा तसेच मानद पदवीदान व सत्कार



समारंभ हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात (ॲम्फी थिएटर) पार पडला. त्याप्रसंगी ते बोलत होते. सन्मानचिन्ह, सन्मान पत्र, शाल, माळ, शेला, श्रीफळ व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. नंदगाव येथील विरक्त मठाचे राजशेखर महास्वामी यांच्या हस्ते तसेच जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. यावेळी विचारमंचावर संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ, बाबासाहेब कुलकर्णी, पुष्पा गुंगे, मल्लिनाथ पाटील, नीलकंठ कोनापुरे उपस्थित होते. विरक्त मठाचे राजशेखर महास्वामी यांचे आशीर्वचन झाले. प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांनी केले. वचन गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ज्योती बोरामणी यांनी आभार मानले.

### या मान्यवरांचा झाला पुरस्काराने सन्मान

प्रख्यात अस्थिरोगतज्ञ डॉक्टर व्यंकटेश मेतन (बसवभूषण), प्रसिद्ध विज्ञान साहित्यिक प्रा. डॉ.सुनील विभुते (बसवरत्न), सामाजिक कार्यकर्ते डॉ. अशोक हिप्परगी (बसवश्री), नगरसेवक रुद्रेश बोरामणी (बसव तत्वश्री). विक्रम खेलबुडे (पत्रकार), विजय छंचुरे यांच्या आस्था फाउंडेशन संचलित आस्था रोटी बँकेला (आदर्श संस्था).

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...




### 'लायन्स'च्या अध्यक्षपदी प्रशांत रायचुरे, खजिनदारपदी प्रा. निलेश नागणे

**सांगोला, दि. ४ मे-**

आंतरराष्ट्रीय लायन्स संघटना प्रांत ३२३४ ड-१ अंतर्गत लायन्स क्लब ऑफ, सांगोला क्लबचे अध्यक्ष प्रा.नवनाथ बंडगर यांच्या अध्यक्षतेखाली व माजी प्रांतपाल प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या सभेत २०२६-२७ करिता अध्यक्षपदी प्रशांत रायचुरे, सचिवपदी प्रा.प्रसाद खडतरे तर खजिनदारपदी प्रा.निलेश नागणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी सदस्य विलास क्षिरसागर, सचिव सूर्यकांत कांबळे, खजिनदार मंगेश म्हमाणे, उन्मेष आटपाडीकर, प्राचार्य अमोल गायकवाड, प्रा.शिवशंकर तटाळे, सुनील भोरे, प्रा.डी.के.पाटील, प्रा.तानसिंग माळी, प्रा.धनाजी चव्हाण, सचिन पाटणे, दत्तात्रय देशमुख उपस्थित होते. प्रा.नवनाथ बंडगर यांनी आभार मानले.



### श्री शेखागौरी यात्रेनिमित्त मोफत लिंबू सरबत वाटप

**बार्शी, दि. ४ मे-**

बार्शी तालुक्यातील मालवंडी येथे श्री शेखागौरी यात्रेनिमित्त शिवम इलेक्ट्रिकल्सच्यावतीने गेल्या सहा वर्षांपासून सुरु असलेला सामाजिक उपक्रम यंदाही उत्साहात पार पडला. तब्बल १ हजार लिटर मोफत लिंबू सरबत वाटप करण्यात आले. याप्रसंगी शिवम इलेक्ट्रिकल्सचे शरद माळी, सुमित माळी, बालाजी माळी, आधिरा मोबाईल शॉपीचे किरण खुरंगळे, ओंकार लोखंडे, विठ्ठल खंडागळे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

### सोलापूर जिल्हा परिषदेत महाराष्ट्र दिन साजरा

**सोलापूर, दि.४ मे**



जिल्हा परिषदत महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सोलापूर जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन जिल्हा परिषद चे अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, महिला बालकल्याण समितीच्या सभापती ॲड. अमृता वाघे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर ध्वजारोहण जिल्हा परिषद चे अध्यक्ष दीपक वैद्य यांचे हस्ते करून मानवंदना देणेत आली. या प्रसंगी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, अतिरिक्त मुख्य लेखा व वित्त अधिकारी उबाळे, यांचेसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रारंभी महाराष्ट्र गीत घेण्यात आले. ध्वजारोहण करून राष्ट्रगीत घेणेत आले. हरिभाऊ देवकरण प्रशालेते विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र गीत व राष्ट्रगीत सादर केले.

### सांगोला ग्रामीण रुग्णालयातील कारभाराविरुद्ध १२ मे रोजी रास्ता रोको आंदोलन

**सांगोला, दि. ४ मे-**

सांगोला ग्रामीण रुग्णालयातील कारभाराविरुद्ध दि.१२ मे रोजी स.११ वा. सांगोला-पंढरपूर हायवेवर बिलेवाडी येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा नगरसेवक सतीश सावंत यांनी राज्याच्या आरोग्यमंत्र्यांकडे लेखी निवेदनाद्वारे दिला आहे. सांगोला ग्रामीण रुग्णालयात प्रचंड प्रमाणात रुग्णांची लूट सुरू असून, रुग्णांना सेवा दिल्या जात नाहीत. तसेच मयत झालेल्यांच्या शवविच्छेदनासाठी व रिपोर्ट देण्यासाठी पैशांची मागणी केली जात आहे. याशिवाय शवविच्छेदन रिपोर्ट दिले जात नाहीत. सांगोल्यात आपण मरावे का नको, असा प्रश्न जिवंतपणी नागरिकांना पडायला लागला आहे; कारण मेल्यानंतरही पैशासाठी नातेवाईकांची अडवणूक होत आहे. तरी याबाबत चौकशी करून कारवाई करावी या मागणीसाठी आंदोलन करण्यात येणार आहे.


पूर्वा जोजारे


स्नेहा गंभीरे


यश काबरा

### शांती कॉलेजचा बारावीचा निकाल १०० टक्के

**सोलापूर, दि. ४ मे-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या बारावीच्या परीक्षेत संतोषनगर, विजापूर रोड येथील शांती ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स कॉलेजचा निकाल १०० टक्के लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर अण्णाराव पाटील, प्राचार्य रजुला मॅक यांनी अभिनंदन केले आहे. प्रथम तीन विद्यार्थी : जोजारे पुर्वा ८३.६७%, गंभीरे स्नेहा ८३.३३%, काबरा यश ८१.५०%.

# बार्शी तालुक्यात बारावीमध्ये मुलींची सरशी कायम

**९५.६८ टक्के मुली तर ८८.६३ टक्के मुले उत्तीर्ण**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ मे-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या बारावी (कडउ) परीक्षेचा निकाल शनिवार, २ मे रोजी दुपारी १ वाजता ऑनलाइन जाहीर झाला. यंदा बार्शी तालुक्याने ९१.८० टक्के निकालाची उज्वल कामगिरी करत शैक्षणिक क्षेत्रात आपली परंपरा कायम राखली आहे. यंदाच्या निकालात मुलींनी पुन्हा एकदा बाजी मारत ९५.६८ टक्के उत्तीर्णता मिळवली, तर मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८८.६३ टक्के इतके राहिले आहे. तालुक्यातून ५७४२ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती. त्यापैकी ५६७३ विद्यार्थी परीक्षेस बसले. यामध्ये ३१२३ मुले व २५५० मुलींचा समावेश होता. निकालानुसार २७६८ मुले व २४४० मुली असे एकूण ५२०८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.




**श्री शिवाजी महाविद्यालय**

श्री शिवाजी महाविद्यालयाने यंदाही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९२.२० टक्के तर कला शाखेचा निकाल ८०.८० टक्के लागला आहे. कला शाखेत सुयश गुंड (९०.५०%) प्रथम, साक्षी व्हळे (८८%) द्वितीय आणि श्रुती भालेराव (८७.८३%) तृतीय क्रमांकावर राहिले. विज्ञान शाखेत सोनाली माने (८६.५०%) प्रथम, स्नेहा मुसळे (८३.१७%) द्वितीय तर गणेश घंटे (८०.८३%) तृतीय क्रमांकावर आहेत.

**बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज**

बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजने इयत्ता बारावी परीक्षेच्या निकालात आपली यशाची परंपरा कायम ठेवली आहे. वाणिज्य शाखेने ९०.४९ टक्के निकालासह उत्कृष्ट कामगिरी केली आहे, तर कला शाखेचा निकाल ७३.४६ टक्के लागला आहे.

वाणिज्य शाखेतील गुणवंत विद्यार्थी : श्वेता जगदाळे - ८८.१७% (प्रथम) २) वैष्णवी सुतकर ८८.००% (द्वितीय) ३) साक्षी कांबिरे (तृतीय) कला शाखेतील गुणवंत विद्यार्थी : आयन पठाण - ८०.५०% (प्रथम) स्नेहल बारंगुळे - ८०.३३% (द्वितीय) हुमेरा पानसरे - ७३.५०% (तृतीय) या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे तसेच श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.बी. शेख, बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय करंडे यांनी अभिनंदन केले.

**श्रीमान झाडबुके महाविद्यालय**

श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाने विज्ञान, कला व वाणिज्य या तिन्ही शाखांमध्ये उत्कृष्ट निकाल देत यशाची परंपरा कायम राखली आहे. विज्ञान शाखेत वरद जंगम- ९०% (प्रथम), समर्थ पाटील- ८५% (द्वितीय),रेवती गुरव- ८१.५०% (तृतीय) क्रमांक मिळविला. कला शाखेत अस्मिता ननवरे- ९४.६७% (प्रथम),श्वेता जाधव- ८५.६७% (द्वितीय), रुक्सार सय्यद- ८१.३३% (तृतीय) क्रमांक मिळविला. वाणिज्य शाखेचा एकूण निकाल ८५.७५% लागला आहे.

**विशेष कामगिरी :**

श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाची विद्यार्थिनी अस्मिता अनिल ननवरे हिने भूगोल विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात प्रथम स्थान पटकावले. ही कामगिरी बार्शी तालुक्यासाठी अत्यंत अभिमानाची ठरली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा प्रभा झाडबुके, खजिनदार वर्षाताई ठोंबरे, प्राचार्य डॉ. मनोज गादेकर, उपप्राचार्य भास्कर करडे, पर्यवेक्षक सतीश रणदिवे तसेच शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## विद्यामंदिरच्या शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना दिशा : आयुक्त चोथे

**एनएमएमएस शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा सन्मान**



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.४ मे-**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये उपजतच चिकाटी आणि संघर्षाची जिद्द असते. विद्यामंदिरच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या या गुणवत्तेला दिशा दिल्यानेच ही प्रशाला एनएमएमएस शिष्यवृत्तीधारक संख्येत राज्यात तिसऱ्या स्थानावर झळकल्याचे प्रशंसोद्गार महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्त महेश चोथे यांनी केले.

विद्यामंदिर परिवाराच्या सांगोला, नाझरा, कोळा या शाखांमधील ७४ एनएमएमएस शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात चोथे बोलत होते. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सांगलीचे शिक्षणाधिकारी महेश धोत्रे, संस्था सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, प्राचार्य बिभीषण माने, उपमुख्याध्यापक चारुदत्त जगताप, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे उपस्थित होते.

प्रारंभी बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण केला. महेश धोत्रे यांनी गणित व विज्ञानातील मूलभूत संकल्पनांवर भर देण्याचे आवाहन केले. प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी आत्मविश्वास ही यशाची जननी या उक्तीप्रमाणे आव्हानांना सामोरे जाण्याचा सल्ला दिला. सूत्रसंचालन सुनील भोरे, आशुतोष नष्टे तर पारितोषिक वाचन अमोल महिमकर, वैभव कोठावळे यांनी केले. आभार पर्यवेक्षक प्रदीप धुकटे यांनी मानले.

**५ वर्षांत १ कोटी ५३ लाखांचे अर्थबळ**

२०२१ ते २०२६ या पाच वर्षांच्या कालावधीत विद्यामंदिर परिवारातील एकूण ३२० विद्यार्थी एनएमएमएस शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना पुढील चार वर्षांत एकूण १ कोटी ५३ लाख ६० हजार रुपये इतकी भरघोस शिष्यवृत्ती रक्कम प्राप्त होणार आहे.



## चिखर्डे येथे दहावी बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि ४ मे-**

चिखर्डे गावातील जि. प. प्राथमिक शाळा चिखर्डे व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय चिखर्डे येथे शिक्षण घेतलेल्या २००४-०५ या वर्षातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शनिवार, दि. २ मे रोजी चिखर्डे येथील संभाजीराजे भवन येथे पार पडला.

सकाळी जि. प. प्राथमिक शाळा व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय येथे प्रार्थना झाली. संभाजीराजे भवन येथे दीपप्रज्वलन करुन छत्रपती शिवाजी महाराज, विठ्ठल-रुक्मिणी व देवी सरस्वती यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन स्नेहमेळाव्याची सुरुवात झाली. अध्यक्षपद गुरव यांनी भूषविले. कार्यक्रमास पाटील, पाचकवडे, पाटील, कासार, लाटे, भोसले व उकिरडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सर्व विद्यार्थ्यांनी परिचय व मनोगत व्यक्त केले. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

स्नेहमेळाव्याबाबत गणेश शिंदे, प्रफुल्ल पाटील व सरिता कोंढारे यांनी मते मांडली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या बॅचबद्दल गौरवोद्गार काढत काही विद्यार्थ्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. भोजनानंतर उखाणे, गाण्याच्या भेंड्या, संगीत खुर्ची आदी खेळ घेण्यात आले. परिणामी कार्यक्रम अधिक रंगतदार झाला. शेवटी सर्व उपस्थितांनी सामूहिक छायाचित्र काढून आनंददायी वातावरणात स्नेहमेळाव्याची सांगता करण्यात आली.

### विवाहितेची मोबाईल व हॅन्डबॅग पळविली

**सोलापूर, दि. ४ मे-**

पेपर द्यायला कॉलेजला आलेल्या एका विवाहित तरुणीचा मोबाईल व हँडबॅक पळवून नेल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. श्रीयांश शेखर राचर्ला (रा. जुना विडी घरकुल) असे गुन्हा दाखल आरोपीचे नाव आहे. याबाबत शैलेजा अमर गणपा (वय २१, रा. नवीन विडी घरकुल) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी ही दोन मे रोजी सकाळी दयानंद कॉलेज येथे परीक्षेचा पेपर देणेकरीता आली असता आरोपीने फिर्यादीची बॅग घेवून तिला जवळील कॅन्टीनमध्ये नेले व फिर्यादीस तु तुझ्या नवऱ्याला सोड माझ्याशी लग्न कर, आपण पळून जावून लग्न करू असे म्हटले असता फिर्यादीने त्यास नकार दिला. तेव्हा अरोपीने मोबाईल व परीक्षेचा हॉल तिकीट असलेली फिर्यादीची बॅग पळवून नेली. पोलीस हवालदार लोहाहे तपास करीत आहेत .

### 'जोशाबा'च्यावतीने बार्शी तालुक्यात चार ठिकाणी व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**पांगरी, दि. ४ मे-**

जो. शा. बा. बहुउद्देशिय सेवाभावी संस्था चिंचोली (ता. बार्शी) यांच्यावतीने तालुक्यात चार ठिकाणी डॉ. बाबसाहेब आंबेडकर व महात्मा जोतिबा फुले जयंतीचे औचित्य साधून बार्शी पंचायत समिती, भीम जोत तरुण मंडळ नारी प्रभुद्ध ट्रस्ट पिंपळगाव, बुद्ध भूमी तरुण मंडळ चिंचोली येथे प्रमुख सभापती, जि. प. सदस्य, सरपंच, पोलीस पाटील, पांगरी पोलीस स्टाफ यांच्या उपस्थितीत जोशाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेची सत्यशोधकी व्याख्याने अनिल खूने यांनी आपल्या व्याख्यानाच्या माध्यमातून राष्ट्रपुरुष आणि राष्ट्रसंत यांच्या विचारांचा जागर केला.

## कॉपीमुक्त अभियानामुळे निकालाच्या टक्केवारीत घट

**पुढील प्रवेशाची चिंता**

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव, दि ४ मे-**

बारावी परीक्षेच्या निकालावर यंदा मंडळाकडून राबवलेल्या कॉपीमुक्त अभियानाचा परिणाम झाला आहे. गतवर्षी पुणे बोर्डाचा निकाल ९१ टक्के होता यंदा तोच निकाल ८९ टक्के लागला आहे.

महाराष्ट्र शिक्षण मंडळाने यंदा कॉपीमुक्त अभियानांतर्गत प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही, ड्रोन द्वारे पाहणी, खिडक्यांना जाळी, बैठे पथक, फिरते पथक, तसेच ज्याठिकाणी कॉपी सापडेल त्याठिकाणी केंद्र प्रमुख व सुपरवायझर, कर्मचारीवर्ग यांच्यावर गुन्हे दाखल यामुळे खरेतर यंदा निकालावर परीणाम झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. माळशिरस तालुक्यात याबाबत पुढील वर्षी सुद्धा प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. अनेक विद्यार्थ्यांना मार्क कमी मिळाले अनेकांचे ग्रुप न आल्यामुळे पुढे प्रवेश मिळतो की नाही एम.एच सिईटी, जेईई तसेच निटच्या निकालावरच पुढील प्रवेशाचे गणित अवलंबून राहणार आहे. यामुळे पालक व विद्यार्थी चिंतेत आहेत.ज्या विद्यार्थ्यांनी अकरावी व बारावीसाठी खासगी क्लासेस लावून तयारी केली त्यांनाच अपेक्षित यश मिळाले आहे.विज्ञान शाखेकडे विद्यार्थ्यांचा सध्या कल दिसून येत आहे.

## मंगळवेढा इंग्लिश स्कूल ज्युनियर कॉलेजचे बारावी परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ४ मे-**



पुणे राज्य शालांत मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या एच.एस.सी. परीक्षा २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यामध्ये शिक्षण प्रसारक मंडळ संचलित इंग्लिश स्कूल ज्युनियर कॉलेज, मंगळवेढा येथील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

या निकालामुळे महाविद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९०.१७ टक्के लागला असून वाणिज्य शाखेचा निकाल ७७.९८ टक्के आणि कला शाखेचा निकाल ५७.०७ टक्के लागला आहे. या परीक्षेत विज्ञान शाखेतून अस्मिता चेळेकर (८२.००%), सृष्टी नागणे(८१.५०%) व ज्ञानेशरी माने (८०.००%) यांनी यश मिळवले. वाणिज्य शाखेतून श्रावणी घुले (८३.५०%), अपेक्षा मोरे (८०.००%) व वैभवी कोरे (७४.५०%) यांनी चमकदार कामगिरी केली. कला शाखेतून सोमनाथ कांबळे (७२.६७%), समृद्धी चव्हाण (७१.६७%) व वैभवी भालेराव (६९.८३%) यांनी यश संपादन केले. डिपार्टमेंट ऑफ व्होकेशनल' विभागाने भाग्यश्री चौगुले हिने ४६५ गुण मिळवून ७७.५% गुणांसह विभागात प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. ऐशर्या कोकणे हिने ४२५ गुणांसह ७०.८३% मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला आहे. निकिता चेळेकर हिने ४२४ गुण मिळवून ७०.६७% गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. सुजित कदम, उपाध्यक्ष डॉ. सुभाष कदम, सचिव डॉ. प्रियदर्शनी महाडिक, संस्थेच्या प्रशासकीय प्रमुख डॉ. मीना कदम, सहसचिव श्रीधर भोसले, संचालिका प्रा. तेजस्विनी कदम,अजिता भोसले, खजिनदार रामचंद्र नेहरवे आणि प्राचार्य रवींद्र काशीद यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

बारावी शास्त्र (विज्ञान) शाखेची विद्यार्थिनी सृष्टी नागणे हिने गणिताच्या विषयात १०० पैकी १०० गुण संपादन करून बोर्डात प्रथम स्थान मिळवण्याचा ऐतिहासिक पराक्रम केला आहे.

## 'झी कन्नड सारेगमप' फेम दिव्यांग गायक रेवणसिध्द फुलारी बारावीत यशस्वी

**जिद्द आणि चिकाटीचे मूर्तिमंत उदाहरण**



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि ४ मे-**

शारीरिक दिव्यांगत्वावर मात करत आणि संकटांना संधीत रूपांतरित करत, तोळणूर येथील श्री सिद्धरामेश्वर उच्च माध्यमिक प्रशालेचा विद्यार्थी आणि प्रसिद्ध गायक रेवणसिद्ध पुंडलिक फुलारी याने बारावीच्या परीक्षेत ५६.३३% गुण मिळवून उज्वल यश संपादन केले आहे. झी कन्नड 'सारेगमप' या सुप्रसिद्ध सिंगिंग रियालिटी शोमध्ये टॉप फोरपर्यंत मजल मारणाऱ्या रेवणसिद्धने शिक्षणातही आपली चमक कायम ठेवली असून, सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन होत आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेली यंदाची परीक्षा अत्यंत कडक आणि कॉपीमुक्त वातावरणात पार पडली. या आव्हानात्मक परिस्थितीत रेवणसिद्धने लेखनिकाच्या साहाय्याने परीक्षा दिली होती. विशेष म्हणजे, या शाळेतील परीक्षेला बसलेल्या ३० विद्यार्थ्यांपैकी केवळ ६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्यात रेवणसिद्धने स्थान मिळवून आपली अभ्यासातील जिद्द सिद्ध केली आहे. यापूर्वी त्याने दहावीच्या परीक्षेतही ८८% गुण मिळवून यश मिळवले होते.

.रेवणसिद्धला वर्गशिक्षक वैभव पोतदार, रेणुकाचार्य हिरेमठ, रेवणसिद्ध मणूरे, शिवानंद करजगी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्रशालेचे प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड, प्रकाश अतनुरे, हमीद नदाफ, काशिनाथ चलगेरी, माणकोजी मॅडम,पवार सर,यशवंत हरळय्या सर तसेच शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. एका दिव्यांग कलाकाराने प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळवलेल्या या यशाचे परिसरात कौतुक होत आहे.

**अधिकारी होण्याचे स्वप्न**

आपल्या यशाबद्दल बोलताना रेवणसिद्ध म्हणाला, बारावी उत्तीर्ण होण्याचे महत्त्व मला या निकालावरून समजले आहे. माझ्या कुटुंबाने आणि शिक्षकांनी मला नेहमीच प्रोत्साहन दिले. माझे स्वप्न एक मोठा अधिकारी होण्याबरोबर देशातील सुप्रसिद्ध गायक होणार असून, त्यासाठी मी माझे शिक्षण आणि संगीत शिक्षण अखंडित सुरू ठेवणार आहे. माझ्या यशाचे श्रेय मी माझ्या गुरुजनांना आणि लेखनिक म्हणून मदत करणाऱ्या प्रसाद रामतीर्थ याला देतो.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तरुणाच्या खूनाप्रकरणी सहा आरोपींना ८ मे पर्यंत पोलिस कोठडी

**सोलापूर, दि. ४ मे-**

रविवारी सकाळी सुरेश कृष्णा श्रीराम (वय ३५, रा. घर नं. ८८, रफिक नगर, एमआयडीसी, भारत गॅस गोडाऊन जवळ) या तरुणाचा गजबजलेल्या रस्त्यावर अमानुषपणे खून केला होता. याप्रकरणी अटक सर्व सहा आरोपींना आज सोमवारी येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता त्यांना ८ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

विजय अशोक श्रीराम, रोहित बसप्पा आण्णा रेडडी, करण अशोक श्रीराम, सुमित अशोक श्रीराम, राहुल बसप्पा आण्णा रेड्डी (सर्व आरोपी रा. कुंचीकोरवी गल्ली, मौलाली चौक, सोलापूर) आणि सुभाष सगडा (रा. नई जिंदगी, सोलापूर ) अशी आरोपींची नावे आहेत.

वरील आरोपींनी वराह चोरल्याचा आणि त्यांना विष घालून मारल्याचा २०२० मध्ये पोलिसात दाखल केलेला खटला माघारी न घेतल्याच्या रागातून सुरेश कृष्णा श्रीराम याचा रविवारी सकाळी माधवनगर येथील नीलम बेकरी हॉटेलसमोर भर रस्त्यावर तीक्ष्ण हत्यारांनी वार करून व डोक्यात दगड घालून खुलेआम खून केला. खूनानंतर आरोपी दुचाकीवरून फरार झाले होते. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होऊन वरील सर्व आरोपींना अटक केली होती. त्यानंतर या सर्व आरोपींना येथील न्यायालयात सोमवारी हजर करण्यात आले होते. याबाबत मयत सुरेशची पत्नी लक्ष्मी सुरेश श्रीराम (वय- ३०, रा. घर नं. ८८, रफिक नगर, एमआयडीसी भारत गॅस गोडाऊन जवळ) हिने फिर्याद दिली आहे. तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत करीत आहेत.



## महत्त्वाचे...



### पोलिस उपनिरीक्षक युवराज गवळींचा सन्मान

**सांगोला, दि.४ मे -**

पोलिस खात्यात कार्यरत असणाऱ्या सांगोला शहरातील युवराज गवळी यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल शिवराजे ग्रुप, कोष्टी गल्ली, सांगोला यांच्याकडून सन्मान करण्यात आला. याप्रसंगी विलास नलवडे, महेश नलवडे, कन्हैया वेदपाठक, विजय नलवडे, अनिल गवळी, अनिकेत बोत्रे, प्रशांत बोत्रे, प्रशांत खडतरे, अमित जांगळे, गोटू भंडारे, सोमनाथ गवळी, सुशील गवळी उपस्थित होते. यावेळी विलास नलवडे, युवराज गवळी यांनी मनोगत व्यक्त केले. अविनाश नलवडे यांनी आभार मानले.

### बार्शीतील एमआयटी ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे बारावी बोर्ड परीक्षेत यश

**बार्शी, दि. ४ मे-**

बार्शीतील एमआयटी ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी बारावी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक क्षेत्रात आपली गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. निकालात कॉमर्स शाखेचा



१००%, तर सायन्स शाखेचा निकाल ९८.१३% लागला. सायन्स शाखेतील इमामबी नियामत मोमीन हिने ९२.५०% गुण मिळवले तर तिने गणित विषयात १०० पैकी १०० मिळवले आहेत. कॉमर्स शाखेतील विशाखा विष्णुदास पल्लोड हिने ९२% गुणांसह अकाऊंट विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. याशिवाय, कॉमर्स शाखेतील दीपक गुळवे आणि प्रसाद मालू यांनीही अकाऊंट विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून विशेष प्राविण्य मिळवले. यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. सचिन चव्हाण आणि अॅकॅडमिक हेड डॉ. ज्योती ज्योतवाणी तसेच माईर्स एमआयटी संस्थेच्यावतीने अभिनंदन करण्यात आले.




### गुणवंत विद्यार्थी हेच संस्थेचे वैभव : प्रा. नीलिमा कुलकर्णी

**सांगोला, दि.४ मे -**

विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे केवळ त्यांचे वैयक्तिक यश नसून ते शाळेचे आणि संस्थेचे वैभव आहे. कष्टाळू विद्यार्थी आणि समर्पित शिक्षक यांचा उत्कर्ष माता बालक प्रतिष्ठान संस्थेला सार्थ अभिमान आहे, असे प्रतिपादन संस्थेच्या अध्यक्षा प्रा. नीलिमा कुलकर्णी यांनी केले. उत्कर्ष माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इ.१२ वीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरव सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी संस्थेच्या कोषाध्यक्ष डॉ.शालिनी कुलकर्णी, सचिव वसुंधरा कुलकर्णी, प्राचार्य सुनील कुलकर्णी, प्रा.राजेंद्र ठोंबरे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका विश्रांती बनसोडे, बालक मंदिरच्या मुख्याध्यापिका संध्या शास्त्री, पर्यवेक्षिका सुनयना मजगे उपस्थित होत्या. याप्रसंगी डॉ.शालिनी कुलकर्णी, प्रा.राजेंद्र ठोंबरे, प्रा. तेजस्विनी मेटकरी, प्रा.सुनील कुलकर्णी, गुणवंत विद्यार्थी यांनी मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविक प्रा.अनुजा वसमळे यांनी केले.



### नसरापूर अत्याचार प्रकरणातील नराधमास मृत्युदंड द्या : सातलिंग शटगार

**सोलापूर, दि. ४ मे -**

भोर तालुक्यातील नसरापूरमध्ये लहान मुलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या नराधमास मृत्युदंडाची शिक्षा द्या, अशी मागणी सोलापूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांनी केली आहे. नराधम वृद्धास पोलिसांनी कोर्टासमोर उभा केल्यानंतर त्याला ७ मे पर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. त्याला कोर्टात नेत होते त्यावेळी गावकऱ्यांनी संताप व्यक्त करून त्याला आमच्या ताब्यात द्या, अशी मागणी करून मोर्चा काढला. महिलांनी सरकारवर ताशेरे ओढले. हे सरकार मायबाप नसून जनतेच्या विरोधातील सरकार आहे. महिला सुरक्षित नाहीत. गॅस सिलेंडरसाठी रांगा लावलेल्या दिसतात. पेट्रोल, डिझेल, गॅसच्या किमती वाढणार आहेत. महापुरुषांचा अवमान केले जातात. लहान मुली व महिलांवर अत्याचार करणाऱ्या नराधमास मृत्युदंडाची शिक्षा द्यावी. खरात सारख्या भोंदूबाबांवरही कारवाई झाली पाहिजे. महापुरुषांचे अवमान करणाऱ्यांनाही समज दिली पाहिजे, अशी मागणी सातलिंग शटगार यांनी केली आहे.

# जनमेजयराजेंच्या वृक्षप्रेमामुळे सोलापूर रस्त्यावर हिरवाई

### ध्येयवेड्या वृत्तीमुळे अक्कलकोटला हिरवेगार वैभव पुन्हा प्राप्त

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.४ मे -**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी संपूर्ण जगाला अन्नदान श्रेष्ठ दान दाखवून मोठी संस्था उभी केली. अशाच त्यांच्या ध्येयवेड्या वृत्तीमुळे त्यांनी सोलापूर रस्त्यावर सातत्यपुर्व प्रयत्नाने वृक्षांची जोपासना करुन हा मार्ग सुखद हिरवागार केला आहे.








जग वेगाने प्रगती करीत आहे पण आज वसुंधरा धोक्यात आहे पर्यावरण संतुलन बिघडत आहे. पर्यावरण संरक्षणासाठी वृक्ष लागवड व संवर्धनाचे मोठे काम अक्कलकोटमध्ये श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले नेटाने करीत आहेत. सोलापूर रस्त्यावर ११ जाने २०२० रोजी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने लावलेली झाडे आज डौलाने बहरली आहेत. जनमेजयराजे भोसले यांची पर्यावरण संरक्षण बाबतची तळमळ ही प्रत्येकाने अंगीकारावी. तालुक्यात वृक्ष लागवड व संवर्धन ही चळवळ जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अधिक व्यापक व गतीने झाल्यास प्रज्ञापुरी अक्कलकोटचे गत वैभव पुन्हा प्राप्त होण्यास वेळ लागणार नाही असा आशावाद पर्यावरण प्रेमी नागरिकातून व्यक्त होत आहे .

तीस ते चाळीस वर्षापूर्वा अक्कलकोट सोलापूर रस्ता कोन्हाळी गावापर्यंत गर्द वडाच्या झाडीचा होता. जमिनीवर सूर्यप्रकाशही पडत नव्हता. या मार्गावरून प्रवास करणेही भिती वाटायची. हीच परिस्थिती हन्नुर रस्त्याची होती. हन्नुर रस्त्यावरही भल्या मोठ्या वडाच्या झाडाची गर्दी होती. मात्र वेळोवेळी रस्ते विकास कामाच्या अनुषंगाने झाडांची मोठी कत्तल झाली. मात्र आपण अक्कलकोटचे पुर्वीचे वृक्षवैभव पुन्हा उभे करू शकलो नाही अशी पर्यावरण प्रेमी व वयोवृद्ध नागरिकामध्ये मोठी खंत आहे. मात्र ध्येयवेडे असलेल्या जनमेजयराजे भोसले यांनी सहा वर्षापूर्वी सोलापूर रस्त्यावर केलेले वृक्षारोपण व संवर्धन पाहता हे चित्र बदलू शकते असा आशावाद निर्माण झाला आहे.

जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली वृक्ष लागवड व संवर्धनाची ही चळवळ अधिक व्यापक व्हावी ही अपेक्षा पर्यावरण प्रेमी नागरिकांतून व्यक्त होत आहे.

**क्रीडांगणाच्या भिंती केल्या बोलक्या**

सोलापूर रस्त्यावर जनमेजयराजे भोसले यांच्या पुढाकाराने लावलेली झाडे आज डौलाने उभी आहेत. राजे फत्तेसिंह क्रीडांगणावरही जनमेजयराजे भोसले यांच्या पुढाकाराने अन्नछत्र मंडळाने वृक्षारोपण केले.

टँकरने झाडांना पाणी घातले, वृक्ष संवर्धन केले क्रीडांगणावर आसन व्यवस्था व संरक्षक भिंतीवर 'वसुंधरा बचाव पर्यावरण बचाव' 'पाण्याचे, शिक्षण आरोग्य योग यांचे महत्व सांगणारे संदेश लिहिले. क्रीडांगणाच्या भिंती बोलक्या केल्या.

# जोडबसवण्णा चौकातील अतिक्रमणावर मनपाचा हातोडा



भाजी मंडई परिसरातील १४ खोके जागेवरच निष्कासित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज शहरातील जोड बसवण्णा चौकातील भाजी मंडई परिसरातील अतिक्रमण हटविले. पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने या परिसरातील १४ खोके जागेवरच निष्कासित करण्यात आली.

सोलापूर शहरात अतिक्रमणा विरोधात महापालिकेने आज जोरदार मोहीम राबविली. या परिसरात महानगरपालिकेच्या भाजी मंडई बाहेरील अतिक्रमित पत्र्याच्या शेडखाली चालणारी हॉटेल्स, खोके, डेरा व मटका विक्रीची दुकाने यांच्यावर अतिक्रमण विभागाने जेसीबी फिरविला. तब्बल १४ खोके पूर्णपणे निष्कासित केली.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिक्रमण प्रतिबंधक विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने थेट जेसीबीच्या साहाय्याने कारवाई धडक कारवाई केली. कारवाईवेळी आम्ही अनेक वर्षांपासून येथे व्यवसाय करतो, आमच्याकडे जुन्या दंडाच्या पावत्या आहेत अशी विनंती काही दुकानदारांनी केली. यावर बनसोडे म्हणाले की, महानगरपालिकेच्या दंडाच्या पावत्या या केवळ दंड आकारल्याच्या नोंदी असतात; त्या अतिक्रमण करण्यास परवानगी देत नाहीत. त्यामुळे पावत्या दाखवून कारवाई टाळता येणार नाही, असे स्पष्ट केले. विरोधाला न जुमानता कारवाई करण्यात आली.

**व्यापारी आणि अधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक**

जोडबसवण्णा चौक ते जम खंडी पूल दरम्यान असलेल्या जुन्या कार खरेदी-विक्री कार्यालयाचे अतिक्रमणही हटवून कार्यालय निष्कासित करण्यात आले. पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. कारवाई दरम्यान व्यापारी आणि अधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक झाली.




# चंद्रभागेला पाणी; मात्र शहरातील गल्लीबोळात पाण्याची वानवा

### बुरुड गल्ली-घडशी गल्लीतील नागरिक त्रस्त; विक्रम शिरसटांचा घागर मोर्चाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ मे -**

पंढरपूर नगरपालिकेच्या मुख्य इमारतीलगत असलेल्या बुरुड गल्ली व घडशी गल्ली परिसरात नळाद्वारे पाणीपुरवठा होत नसल्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. एकीकडे चंद्रभागा नदी सध्या दुथडी भरून वाहत असतानाही या भागात पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने नगरपालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

याप्रकरणी माजी नगरसेवक विक्रम शिरसटांचा घागर मोर्चाचा इशारा दिला आहे. प्रभाग क्रमांक ९ मधील नागरिकांनी त्यांच्या पाण्याच्या समस्येबाबत नगरसेविका प्रतीक्षा शिरसट यांच्याकडे तक्रार केली. यानंतर त्यांचे पती व माजी नगरसेवक विक्रम शिरसट यांनी तातडीने नगरपालिकेचा टँकर या भागात आणून नागरिकांची पाण्याची तात्पुरती सोय केली. चंद्रभागा नदी भरून वाहत असतानाही शहरातील गल्लीबोळातील नागरिकांना पाणी मिळत नाही, हा प्रकार अत्यंत निंदनीय आहे.

> **मुख्याधिकारी, नगराध्यांच्या दालनासमोर आंदोलन**
> नगरपालिकेने या भागातील पाण्याची समस्या युद्धपातळीवर सोडवणे गरजेचे आहे. पाण्याचा प्रश्न त्वरित न सोडवल्यास नगरपालिकेचे मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांच्या दालनासमोर सर्व महिलांसह घागर मोर्चा काढण्यात येईल.
> **- विक्रम शिरसट (माजी नगरसेवक)**

### तणनाशक पिलेल्या तरुणाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ मे-**

घरगुती वादातून तणनाशक औषध पिलेल्या कोंडजीगड गावच्या २१ वर्षाच्या तरुणाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयाचा आज सोमवारी सकाळी ११ वाजता मृत्यू झाला. दिनेश दत्तात्रय बिराजदार (वय २१, रा. कोंडजीगड, ता. लोहारा, जि. धाराशिव) असे त्या मयत तरुणाचे नाव आहे. त्याने २६ एप्रिल रोजी दुपारी तीन वाजता घरामध्ये घरगुती वादातून तणनाशक पिले होते. याचा त्रास होऊ लागल्याने त्याला उमरगा येथील दोन खाजगी दवाखान्यात उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात एक मे रोजी भाऊ योगेश बिराजदार यांनी दाखल केले होते. मात्र उपचारादरम्यान त्याचा आज सोमवारी सकाळी मृत्यू झाला.

### जय भारत शाळेत महाराष्ट्र दिन साजरा

**सोलापूर :** जय भारत प्राथमिक शाळेत महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रकांत साबळे, प्रमुख अतिथी सिद्राम फुले, दिपक फुले, मारुती माळगे, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात कामगार नेता अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमा पूजनेने झाली. सूत्रसंचालन किरण गाटे यांनी केले.

### तणनाशक पिलेल्या शेळगावच्या इसमाचा उपचारा दरम्यान मृत्यू

**सोलापूर :** दारूच्या नशेत तणनाशक औषध पिलेल्या शेळगाव आर येथील एका इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात रविवारी संध्याकाळी मृत्यू झाला. विनोद अभिमन्यू बनसोडे ( वय ४५, रा. शेळगाव आर, तालुका बार्शी) असे त्या मयत इसमाचे नाव असून त्याने एक एप्रिल रोजी सकाळी शेतामध्ये दारूच्या नयेत तणनाशक पिले होते. त्रास होऊ लागल्याने त्याला रुग्णवाहिकेतून नातेवाईक संतोष माने यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र त्याचा उपचारादरम्यान रविवारी संध्याकाळी मृत्यू झाला.

# पंचायत समिती भ्रष्टाचारमुक्त करणार

### सभापती दत्ता मगर यांनी थोपटले दंड

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ४ मे-**

माळशिरस पंचायत समिती कार्यालयात प्रशासकीय काळात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळला आहे. माझ्या सभापती कार्यकाळात विकास कामाबरोबर भ्रष्टाचाराचे निर्मुलन करणार असल्याचा निर्धार पंचायत समितीचे नूतन सभापती दत्ता मगर यांनी व्यक्त केला.



पत्रकार परिषदेत ते बोलत होते. नागरिकांना पंचायत समिती कामकाजात काही अडचणी, तक्रारी असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन करून पाणी टंचाईवर लक्ष केंद्रित केल्याचे सांगितले. नूतन सभापती मगर यांनी महिन्यापूर्वी सभापती पदाचा पदभार स्विकारला आहे. या कालावधीत कामकाजाबाबत माहिती जाणून घेतली.तालुक्यातील अनेक नागरिक भेटले प्रत्येकांनी सत्कार केल्यानंतर तक्रारीचे पाढेच माझ्या समोर वाचले. सर्व सामान्यांना योजनांचा लाभ घेताना किती त्रास सहन करावा लागतो समजून आले. अधिकारी वेळेवर कार्यालयात येत नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर स्वत: कार्यालयीन वेळेअगोदर प्रवेशद्वारावर थांबलो असता अनेक अधिकारी वेळेवर येत नसल्याचे दिसून आले. त्यांना समज दिली, आता कर्मचारी, अधिकारी वेळेत येऊ लागले आहेत. शासनाच्या अनेक योजना राबविल्या गेल्या आहेत परंतु त्याचे पूर्णत्व केवळ कागदावरच असल्याचे दिसून येत आहे.जलजीवन सारख्या योजना राबविल्या गेल्या, त्या पूर्ण झाल्याचे सांगितले जाते. परंतु नागरिकांना पाणीच मिळत नसल्याच्या तक्रारी आल्या आहेत. ठेकेदार व अधिकारी यांचे लागेबांधे असल्याने कामे दर्जेदार झाली नाहीत, असे मगर म्हणाले, रोजगार हमी योजने अंतर्गत दिल्या जाणाऱ्या विहिरीसाठी मोठ मोठ्या रकमा घेतल्या जात असल्याच्या तक्रारी आहेत. कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांचा मनमानी कारभार चालू देणार काही. प्रत्येक तक्रारीची चौकशी करून दोषीवर कारवाई करणार आहे.

> **विहिरीच्या कामातील गैरव्यवहारांच्या चौकशीकडे लक्ष**
> काही महिन्यापूर्वी येथील विहीर प्रकरणाचा मोठा गाजावाजा झाला होता. गटविकास अधिकाऱ्यांस मारहाण केल्याचा गुन्हाही दाखल झाला होता. तर बदली झाल्यानंतरही कार्यालयात येऊन एका गटविकास अधिकाऱ्यांनी विहिरींना मंजुरी दिल्याची चर्चा होती. त्यानंतर आलेल्या गटविकास अधिकाऱ्यांनी हे कामकाज थांबवले होते. विहिरीचे काम मशीनने काम केल्याचे उघड झाल्याने मोठा गोंधळ निर्माण झाला होता अशी चर्चा सर्वत्र आहे. त्यातच पैसे घेतल्याचा आरोप होत असल्याने याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शुक्ल यजुर्वेदीय संस्थेच्या विश्वस्तपदी चिंतामणी कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**श्रीपूर, दि. ४ मे-**

श्रीपूर ता. माळशिरस येथील सुवर्ण सहकारी बँकेतील माजी जेष्ठ अधिकारी चिंतामणी कुलकर्णी सध्या वास्तव्य पुणे यांची यजुर्वेदीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, पुणे संस्थेचे विश्वस्त म्हणून नियुक्ती झाली.



यजुर्वेदीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ ही संस्था राज्य पातळीवर काम करते. संस्थेच्या माध्यमातून त्र्यंबक मार्तंड केंघे विद्यार्थी वसतिगृह, श्रीमती सिंधुताई त्र्यंबक केंघे अतिथी गृह, कात्यायनी वधुवर केंद्र, युवा याज्ञवल्क्य उद्योजक विकास अभियान याज्ञवल्क्य नागरी सहकारी पतसंस्था या शाखेच्या माध्यमातून सामााजिक उपक्रम राबविले जातात. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी परतफेड शिष्यवृत्ती आर्थिक मदत, वेदविद्या संवर्धन आदी कामांचा अंतर्भाव आहे. संस्थेची नारायण पेठ, पुणे येथे १५ हजार चौरस फूटाची जागा व स्वमालकीचे कार्यालय आहे. यंदा संस्थेच्या विश्वस्त मंडळात चिंतामणी कुलकर्णी यांची विश्वस्त म्हणून नियुक्ती झाली आहे. चिंतामणी कुलकर्णी हे एम कॉम तसेच जीडीसीए आहेत. त्यांनी सुवर्ण सहकारी बँक, श्रीपूर शाखेत ३७ वर्षे सेवा केली आहे. याज्ञवल्क्य पतसंस्थेत अधिकारी, संस्थेचे इंटरर्नल ऑडिटर म्हणून काम केले आहे. त्यांच्या विश्वस्त म्हणून नियुक्तीबाबत विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.